म. ग्रं. सं. ठाणें

विषय: गोष्टी

लेखक: द. गो. सेडेकर

सन

पुस्तकाचें नांव: आई आणि मुले

आवृत्ती १

ग्रहालय क्रमांक: ६९९८

आवृत्ति १ ली

१९३५.

ਪੰਡਿਤ [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible] ੨੫/੧੦/੭੨

[illegible]

# आई आणि मुलें.

सद्

नाद

हें पुस्तक

## दत्तात्रय गोविंद सडेकर

म्यानेजर लोकमित्र

पोष्ट–खानापूर, जिल्हा–बेळगांव

यांनीं

बेळगांव येथें

“ …गांव-समाचार ” छा० छापविलें.

सन्न १८९९

किंमत १० आणे.

या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचा हक्क
मालक
**दत्तात्रय गोविंद सडेकर**
पोष्ट–खानापूर, जिल्हा–बेळगांव यांनीं
सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें
आपल्या स्वाधीन ठेविला आहे.

# प्रस्तावना.

आपलीं मुलें निर्दोषि, सुदृढ व सुशिक्षित असावीं अशी सर्व मातापितरांची इच्छा असते. परंतु, तीं तशीं सद्गुणी कशीं होतील हेंच कित्येकांस-बहुतेकांस-समजत नाहीं. तेव्हां ती उणीव होईल तितक्या प्रयत्नानें दूर करावी हाच हें पुस्तक छापविण्याचा मूळ हेतु होय.

यांत लहान मुलांस केव्हां व कसें शिक्षण द्यावें, मातेच्या सगर्भावस्थेंत तिचें आचरण कसें असलें तर मुलें कशीं निपजतील, मातापितरांचे स्वभाव मुलें कसे ग्रहण करितात, लहानपणीं मुलांचा स्वभाव कसा असतो, पुढें कां व कसा बदलतो, दासी किंवा मातापितरें मुलांच्या सुखदुःखास कशीं कारण होतात, माता चांगली व पिता वाईट असला किंवा पिता चांगला आणि मातोश्री खराब असली, तर मुलांची स्थिति कशी त्रितियपंथी होते, मुलांच्या समक्ष त्यांची स्तुति-निंदा केव्हां व कशी करावी, आपण सुसंतानाचीं मातापितरें कसें व्हावें धर्मनीति व ईश्वरप्रीति त्यांस कशी शिकवावी, त्याचा परिणाम काय, चांगल्या स्वभावाची उन्नति कशी करावी, मुलांच्या शिक्षणोचित गोष्टी कोणत्या, मुलांच्या हातीं कोणतीं पुस्तकें व कसलीं खेळणीं द्यावीं, त्यांनीं अन्याय केला तर त्यांस केव्हां व कशी शिक्षा करावी, त्यांना स्वदेशाभिमानी, स्वधर्माभिमानी व स्वतंत्रताप्रिय कसें करावें, इ. इ. इ.

अनेक सुशिक्षणाचा स्पेन्सर, बेईन्स, फाउलर, कारपेंटर, गेलटन, स्माईलप्रभृति अनेक विद्वानांच्या ग्राह्य मतांचा ह्या पुस्तकांत समावेश केला आहे. त्याचा योग्य उपयोग करून घेणें वाचकांचें काम.

ग्रंथकर्ता.

# आई आणि मुलें.

## प्रकरण पहिलें.

मुंबई शहरांत सुबोधचंद्र या नांवाचा एक सुशील गृहस्थ रहात असे. त्याचें वय सुमारें २५।२६ वर्षांचें असून तो एका सरकारी कचेरींत नोकर होता. त्याची दरमहा प्राप्ति थोडीच होती. तरी, तेवढ्यांत समाधान मानून तो आपल्या मनुष्यांचा चरितार्थ चालवी. त्याच्या कुटुंबांतील मनुष्यें ह्मटलीं ह्मणजे त्याची वृद्ध आई, बायको (सुंदरी) व एक ३।४ महिन्यांचा मुलगा इतकींच होतीं.

सुबोधचंद्र एके दिवशीं सायंकाळीं कचेरींतील कामकाज आटपून घरीं आल्यावर कपडे काढून ठेवून स्वस्थ विचार करीत बसला होता. त्या वेळीं त्याची पत्नि (सुंदरी) तेथें येऊन उभी राहिली; आणि आपल्या पतीचा विचारगर्क चेहरा पाहून तिनें त्याला नम्रतापूर्वक प्रश्न केला. एक दोन वेळ तोच तो प्रश्न ऐकून सुबोधचंद्र किंचित् हांसून ह्मणाला "कांहीं नाहीं—तसें कांहीं महत्वाचें कारण झालेलें नाहीं."

सुंदरी—महत्वाचें नाहीं, तरी ज्या गोष्टीचा एवढा विचार चालला आहे, ती गोष्ट मला सांगायला काय हरकत आहे? मी आपल्या विचाराच्या आड येईन असें वाटतें कीं काय कोण जाणे!

**सुबोधचंद्र**—तूं माझ्या आड कशाला येशील? पण तुला ती गोष्ट सांगण्यांत कांहीं अर्थ दिसत नाहीं. आणि मी सांगूं लागलों, तरी ती गोष्ट तुला समजणेंच कठीण दिसतें.

**सुंदरी**—काय, मी इतकी मंदबुद्धि आहें? कीं आपण सांगितलेली एक गोष्ट मला समजणार नाहीं?

**सुबोधचंद्र**—एखादी साधारण गोष्ट तूं तात्वडतोब समजशील; परंतु ज्या गोष्टींत चांगलेपणा आहे, अशी गोष्ट तुला सहज समजणार नाहीं.

आपल्या पतीच्या या बोलण्यावरून सुंदरीला वाईट वाटलें खरें; परंतु ती आपल्या पतीवर रागावली नाहीं. उलट आपल्या अंगीं इतकी धारणाशक्ति नाहीं ह्मणून तिला खेद वाटला व आपल्या प्रिय पतीकडून ती गोष्ट समजून घेऊन आपल्याला त्या गोष्टींत कशी मदत करितां येईल, ह्याविषयीं ती विचार करूं लागली.

भोजनोत्तर सुबोधचंद्र आपल्या शयनगृहांत येऊन एका आराम खुर्चीवर पुनः विचार करीत बसला. सुंदरी-ही घरांतील कामकाज आटपून तेथें आली. तों नवरा पूर्ववत् विचारांत गर्क आहे असें तिनें पाहिलें व आपण जवळ जाऊन ह्मणाली "मी इतकी निरुपयोगी आहें असें जर आपल्याला वाटतें, तर माझा परित्याग करून दुसरी एखादी शहाणीसुर्ती अशी स्त्री करावी. जिच्यावर आपला विश्वास नाहीं व जिच्यायोगानें आपली इच्छा परिपूर्ण होण्याचा संभव नाहीं, अशी स्त्री आपल्यास पाहिजे कशाला?"

**सुबोधचंद्र** —मी बोललों त्याबद्दल राग मानूं नकोस. कित्येक चांगले गुण तुझ्यामध्यें आहेत हें मी जाणतों. परंतु, साधारण रीतीनें आपल्या देशांत स्त्रियांची फारच शोचनीय अवस्था दिसून येते; आणि ह्मणूनच मी तुलाही त्याच समाजातली समजून बोललों. तूर्त मी ज्या गोष्टीचा विचार करीत आहें, ती गोष्ट जर तुला सांगितली, तर माझ्या मनांतील काळजी कमी होण्यास तूं मनापासून प्रयत्न करशील? स्थिर मनानें विचार करून पहा. त्यांत तुला पुष्कळ श्रम पडून विचारही करावा लागेल. प्रसंगीं अनेक गोष्टींचा त्याग अथवा स्वीकार करावा लागून स्वतःचें सुख व विश्रांति हींही एका बाजूस ठेवावीं लागतील.

**सुंदरी**—या देहाचे आपण धनी आहां. आपल्याला ज्या गोष्टींत स्वार्थ, सुख आणि आनंद आहे, ती गोष्ट साध्य करण्याविषयीं आमरण परिश्रम करणें हें माझें पहिलें कर्तव्य आहे. तेंच माझें सुख आहे, तोच विसावा आहे व तोच धर्म आहे, असें मी समजतें.

**सुबोधचंद्र**—तर ऐक, मी सांगतों तें. आपल्याला एक पुत्ररत्न लाभलें आहे. त्याच्याविषयीं तूं कधीं कांहीं विचार केला आहेस का?

**सुंदरी**—काय विचार करायचा?

**सुबोधचंद्र**—काय? त्याच्या शारिरिक, मानसिक, व नैतिक उन्नतिविषयीं कांहीं विचार करण्यासारखाच नाहीं?

**सुंदरी**—मुलाला चांगल्या प्रकारें अन्नवस्त्रांचा पुरवठा केला व त्याला चांगलें शिकविलें ह्मणजे झालें.

सुबोधचंद्र—अन्नवस्त्र चांगलें दिलें व त्याला योग्य वेळीं शाळेंत पाठविला ह्मणजे आपलें कर्तव्य पुरें झालें असें नाहीं. पशुपक्षीदेखील आपल्या पिलांना चांगलें खाऊं घालतात, आपल्या प्राणापलीकडे त्यांचें रक्षण करितात, आणि त्यांचें हीत व्हावें अशी इच्छा धरून झटतात. तेव्हां, पशुपक्षी आणि मनुष्यें यांच्या कर्तव्यांत कांहींच भेद उरला नाहीं असें तूं समजतेस?

सुंदरी—आपण आपल्या मुलांना लिहिणें वाचणें शिकवून हुशार करितों; आणि तीं त्यामुळें चांगल्या तऱ्हेनें द्रव्यार्जन करून लौकिकवान् होतात व आपली प्राणयात्रा सुखावह करण्याचें त्यांना सामर्थ्य येतें. परंतु, पशुपक्ष्यांना तर असें कांहींच करितां येत नाहीं ना?

सुबोधचंद्र—आपला शेजारचा रामशंकर पुष्कळ लिहिणें वाचणें शिकून एम. ए. परीक्षा पास झाला आहे. पगारही पुष्कळ मिळवितो व दहा जणांत त्याची मान्यताही चांगली आहे. आतां, समज कीं तुझा मुलगा जर प्रति रामशंकरच झाला, तर तुला बरें वाटेल काय?

सुंदरी—छे! त्याचें नांव नको. माझा मुलगा तसा होण्यापेक्षां आज जरी मेला, तरी मी कष्टी नाहीं. तशा मुलापासून सुख तें काय? मोठमोठ्या परीक्षा दिल्या, हजारों रुपये मिळविले व परक्यांनीं मान दिला, ह्मणजे विद्वान झाला कां? जळो त्याची विद्वत्ता! जन्मदात्या आईच्या नेत्रांतील दुःखाश्रु बंद झालेला एकही दिवस नाहीं, बायको तर सदा दुःखीच! मग त्याचा तो पगार नि विद्वत्ता काय करायची आहे?

सुबोधचंद्र—बरें, त्याची गोष्ट असो. पण, तुझा मुलगा

कोणत्या प्रकारचा झाला पाहिजे अशी तुझी इच्छा आहे? व तो कशा तऱ्हेचा झाला ह्मणजे तूं कृतकृत्य होऊन आपल्याला धन्य ह्मणविशील?

**सुंदरी** —मी माझ्या मनांत चांगलें समजतें कीं, माझा मुलगा अशा प्रकारचा झाला ह्मणजे मी धन्य होईन. परंतु, मला तें स्पष्टपणें बोलून दाखवितां येत नाहीं. आपणच सांगावें.

**सुबोधचंद्र**—ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. या जगांत जें कांहीं कठीण ह्मणून काम आहे, तें लहान मुलांचें शिक्षण व संगोपन करणें हेंच आहे. आपलीं मुलें चांगलीं व्हावीं अशी जर आपली इच्छा असेल, तर शिशुशिक्षण व संगोपन यांविषयीं आपण अगोदर सुशिक्षीत झालें पाहिजे. विशेषतः तुमच्या स्त्रीजातींत याविषयीं अत्यंत शोचनीय अनास्था दिसून येते. ती नाहींशी झाल्याशिवाय तुमच्याकडून हें काम चांगलें होणार नाहीं.

विलायतेंत एका सन्मान्य पंडितानें " लहान मुलांचें शिक्षण व संगोपन " या विषयावर फारच चांगलें असें एक पुस्तक लिहिलें आहे. त्यांत एके ठिकाणीं तो ह्मणतो—" मनुष्याचें जीवन, मृत्यु आणि त्याच्या नीतीची उन्नति व अवनति हीं त्याच्या लहानपणच्या शिक्षणावर व संगोपनावरच अवलंबून असतात. तरी लहान मुलांच्या शिक्षणाकडे लोकांचें लक्ष्य लागावें तसें लागत नाहीं हें मोठें आश्चर्य नव्हे काय? आईची असंस्कृत बुद्धीची सल्ला, मूर्ख दासींच्या विचारशून्य उपायांनीं बनलेली खराब रीति, नीति, नियम आणि त्यांच्या मनाचा आवेग, तशीच कल्पना इत्यादिकांच्या ज्वालाग्निमध्यें निष्पाप अशीं

कोमल मनें होरपळून टाकणें हें भयंकर नव्हे काय? एखादा व्यापारी व्यापाराला अत्यावश्यक असें हिशेबी ज्ञान मिळविल्याशिवाय व्यापाराला आरंभ करील, तर त्या मूर्ख माणसाची आपण हुर्यो करूं व थोडक्यांतच त्या व्यापाराचें दिवाळें निघण्याची पाळी येईल. किंवा एखादा मनुष्य वैद्यक्रियेंत अगदीं अज्ञानी असून आपण केवळ अश्विनीकुमार आहों असा डौल घालील, तर त्याच्या या घमेंडीबद्दल आपल्याला सखेदाश्चर्य वाटेल. आणि अशा मनुष्याकडून रोग्याची खरोखर दुर्दशा होईल. ही गोष्ट मनांत येऊन आपल्याला वाईट वाटल्यावांचून राहणार नाहीं. परंतु, कोणता उपाय केल्यानें बालकांचें शरीर सुदृढ होऊन दिवसेंदिवस हृष्टपुष्ट होईल, कोणत्या उपायानें मुलाची मानसिक व नैतिक उन्नति होत जाईल, ह्याविषयीं तादृश ज्ञान न मिळवितां मनुष्यें आईबाप होऊन भावी वंशाच्या हितानहिताबद्दल खटपट करण्यांत गुंतलीं आहेत, हें पाहून कोणालाही आश्चर्य वाटत नाहीं व यत्किंचितही कोणी विचार करीत नाहीं. आपल्या भावी वंशजांची पुढें दुर्दशा होईल हें समजत असूनही त्याबद्दल कोणाच्या मनाला क्लेश होत नाहीं हें आश्चर्य नव्हे का? *" संसारांत सर्व लोक श्रम करून शिक्षण मिळवितात; पण मुलांचें संगोपन करण्याचें काम ते इतकें हलकें समजतात कीं, त्याबद्दल आगाऊ शिक्षण मिळविण्याचें कारणच त्यांना वाटत नाहीं. सुंदरी, विचार करून पहा; यांत आपण किती अविवेक करितों बरें?

**सुंदरी**—आपलें ह्मणणें बरोबर आहे. माझ्यांत जे

* हरबर्ट स्पेन्सरकृत "एज्युकेशन" पान २३.

कांहीं दोष असतील, ते मला समजून सांगितल्यास अंतःकरणपूर्वक ते घालविण्याची मी खटपट करीन.

सुबोधचंद्र—मी तुझे दोष दाखवायला येथें बसलों नाहीं. आपल्या या मुलाला सद्गुणी करण्याविषयीं माझ्या मनांत विचार उत्पन्न झाला आहे त्याबद्दलच आपल्याला विचार कर्तव्य आहे. आज मी कचेरींतून येत असतां माझ्या मनांत आलें कीं, मुलांना उपयुक्त शिक्षण देऊन त्यांना पुढें संसारयात्रा सुखद व प्रशस्त होण्याचा मार्ग सुलभ करून देणें हें प्रत्येक आईबापांचें कर्तव्य आहे. परंतु, याबद्दल कोणीच विचार करीत नाहीं. तेव्हां आपण तरी यथाशक्ति या दिशेनें खटपट करावी असा इरादा आहे. तुला लग्नाच्या पूर्वीं थोडेंसें शिक्षण मिळालेलें आहे व येथे आल्यावरही तुझें ज्ञान वाढावें अशी तजवीज करून ठेविली होती. आतां तूं जर लहान मुलांच्या शिक्षणाला योग्य असें जास्त ज्ञान मिळविशील, तर फार चांगलें होईल. कारण, मुलांना उत्तम शिक्षण देण्याची सामग्री आपल्या घरांत व आपल्या देशांतील प्रत्येक घरांत यथास्थित होण्याला पुष्कळ दिनावधि पाहिजे."

सुंदरी—आपल्या बोलण्यांत दोन ठिकाणीं मला शंका आली आहे. आतां आपण ह्मटलें कीं "ज्ञान मिळविशील तर कांहीं बरें होईल." आणि दुसरें "आपल्या घरांत बालशिक्षणाची सामग्री यथास्थित होण्याला पुष्कळ दिनावधि पाहिजे." हें असें कां ह्मटलें हें मला समजत नाहीं. आपण मनापासून मुलाला शिक्षण देऊन त्याला चांगला करूं शकणार नाहीं व आपली आशाही पूर्ण करितां येणार नाहीं ह्मणतां?

**सुबोधचंद्र**—माझ्या बोलण्याचें तात्पर्य असेंच आहे. एक वेळीं मी एका इंग्रजी वृत्तपत्रांत वाचलें होतें कीं, एका स्त्रीबरोबर संभाषण करीत असतां एका सभ्य गृहस्थानें ह्मटलें कीं, "मुलाचा जन्म होण्यापूर्वीं तीस वर्षांपासून त्याच्या शिक्षणाची तयारी झाली पाहिजे." काय, समजलीस?

**सुंदरी**—यांत मी तर कांहीं समजलें नाहीं. मुलाचा जन्म होण्यापूर्वीं तीस वर्षें त्याच्या शिक्षणाची तयारी होईल? वाहवा! हें आपण काय सांगतां? "रामजन्मापूर्वीं रामायण!"

**सुबोधचंद्र**—ठीक बोललीस. रामजन्मापूर्वींच रामायणाची रचना होणें अवश्य आहे. कारण, हें बोलणें बालशिक्षणाच्या विषयाला बरोबर लागू पडतें. तीस वर्षांपूर्वीं शिक्षणाची तयारी करणें जरूर आहे याचा अर्थ असा कीं, नवकुमार अथवा कुमारी जन्म घेऊन ज्या मातेच्या ओटींत लालित-पालित होऊन वृद्धि पावतात, आणि जन्म होण्यापूर्वीं ज्या मातेच्या गर्भांत त्यांना नऊ महिने नऊ दिवस वास करावा लागतो, त्या मातेला चांगल्या तऱ्हेनें सुशिक्षित करणें जरूर आहे. मातेच्या उदार वा अनुदार प्रकृतीनें आणि तिच्या कुसंस्काररूपी घोर अंधःकारांत आच्छन्न किंवा स्वच्छ ज्ञानप्रकाशानें प्रकाशित प्रवृत्तीपासून बालक ज्या मार्गानें जातें, तो मार्ग व मातेचा आचार, व्यवहार, रीति, नीति, स्वभाव आणि चरित्र यांवर अवलंबून असणारें मुलांचें भावी जीवनचरित्र, ह्यांना त्या मातेचें शिक्षणच आधारभूत आहे. तेव्हां सुकुमारमति बालिकांच्या चरित्राचा उत्कर्ष करण्या-

साठीं—त्यांच्या अनुन्नत जीवनाला उन्नत करण्या-साठीं–त्यांच्या जीवनरूपी क्षेत्रांत ज्ञानरूपी महावृक्षाचें बीज रोपण्यासाठीं–बराच काळ घालविला पाहिजे. असा त्या गृहस्थाच्या बोलण्याचा हेतु आहे. आतां तरी समजलीस?

सुंदरी—आपण जें सांगितलें तें मी चांगल्या तऱ्हेनें समजलें. परंतु, ही गोष्ट ऐकल्यापासून माझ्या अंतःकरणांत निराशचा संचार झाला आहे. कारण, या आपल्या बोलण्यावरून मी या कामीं अगदीं निरुपयोगी आहें.

सुबोधचंद्र—या एकाच गोष्टीवरून तूं निराश होऊं नको. शिशुशिक्षणाबद्दल विचार करणाऱ्या पंडितांनीं जें कांहीं सांगितलें आहे, तें तुला जसजसें समजेल, तसतसें फारच आश्चर्य वाटेल! ह्या गोष्टींचा मीं बराच विचार केला आहे. व तुलाही ह्याविषयीं नीट समजूत करून देईन. तूं लक्ष्यपूर्वक मात्र ऐकत जा ह्मणजे झालें.

सुंदरी—मी त्याविषयीं फार उत्सुक आहें. लक्ष्यपूर्वक समजून घेईन.

सुबोधचंद्र—फ्रान्सचा बादशहा नेपोलियन बोना-पार्ट याचें नांव तूं कधीं ऐकलें आहेस?

सुंदरी—कित्येक दिवसांपूर्वीं मीं एका लहानशा पुस्तकांत "नेपोलियन आणि फ्रान्सची उलथापालथ" हा विषय वाचला होता. तोच हा नेपोलियन ना?

सुबोधचंद्र—होय तोच. तो एके दिवशीं मॅडम क्यां-पान नामक स्त्रीबरोबर संभाषण करीत असतां ह्मणाला—"शिशुशिक्षणाविषयीं जी जुनी रीत आहे, ती अगदीं निरुपयोगी आहे, असें आपलें मत दिसतें. तर तींत

कोणती सुधारणा झाली पाहिजे?" यावर मॅडम क्यांपान हिनें "माता" इतकेंच उत्तर दिलें. हें ऐकून नेपोलियन कांहीं वेळ स्तब्ध राहिला आणि लागलीच ह्मणाला—"होय तुह्मी बरोबर सांगतां. माता हा शब्द शिशुशिक्षण याचें दुसरें नांव आहे." इतकें बोलणें झाल्यावर मॅडम क्यांपान हिला नेपोलियनानें आपल्या मुलांना शिक्षण देण्याविषयीं विनंति केली. * यावरून तूं काय समजलीस? माता या शब्दाच्या मागें ज्ञान आणि धर्म यांचें वीस्तीर्ण शिक्षणरूपी क्षेत्र आहे. मुलांना माता ह्मणजे आपलें सर्वस्व आहे असें वाटत असतें: आणि ह्मणूनच जगदीशानें मातेला आपला प्रतिनिधी करून संसारांत पाठविलें आहे, असें कित्येक लोक ह्मणतात. माता-पिता ईश्वराचे प्रतिनिधी या नात्यानें संसारांत बालकांचें पालनपोषण करितात. ते प्रतिनिधी जर चांगले असले, तर मुलें चांगलीं निपजतात; आणि जर ते वाईट असतील, तर मुलें कधींही चांगलीं निपजणार नाहींत.

सुदंरी—(इतका वेळ आश्चर्ययुक्त होऊन आपल्या पतीचें बोलणें ती ऐकत होती. तें बोलणें संपल्यावर एक दीर्घ श्वास टाकून बोलली) मी आजपर्यंत मुलांच्या संबंधानें कधींही विचार केला नव्हता. आतां मी समजतें कीं, मुलें झालीं एवढ्यानेंच कोणी आपल्याला भाग्यशाली मानणें योग्य नाहीं. कारण, मुलें मोठीं झाल्यावर मनुष्यत्वाला झुगारून देऊन तीं पशुवत् आपलें जीवन आक्रमूं लागतील तर तीं न झालेलीं बरीं. मला मोठी चिंता उत्पन्न झाली

* स्माईलकृत करेक्टर पृ. ३१ वें.

आहे कीं, या आपल्या मुलाला कोणत्या रीतीनें सद्गुणी करितां येईल?

**सुबोधचंद्र**—आज इतक्यावरच बोलणें बंद करूं. कारण, रात्र बरीच झाली. पुनः केव्हां तरी याबद्दल विचार करितां येईल.

**सुंदरी**—"केव्हां तरी" याचा अर्थ काय? फिरून तीन चार महिने गेल्यावर कीं काय?

**सुबोधचंद्र**—तर तूं काय ह्मणतेस? रोजच्यारोज कचेरींत श्रम करून घरीं आल्यावर आणखी या विषयाची काथ्याकूट करीत रात्रीचे दहा अकरा वाजेपर्यंत जागत बसायचें?

**सुंदरी**—आपण माझें मन पाहतां वाटतें! पण माझी क्षुद्र बुद्धि आणि अज्ञान यामुळें असा कांहीं चमत्कारिक भाव उत्पन्न झाला आहे कीं, त्याचें वर्णन मला करितां येत नाहीं. मी निश्चयपूर्वक सांगतें कीं, आपण या विषयाबद्दल जें जें कांहीं मला सांगाल, त्यांतील एक अक्षरही मी फुकट जाऊं देणार नाहीं.

**सुबोधचंद्र**—बरें, ठीक आहे तर. जेव्हां जेव्हां मला वेळ सांपडेल, तेव्हां तेव्हां मी आपले श्रम एका बाजूस ठेवून या विषयांत तुझी ज्ञानोन्नति होण्यासाठीं पुष्कळ माहिती सांगेन. तूं काळजीपूर्वक माझा बोध अमलांत आणण्याविषयीं दक्षता मात्र ठेव ह्मणजे झालें.

# प्रकरण दुसरें.

दुसरे दिवशीं रविवार असल्यामुळें सुबोधचंद्र कचेरींत गेला नाहीं. त्यामुळें संभाषण करण्याला पुष्कळ वेळ सांपडला. सुबोधचंद्र आणि सुंदरी एकत्र बसून बालशिक्षणाविषयीं बोलूं लागलीं.

**सुबोधचंद्र**–काल रात्रीं जें कांहीं तुला मीं सांगितलें होतें, तें सर्व लक्ष्यांत आहे ना ?

**सुंदरी**–होय, मी त्यापैकीं एकही गोष्ट विसरलें नाहीं. काल शेवटीं " आईपणा येण्यापूर्वींच स्त्रियांना शिक्षण देणें जरूर आहे." याविषयीं बोलणें झालें.

**सुबोधचंद्र**–होय. याचविषयीं बोललों होतों. आज त्याच विषयावर आणखी कांहीं तुला सांगतों. एका इंग्रजी पुस्तकांत * एके ठिकाणीं लिहिलें आहे कीं, एका स्त्रीनें आपल्या चार वर्षांच्या मुलास शिक्षण देण्याचा केव्हां प्रारंभ करावा ? असा एका ख्रिस्ति धर्मोपदेशकास प्रश्न केला. तेव्हां तो ह्मणाला " बाई, अद्याप आपल्या मुलाच्या शिक्षणाला तूं आरंभ केला नाहींस ? तर त्याचीं चार वर्षें तूं फुकट घालविलींस असें समजलें पाहिजे ! " या सांगण्याचा अर्थ तूं काय समजलीस ?

**सुंदरी**–वा ! चार वर्षांचा मुलगा शिकणार तो काय ? मी ह्यांत कांहींच समजलें नाहीं. आपल्या देशांत पांच वर्षें झाल्यावर मग त्याच्या "श्रीगणेशाला" आरंभ होतो. अगदीं लहानपणींच जर मुलांवर शिक्षणाचा बोजा घातला, तर तीं जगतील तरी कशीं ?

* स्माईलकृत करेक्टर पृष्ठ ३२ वें.

**सुबोधचंद्र**—तूं काय समजतेस कीं, वर्ष-सहा महिन्यांचा मुलगा झाला म्हणजे आंगडी—टोपडी घालून व त्याच्या हातांत दप्तर-पाटी देऊन पंतोजीच्या शाळेंत त्याला पाठवायचा; अथवा त्याच्या हातांत पहिलें पुस्तक देऊन शाळेंत पाठवायचें; असा का शिक्षणाचा अर्थ? बाळक जन्मल्यापासूनच आपोआप शिक्षण मिळवूं लागतें. लार्ड ब्रोहम नांवाच्या एका महापंडितानें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, 'बाळक जन्मल्यापासून दोन-अडीच वर्षांच्या आंतच बाह्यसृष्टींतील विषय, आपली शक्ति, आणि दुसऱ्या मनुष्यांचा स्वभाव इतकेंच नव्हे तर आपल्या व दुसऱ्याच्या मनाविषयीं जितकें ज्ञान मिळवितें, त्यापेक्षां जास्ती ज्ञान त्याच्या अवशेष आयुष्यांत त्याला मिळवितां येत नाहीं. *" याचा अर्थ असा कीं, पुढील सर्व शिक्षणाचें बीज या थोड्या वयांत मुलें आपल्या अंतःकरणांत एकत्र करितात. म्हणून हें लहानपणचें ज्ञानार्जनच विशेष महत्वाचें समजलें पाहिजे. हें लहानपणचें शिक्षण म्हणजे ज्ञानरूपी महा वृक्षाचा बुंधा आहे. व नंतर मिळविलेलें ज्ञान हें त्या बुंध्याच्या शाखा, प्रतिशाखा, पानें, फुलें व फळें होऊन त्या बुंध्याला शोभा मात्र आणतात.

**सुंदरी**—ही केवढी आश्चर्याची गोष्ट आपण सांगितली! आपल्या बोलण्यावरून दोन वर्षांच्या आंतच बाळक ज्ञानार्जन करितें, पण त्याला तें कसें करितां येईल हेंच मला समजत नाहीं.

---

* स्माईलकृत करेक्टर पान ३२.

**सुबोधचंद्र**—तर तूं अद्याप मुलाच्या शिक्षणाला आरंभ केव्हांपासून केला पाहिजे हें समजली नाहींस. ठीक तर, सांगतों. मी लहान मुलें शिकतात ह्मणून जें सांगितलें, त्याचा अर्थ तूं काय समजलीस सांग पाहूं.

**सुंदरी**—आपल्या सांगण्यावरून मी असें समजतें कीं, लहान मुलांचें जिज्ञासापूर्वक जें पाहणें, तेंच त्यांचें शिक्षण.

**सुबोधचंद्र**—फार चांगलें. मुलें जें पाहतात तेंच शिकतात. अर्थात् त्या प्रत्येक गोष्टीविषयीं तीं थोडेंसें तरी ज्ञान करून घेतात. यांत कांहीं संशय नाहीं.

**सुंदरी**—थोडेंसें तरी ज्ञान तीं मिळवतातच. आतां आपल्या बोलण्याचा थोडथोडा अर्थ माझ्या मनांत येऊं लागला.

**सुबोधचंद्र**—जन्मतांच बाळक मातारूप शिक्षणाच्या ओंटींत विराजमान होतें. तें, जी जी वस्तु पाहतें, ती ती त्याला नवीच असल्यामुळें आश्चर्ययुक्त होऊन सृष्टीसौंदर्याकडे त्याचें लक्ष्य लागतें व हळूहळू त्याविषयीं तें ज्ञान मिळवूं लागतें. जन्मतांच बाळक रडूं लागतें, याचें कारण तूं काय समजतेस? त्या वेळीं त्याला कांहीं तरी जरूर असते; आणि रडल्याबरोबर तें आपल्याला मिळेल या गोष्टीचें बीज त्याच्या मनांत गुप्तरूपानें असतें. त्याप्रमाणेंच त्याला क्षुधा लागली किंवा त्याला कसलीही इजा झाली, तर त्याची रडण्याकडेच उपजतबुद्धीमुळें प्रवृत्ति होते व त्या रडण्यापासून आपल्याला लागलेली क्षुध किंवा इजा नाहींशी होतअसल्यामुळें मुलें हळूहळू रडायला शिकतात. तसेंच तीं हंसायलाही शिकतात. तीं आपले

गोजिरवाणे हातपाय हालवून आपल्याशींच खेळत असतात. हें त्यांना शिक्षणच नव्हे काय? जसजशीं तीं वाढतात, तसतशीं बोबडे बोबडे शब्द बोलून "आई आई" अशा शब्दांनीं मातेचे कान तृप्त करीत असतात. अशा प्रकारें मातेच्या आनंदरूप मनांत अमृतधारांचा तीं वर्षाव करायला लागतात. हें काय शिक्षणावांचून होतें? क्षुधा लागली किंवा कांहीं इजा झाली ह्मणजे आपण रडून वडील मनुष्याचें लक्ष्य आपणाकडे ओढून घ्यायला त्यांना कोण शिकवितें? क्षुधा लागली तर ती शांत होण्याला रडलें पाहिजे हें ज्ञान त्यांना उपजतच होतें. तसेंच क्षुधा शांत होऊन तृप्ति झाली ह्मणजे आनंद प्रदर्शित करण्याचें ज्ञानही त्यांना पहिलेंच असतें. तो पहा आपला लाडका त्या पाळण्यावरील लटकत असलेला रेशमी रुमाल घेण्यासाठीं किती आतूर झाला आहे! निजलेलें उठून तो घेण्याचें जरी त्याच्या अंगीं सामर्थ्य नाहीं, तरी तो घेण्याविषयीं त्याच्या मनाची झालेली व्यग्रता व अचपळपणानें होणारे त्याचे व्यापार यांवरून त्याच्या कोमल मनांतील अस्फुट वासनांचें सुंदर निदर्शन होत नाहीं काय? आतांपासून जसें त्याच्या डोळ्यांपुढें आपण चित्र ठेवूं, तसें त्याच्या अंतःकरणरूप आदर्शावर प्रतिबिंब उठून त्याप्रमाणें तो साधु किंवा असाधु होऊन संसारांत आपलें कल्याण किंवा अकल्याण करणारा निपजेल. तात्पर्य, जन्मापासून मुलाला जसें शिक्षण मिळेल, त्याप्रमाणें त्याचें सर्व आयुष्य सदसदाचरणामध्यें जाणार, हें निःसंशय आहे. मनुष्याचें जीवन हें शिक्षणरूप प्रचंड प्रवाहांत आमरण तरंगत असतें.

सुंदरी—आतां हें मी चांगलें समजलें. पण, आईपणा येण्यापूर्वीच स्त्रियांना शिक्षण दिलें पाहिजे याविषयीं आज जास्त सांगेन, असें आपण काल सांगितलें तें सांगायचें ना?

सुबोधचंद्र—होय, आजच सांगतों. पहा, एखाद्याला एखाद्या झाडाचें बीं पेरायचें असलें, तर तो आरंभीं ती जमीन आपल्या झाडाला चांगली आहे कीं नाहीं? ती सत्वशील आहे कीं काय? हें पाहतो आणि मग बीं पेरतो. आतां पहा कीं, ती जमीन अगदीं सत्वहीन आहे आणि त्यांतच त्याला बीं पेरावयाचें असलें, तर तो काय करील?

सुंदरी—त्या जमिनींत उत्तम खत घालून ती जमीन तो रसाळ करील.

सुबोध—आतां सांग कीं, हें काम सोपें आहे कीं कठीण आहे?

सुंदरी—जमीन कशी पाहिजे, बीं कसें पेरावें, जमीन चांगली नसली तर तींत खत कसें घालावें, ही ज्याला माहिती आहे, तो हें काम सहज करील. परंतु, जो या कामांत अज्ञान असेल, त्याला तें कठीण आहे.

सुबोध—बरें, आतां सांग कीं, कोणत्या आईबापांचीं मुलें चांगलीं निपजतील?

सुंदरी—ज्या आईबापांची शरीरप्रकृति चांगली असून सशक्त असेल, त्यांचीं मुलें चांगलीं सशक्त झालींच पाहिजेत.

सुबोध—बरें, तूं कधीं असें पाहिलें आहेस कीं,

आईबापांच्या चेहऱ्याप्रमाणेंच मुलांचाही चेहरा बराच जवळ जवळ असतो.

सुंदरी—होय, पाहिलें आहे खरें. माझी आई एक दिवस ह्मणत होती कीं, या बाळाचा तोंडवळा आपल्यासारखाच हुबेहूब आहे.

सुबोध—याप्रमाणेंच आईबापांचे गुणावगुण व प्रकृतीही बहुतांशीं मुलांच्या अंगीं येते, हें कधीं तूं पाहिलें आहेस?

सुंदरी—होय, हें देखील पाहिलें आहे. माझे थोरले काका फार तापट आहेत. तसाच त्यांचा थोरला मुलगाही तापटच आहे. माझे लहान काका दयाळू स्वभावाचे असून त्यांच्याकडून आंधळे, पांगळे वगैरे अनाथ लोकांना पुष्कळ मदत होत असते. त्यांचा मुलगा तर हुबेहूब तसाच आहे. एके दिवशीं एक भिकारी थंडीनें कुडकुडत होता. तें पाहून त्यानें आपलें अंगवस्त्र त्याला दिलें व तो घरीं आला. काकांना तें समजतांच त्यांनींही त्याला शाबासकीच दिली.

सुबोध—फार चांगलें, अशा तऱ्हेचीं जर सर्व मुलें होतील, तर जगाचें कल्याण होण्याला उशीर लागणार नाहीं. पहा, जर आपली उभयतांची प्रकृति आरोग्यकारक असून सशक्त असली, लहानपणापासून आह्मी सत्यनिष्ठ असलों, धर्मपरायण अशा आईबापांच्या पोटीं जन्मास येऊन त्यांच्या उत्तम शिक्षणानें आमचीं मनें सुसंस्कृत झालेलीं असलीं व आह्मी आपला संसार सुखानें करीत असलों, तर आमचीं मुलें खात्रीनें चांगलीं होतील.

बरें, या विषयाबद्दल मी हळूहळू सर्व सांगेन. तूं मघांशीं बोलली होतीस कीं, आईबापांची प्रकृति निरोगी व सशक्त असली, तर त्यांचीं मुलें निरोगी व सशक्त होतात. पण, ज्यांनीं सृष्टिनियमाचें उल्लंघन करून आपली प्रकृति रोगग्रस्त करून घेतली आहे,—दमा, क्षय, उन्माद वगैरे वंशपरंपरा चालणारे रोगांनीं ज्यांचीं शरीरें व्याप्त झालीं आहेत—त्यांचीं मुलें तशींच रोगी व बलहीन होतात. असें पुष्कळ ठिकाणीं अनुभवास येतें. तसेंच अनेक गोष्टींवरून असेंही दिसेल कीं, त्यांच्या शरीराप्रमाणेंच मुलांचीं मनें व प्रकृतिही पुष्कळ कारणानें आईबापांशीं अनुरूप अशीच होते. तुला आठवण असेलच कीं, तूं गरोदर असतांनाच मी नेहमीं सांगत असें कीं, तूं आपला वेळ समाधानानें व शांतपणानें घालवीत जा. तुझें मन उदास न व्हावें, तुझ्या मनाला दुःखसंवेदना होऊं नयेत ह्मणून मीं किती खबरदारी ठेविली होती. तसेंच तुला वाचण्यासाठीं चांगलीं चांगलीं पुस्तकेंही वरचेवर देत होतों. तर आतां तूं सांग कीं, त्यांतील कोणकोणतीं पुस्तकें तूं लक्ष्यपूर्वक वाचलीस व त्यांतून तूं काय ज्ञान मिळविलेंस?

सुंदरी–हरिश्चंद्र नांवाचें एक पुस्तक मीं वाचलें होतें. त्यांत सत्यवादी हरिश्चंद्राचा वृत्तांत आहे. मीं तें पुस्तक लक्ष्यपूर्वक वाचलें. तें फार चांगलें आहे.

सुबोध–तें पुस्तक चांगलें ह्मणूनच तुला वाचायला दिलें होतें. आहाहा!!! हरिश्चंद्राचा स्वार्थत्याग, न्यायपरायणता, आणि गंभीर सत्यप्रियता यांपैकीं थोडासा अंश जर आपल्या घरीं अवतीर्ण होईल, तर आपला

मनुष्यजन्म सफल होईल. बरें, आणखी कोणतीं पुस्तकें तुझा वाचायला दिलीं होतीं?

सुंदरी–विष्णुपुराणांतर्गत ध्रुव आणि प्रल्हाद यांचें जीवन चरित्र वाचलें होतें. हेंही पुस्तक फार चांगलें होतें. तें वाचीत असतां पुष्कळ वेळ माझ्या नेत्रांतून दुःखाश्रुही आले. ध्रुवाची सरळ भक्ति आणि प्रल्हादाची विश्वासदृढता हे गुण तर अतुलनीय होते.

हीं पुस्तकें मला फार पसंत वाटलीं. आणि आपण वारंवार आग्रहपूर्वक सांगत असल्यामुळें मीं मननपूर्वक सर्व पुस्तकें वाचलीं. त्यांतील कित्येक भाग तर मला तोंडपाठ येतो.

सुबोध–कशाकरितां तीं पुस्तकें तुला वाचायला दिलीं होतीं हें माहीत आहे?

सुंदरी–पुस्तकें चांगलीं असून स्त्रियांना वाचायला योग्य होतीं ह्मणून.

सुबोध–एवढ्याकरितांच नव्हे; दुसरेंही एक कारण होतें.

सुंदरी–दुसरें काय कारण होतें? आपण आणखी तर कांहीं बोलल्याचें स्मरत नाहीं.

सुबोध–त्या वेळीं तुला तें सांगितलें नाहीं याचें कारण असें होतें कीं, खरा उद्देश तुला सांगितल्यास तूं सामान्य समजुतीनें उपेक्षा करशील. ह्मणून खरें कारण न सांगतां केवळ वाचायलाच आग्रह केला.

सुंदरी–बरें, पण तीं पुस्तकें वाचून बरेच दिवस झाले; तर इतके दिवस कां मला तें सांगितलें नाहीं?

सुबोध—त्यानंतर तसा अवकाशच मिळाला नाहीं. आणि फार करून या संबंधानें संभाषण करायची इच्छा-ही विशेष जागृत झाली नव्हती. आपण जर नेहमीं कर्त-व्यपरायण आणि निष्ठावान् झालों, तर आपलें घर—अर्थात् आपला देश—स्वर्गाप्रमाणें होईल. दुर्बलता, आलस्य व निरुत्साह आपल्या हाडीं खिळला आहे. ज्या ज्या वेळीं जी जी गोष्ट करावयाची, ती तर दूरच राहिली; पण अवश्य करायाचें कर्तव्य तेंही करण्याचें आह्मांस ज्ञान राहिलें नाहीं. त्यामुळेंच आह्मी सजीव असून निर्जीवा-प्रमाणें जीवनयात्रा कंठीत आहों. आज मला थोडासा अवकाश आहे. व बालशिक्षणाचा विषयही माझ्या मनांत प्रबलतेनें उत्पन्न झाला आहे. तूं पाहिलें असशील कीं, मीं कांहीं दिवसांपूर्वीं कित्येक पुस्तकें विकत आणलीं होतीं तीं सर्व बालशिक्षणाविषयींच होतीं. तीं पुस्तकें वाचतां वाचतां कित्येक वेळीं माझ्या मनांत असा कांहीं आश्चर्यजनक भाव उत्पन्न होत असे कीं, तो अनुभवाशि-वाय सांगून समजणार नाहीं. आणि माझ्या अंतःकरणां-तील गंभीर चिंता, प्रबल आनंद आणि एक प्रकारच्या आशेचा अथवा निराशेचा आवेग स्पष्ट करून दुसऱ्याला समजविण्यासारखी माझी रसाळ वाणीही नाहीं. परंतु, माझ्या मनांत जो विषय एकसारखा घोळत आहे, तो तुला समजून देण्यास हाच योग्य प्रसंग आहे. कारण, दोघांच्याही मनांत त्या विषयाबद्दल चर्चा करण्याची व तो समजून घेण्याची प्रबळ इच्छा उत्पन्न झाली आहे. आतां जें कांहीं मी तुला सांगेन, तें तुझ्या मनांत चांगलें ठसेल. ज्या वेळीं तीं पुस्तकें तुला वाचायला दिलीं, त्या वेळीं

तुझ्या गर्भातील मुलाची प्रकृति—जी त्याच्या चिरजिवनाचें धन आहे व जें गर्भातच प्राप्त होऊन त्याचा सर्व आयुष्यक्रमावर अम्मल असतो—त्या प्रकृतीचा कोमल अंकुर त्या वेळीं उत्पन्न होत होता. त्या वेळीं गर्भवती स्त्रीचा प्रकृतिस्वभाव जसा असेल, तसाच स्वभाव उत्पन्न होणारें बाळक धारण करतें. हें समजूनच मीं तशीं पुस्तकें तुला वाचायला दिलीं होतीं. त्या पुस्तकांत * सद्गुणांचें चित्र चांगलें वठविलेलें होतें व तीं वाचतां वाचतां त्याची छाया तुझ्या अंतःकरणावर पडून तुझें मन त्या वेळीं साधुभावानें परिपूर्ण झाल्यामुळें गर्भवासी बाळकाच्या मनावर त्याचा अंशतः तरी सुपरिणाम होईल ही मला खात्री होती.

सुंदरी—हें तर फारच आश्चर्यकारक! आईबापांच्या चांगल्या-वाईटपणावर पुढील पिढीचें चांगलें-वाईट अवलंबून आहे. आतां मी समजलें कीं, आपण चांगलीं असलों तर आपला संसार चांगला, आणि वाईट असलों तर संसारांत सुख मिळविण्याची आशाच करायला नको. केवढ्या कर्तव्याचा बोजा जगन्नियंत्यानें आपणावर ठेविला आहे पहा! हें माझ्या अल्पमतीला समजण्याजोगें नाहीं.

सुबोध—स्त्रीजातीला सुशिक्षित करण्याची किती आवश्यकता आहे हें आतां तरी तुला समजलें ना? सुशिक्षा, सुनीति आणि सखोल धर्मभाव स्त्रियांच्या अंतःकरणांत दृढरूपानें प्रतिष्ठित झाल्याशिवाय या संसारांत खरें सुख मिळण्याची आशा नाहीं.

सुंदरी-मला वाटतें कीं, नारिजीवनाच्या साधु

* डा. कार्पेन्टरकृत ह्युमन फिझीओ लोजी पृ० ९०६ व ७२९.

उदाहरणानें संसारसाधुतेचें आलय होतें आणि त्यांच्या कुवर्तनानें अवघी मनुष्यजाति रसातळास जाते.

सुबोध—आतां संध्याकाळ होत आली, मला बाहेर जाऊन यायचें आहे; आणि तुलाही घरांतील कामकाज असेलच. याकरितां हें संभाषण आज इतकेंच पुरे करूं. पुनः केव्हां तरी आवकाशाप्रमाणें बोलूं. परंतु, आज जें कांहीं मीं सांगितलें आहे, तें विसरूं नको.

---

# प्रकरण तिसरें.

पुढें एक आठवडापर्यंत कामाच्या गडबडीमुळें सुबोधचंद्राला या विषयासंबंधीं सुंदरीबरोबर संभाषण करण्याला अवकाश सांपडला नाहीं. परंतु, त्या दोघांच्याही मनांत तो विषय एकसारखा घोळत होता. एक आठवडापर्यंत आपसांत चर्चा करून जें कांहीं सत्य मिळविलें होतें, तें अमलांत आणण्याविषयीं तीं दोघेंही इतकीं आस्थापूर्वक झटत होतीं कीं, त्यांच्या पहिल्या स्थितीचें अकस्मात् विलक्षण परिवर्तन झालेलें पाहून कोणालाही अत्यंत आश्चर्य वाटलें असतें. प्रत्येक काम तीं जपून व आस्थापूर्वक करीत. त्यांची पहिली चंचलता, हास्यविनोद, बहुभाषण, राग हीं सर्व निवून जाऊन संसारांतील हरएक काम तीं दक्षतेनें व प्रसन्नतापूर्वक करूं लागल्यामुळें त्यांची दिनचर्या जणूं काय सद्वर्तनाचा मूर्तिमंत कित्ताच असें झालें. हें त्यांचें अकस्मात् झालेलें परिवर्तन पाहून सुबोधचंद्राच्या आईला फारच आश्चर्य वाटलें व या-

बद्दल तिनें आपल्या मनाशीं विचारही केला. परंतु, तिला कांहींच तर्क करितां येईना. एके दिवशीं रात्रीं जेवण-खाण होत असतां तिनें प्रश्न केलाच कीं, " अशी काय. तुह्मीं दीक्षा घेतली आहे कीं, त्यामुळें तुमच्या वर्तनांत असा एकाएकीं बदल झाला? सध्याचें तुमचें वर्तन पाहून सद्वर्तन ह्मणून जें काय ह्मणतात, तें आमच्या या वरांत तुमच्या दोघांच्या रूपानें अवतरलें आहे कीं काय असें मला वाटतें."

**सुंदरी**—सासूबाई! आह्मी एका नव्या मंत्राची दीक्षा घेतली आहे. त्यास आपला आशिर्वाद असला ह्मणजे आमच्या दीक्षेचें सार्थक्य होऊन आह्मी कृतकृत्य होऊं.

**आई**—**सुबोध**! तुह्मी अशी कोणती दीक्षा घेतली आहे? एकदम तुमचें वर्तन बदललेलें पाहून ती दीक्षा समजून घेण्याची मलाही पण भारी उत्कंठा लागली आहे.

**सुबोध**—ठीक आहे आई, मला उद्यां सुटी आहे. भोजन झाल्यावर आह्मी एकत्र बसूं. त्या वेळीं तें तुला सर्व समजेल.

. दुसरे दिवशीं जेवण-खाण झाल्यावर **सुबोधचंद्र** दिवाणखान्यांत जाऊन बसला. घरांतील काम-काज आटपून त्याची माता वर दिवाणखान्यांत जायला निघाली. तेव्हां तिनें सुनेलाही येण्यास सांगितलें. त्यावर **सुंदरीनें** उत्तर दिलें "तुह्मी पुढें चला. मी मुलाला थोडेंसें दूध पाजून येतें. कारण, तेथें बसल्यावर लवकर उठावेंसें वाटत नाहीं आणि हा तर रडून गोंधळ करील.

**सासू**—बरें, लवकर ये. फार वेळ लावूं नको.

सुंदरी—नाहीं, मी अश्शी येतें.

इतकें झाल्यावर ती दिवाणखान्यांत गेली व मुलाला प्रश्न केला, "सुबोध, तुह्मीं अशी अवर्णनीय शांतता कां धारण केली आहे?"

सुबोध—आई, तुला आश्चर्य वाटण्यासारखें आह्मीं काहीं विशेष केलें आहे असें नाहीं. तुला तें सर्व जुनेंच आहे. उलट मी असें समजतों कीं, तुझ्यापासून आह्मांला कांहींतरी आणखी नवें समजेल.

आई—बरें. फार चांगलें! आधीं तुझें कायतें ऐकूंदे आणि मग त्यांत जें कांहीं मला सांगावेंसें वाटेल, तें मी सांगतें.

सुबोध—आपल्या मुलाला कोणत्या रीतीनें सद्गुणी करावा, कोणत्या रीतीनें त्याला सुशिक्षण देऊन सच्चरित्र व सद्धर्म यांवर निष्ठा ठेवणारा असा तयार करावा, याविषयीं उपाय शोधण्याला आह्मीं आरंभ केला आहे. आई, काय सांगूं! याबद्दल जसजसा विचार करितों, तसतसें हें काम कठीण वाटतें. आरंभीं या कामीं आपल्या देशांतील स्त्रियांना सुशिक्षित करणें अत्यावश्यक आहे.

आई—आपल्या देशांतील पुरुषच जर या गोष्टीसंबंधानें विचार करीत नाहींत, तर मग बायका काय करणार? पुरुषांनींच मुळीं तो विचार सोडला आहे. तेव्हां त्या तरी तिकडे लक्ष्य कशाला देणार? तशांत आह्मी ज्या देशांतील स्त्रिया आहों, त्या आमची स्थिति अशी आहे कीं, आह्मांला ज्ञानच नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. आजकाल

असें झालें आहे कीं, मुलांना थोडेंसें लिहितां वाचतां येऊं लागून एखादी दुसरी परीक्षा उतरली कीं त्यांना आपण मनुष्यपणाच्या शिखरास जाऊन पोंचलों व ज्ञानभांडाराची आणि सद्गुणमंदिराची किल्लीच आपल्या हातीं आली असें वाटूं लागतें. आणि त्यांच्या अज्ञानी आईबापांचीही तशीच समजूत होते. पण, हा दुष्परिणामी समज टाकून देऊन जर तीं थोडासा विचार करतील, तर फार चांगलें होईल. तुह्मीं आपल्या मुलाला सुमनुष्य करण्याचें मनांत आणिलें, हें फार चांगलें आहे. पण, मुलांना सद्गुणी करण्याचें काम मोठें कठीण आहे; यासाठीं तुह्मांला विशेष खबरदारी घेतली पाहिजे.

सुबोध—विलायतेंतील एका प्रख्यात गृहस्थाचें मत असें आहे कीं, शिशुशिक्षणाचें काम मुलें पाळण्यांत असते वेळींच आरंभिलें पाहिजे. आणि आई! खरेंच सांगतों कीं, ह्या मताचा स्वीकार तिकडील लोक भराभर करीत आहेत. आपल्या विलोल नेत्रांनीं आसपासचे पदार्थ मुलें मोठ्या कौतुकानें पहात असतात. यावरून इतकेंच समजावयाचें कीं, तेव्हांपासूनच त्यांच्या शिक्षणाला सुरवात होते. हातास सांपडेल ती वस्तु घेऊन पहावी, तोंडांत घालावी, कोठें कांहीं आवाज झाला कीं तिकडे टक लावावी; हींच बालकांच्या ज्ञानप्राप्तीचीं प्राथमिक लक्षणें होत. आणि हींच लक्षणें पुढें वाढत जाऊन त्यापासून अदृश्य वस्तु शोधणें, नवींनवीं यंत्रें बनविणें, अद्भुत चित्रें काढणें, नाटकें करणें, कविता जुळविणें हीं कामें चाललीं आहेत. मनःशक्तीच्या या स्वाभाविक व निर्बाध्य चपलतेला अनुकूल अशा गोष्टी

बालकांच्यापुढें धराव्या कीं नाहीं हा मोठा प्रश्न आहे आणि त्याला तो असें उत्तर देतो कीं, लहान मुलांचें सामान्य कौतुहलच उत्तरकाळीं उन्नति करण्याला सहायभूत होतें. बालकांचें जन्म झाल्यापासूनच जर त्यांस अशा रीतीनें ज्ञान मिळविण्याची आकांक्षा आणि आतुरता इतकी स्वाभाविक व अपरिहार्य आहे, तर ज्या योगानें त्यांच्या ज्ञानोन्नतीस मदत मिळेल अशा पुष्कळ जरूरीच्या वस्तु प्रसंगानुसार त्यांच्या नजरेसमोर ठेवणें हें फार अगत्याचें आहे.

आई–तूं जें आतां सांगितलेंस तें बरोबर आहे. मुलें आपण स्वतःच पुष्कळ शब्द व नांवें शिकत असतात आणि बाहेरची पुष्कळ माहिती मिळविण्याची त्यांची फारच उत्कंठा असते. एखादे वेळीं त्यांच्या तोंडून नवी गोष्ट ऐकिली ह्मणजे ती त्याला कशी समजली अशाबद्दल आपल्याला आश्चर्य वाटतें. लहान मुलांचा स्वभाव मोठा चौकस असतो; त्यामुळें तीं जें पहातात किंवा ऐकतात, तें तीं आपल्या मनांत सांठवून ठेवतात. यासाठींच मुलांवर चांगली दीक्षा ठेवावी लागते. तुझाच मुलगा जरा मोठा होऊंदे; मग तुला किती सावधपणा ठेवावा लागेल तें समजेल. मला आतां तुझ्या लहानपणची आठवण झाली. अरे रामा! हें काय? तें काय? हें कशाला? तें कशाला? या तुझ्या प्रश्नास उत्तर देतां देतां पुरे पुरे होई. ज्या शेंकडों गोष्टी तुझ्या नजरेसमोर येत, त्या प्रत्येकीबद्दल तुझ्या प्रश्नास उत्तरें दिल्याशिवाय सुटकाच नव्हती. लहानपणीं तुझी जिज्ञासा फारच प्रबळ होती.

या ठिकाणीं हें सांगितलें पाहिजे कीं, सुंदरी आपल्या

सासूच्या मागोमाग येऊन दरवाजांत मुलाला मांडीवर निजवून बसली होती. सासूच्या तोंडून आपला नवऱ्याच्या लहानपणची प्रशंसा ऐकून तिनें आपल्या पतीकडे पाहिलें. दोघांची नजरानजर झाली, तेव्हां सुंदरी गालच्या गालांत हांसली. त्या वेळीं **सुबोधचंद्र** आईला ह्मणाला "आई! पहा तुझ्या मुलाच्या लहानपणची हकीकत ऐकून तुझी सून हंसते आहे. आई, मी खरोखरच का इतका उत्शृंखल होतों?"

आई—**सुबोध**, मुलें लहानपणीं जितकीं उत्शृंखल असतील तितकीं चांगलीं. तीं तशीं नसतील तर मोठेपणीं तीं मंद होऊन त्यांची जिज्ञासा कमी कमी होत जाते. तूं फार मस्तीखोर होतास; पण तुझ्या अंगीं आज्ञाधारकता हा गुण विशेष होता. मी जें तुला सांगत असें, तें करण्याला तूं अगदीं तत्पर राहीस. ज्या गोष्टीची मी मनाई करीं, ती तूं कधींही केली नाहींस. मात्र तुझ्या उनाडपणाला अवघें घर थरकांप भीत होतें. केव्हां केव्हां घरांतील सर्व मनुष्यें तुला कंटाळत असत. त्यामुळें तूं पुढें सद्गुणी कसा होशील? याविषयीं आह्मांला फार काळजी लागे व तुला सद्गुणी करण्याला काय काय उपाय करावे? हाचे आमचा रात्रंदिवस विचार चाललेला असे.

सुबोध—मला सद्गुणी करण्यासाठीं तुह्मी जो विचार करीत होतां व ज्या उपायांचें अवलंबन केलें होतें, त्यांची आठवण असल्यास ते उपाय आह्मांला सांग; ह्मणजे आह्मीही त्यांचा स्वीकार करूं.

आई—या गोष्टीला किती तरी दिवस होऊन गेले. आतां त्याची आठवण कसची असणार? मी तुमचे विचार ऐकण्याकरितां येथें येऊन बसलें आणि उलटा तूंच माझे विचार ऐकण्याची इच्छा धरतोस! बरें, असो. आह्मीं योजिलेल्या सर्व उपायांचें जरी मला स्मरण नाहीं, तरी जें आहे तें मी सांगतें. जो जशा गुणांचा मनुष्य असतो, त्याला बहुधा तशाच गुणांचीं मनुष्यें होतात. आणि त्याचें कारण इतकेंच कीं, बाहेरील किंवा इतर मनुष्यांशीं त्यांचा परिचय होण्यापेक्षां आपल्या घरांतील मनुष्यांचा स्वभाव, चरित्र, आचार, व्यवहार इ० तीं प्रथम शिकतात. यामुळें जो जसा व्यापार करितो, त्याप्रमाणेंच त्याचीं मुलें-लेंकरेंहीं सहज त्याचें अवलंबन करितात; किंवा त्याविषयीं ज्ञान मिळविण्यास सहज समर्थ होतात. एखाद्या व्यापाऱ्याचा लहान मुलगा दुकानाचें सर्व काम चांगल्या रीतीनें सांभाळितो. एखाद्या शेतकऱ्याच्या मुलास नांगरावें कसें, नांगर धरावा कसा, हें शिकविण्याची फारशी जरूर नसते. त्या दिवशीं पाहिलेंस ना? आपल्या उपाध्यायाचा मुलगा आपल्या खेळगड्यांशीं खेळत असतां आपण उपाध्याय होऊन व आपल्या बापाप्रमाणें आसन ठोकून आणि एक कागद पोथीप्रमाणें हातांत धरून इतर मुलांकडून पूजा करवीत होता. खरेंच, त्याचा तो थाट पाहून मला तर फार आश्चर्य वाटलें. सारांश, आपण अशाच रीतीनें जर तपास केला, तर आपली सहज खात्री होईल कीं, लहान मुलें स्वभावतःच आपल्या आईबापांचें, स्नेहीसंबंध्यांचें आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांचें अनुकरण करीत असतात.

**सुबोध**—एवढ्यांच करितां **आईबापें** सुशिक्षित व सदाचारी असलीं पाहिजेत. आह्मी जर चांगलेपणानें वागलों नाहीं, तर आपला हा मुलगा चांगला कसा होईल?

**आई**—बरोबर आहे. आपण जर अज्ञानी असलों, तर आपल्या हाताखालीं वाढणारीं मुलेंही तशींच होतील. यांत काय संशय? तें असो. मी तुला सुशिक्षित करण्याकरितां जो विचार केला होता, व ज्या मार्गाचें अवलंबन केल्यामुळें आज तुला चांगल्या स्थितींत पहात आहें, ते विचार व तो मार्ग याविषयीं तुला कांहीं सांगतें. तूं पाहिलें असशील कीं, एखादें सहासात महिन्यांचें बालक दूध पीत असतां चळ घेऊन हट्टानें दूध पीत नाहींसें होतें. त्यावेळीं दास-दासी किंवा त्याची शुभचिंतक माता—जणो बालकाच्या भावी स्वतंत्रतेचा अंकूर चुरडून टाकण्याच्या हेतूनेंच—गंभीर स्वरानें त्याला सांगूं लागतात "हॉं, पी! तें पहा म्याऊं आलें, तो बघ बागुलबावा आला." असें सांगून मुलांच्या निर्भय अंतःकरणांत भयाचा संचार करितात. कल्पित गोष्टींच्या भीतीनें बालकांची करमणूक, कौतुक, बळ, हिम्मत, व सद्-भिमान यांना कमीपणा येतो. सुंदर बालकांचें विमल चित्त कल्पित भीतीनें मलीन करणें हें किती खेदास्पद आहे? नुक्ता ज्ञानाचा उदय होत आहे तोंच कल्पित भीतीचा त्यांच्या मनांत संचार करून देणें हें किती वाईट आहे बरें?

**सुबोध**—बरोबर सांगितलेंस आई! तूं ह्मणतेस तशी मीं पुष्कळ मातांची स्थिति पाहिली आहे. अशा करणीनें

बाळकांची हिम्मत व सामर्थ्य यांना धक्का बसण्याचा संभव असतो. व अशा कुशिक्षणानें तीं मुलें वयांत आलीं ह्मणजे त्यांचें फार नुकसान होतें; इतकेंच नव्हे तर त्यांचें एकंदर जीवनचरित्रही दुःखास्पद होतें.

आई—थोडे दिवसांपूर्वी आपली सुंदरी मुलाला पाजीत असतां त्याला भेवडावीत होती. पण, मीं तें पाहिलें आणि तिला समजावून सांगितलें कीं, मुली, लहान मुलांना अशा रीतीनें भय दाखविलें, तर तीं पुढें भ्याड होतात. ह्मणून तूं असें कधीं करीत जाऊं नको.

सासूबाईचें हें बोलणें ऐकून सुंदरी किंचित् पुढें झाली आणि ह्मणाली, "तेव्हांपासून मीं ती संवय अगदीं टाकिली. आणि असें करण्यानें मुलांचें पुढें नुकसान होईल खरें; असें मला वाटूं लागलें आहे.

आई—आपले दोष आपल्याला समजत नाहींत व समजले तर त्यांविषयीं कोणी विचारही करीत नाहीं; त्यामुळें आह्मांत पुष्कळ दोष व न्यूनता राहते. आपण ती समजून घेऊन सुधारणा करण्याचा जर कोणी निश्चय केला, तर फार चांगलें होईल. आपण आपल्या आचरणानें मुलांचें फार नुकसान करितों, अशा हजारों गोष्टी दाखवितां येतील. एखाद्या मुलाला त्याची इच्छित वस्तु मिळाली नाहीं, ह्मणजे तें रडूं लागतें. त्याला आकाशचा चंद्रमा, हरण, हत्ती, घोडा, दुकानची मिठाई वगैरे पदार्थांची लालुच दाखवून त्याची समजूत करण्याशिवाय दुसरा उपायच आमच्या बायकांना समजत नाहीं. ह्यामुळें त्याचा विषमय परिणाम असा होतो कीं, मुलें सहज असत्य

बोलायला शिकतात आणि दुसऱ्याविषयीं त्यांच्या मनांत अविश्वास उत्पन्न होतो.

**सुबोधचंद्र**—आई, हें खरें! अशीच एक गोष्ट एका सन्मान्य गृहस्थाच्या घरीं घडली होती. त्यानें स्वतः ती एका मित्राला सांगितली. एके दिवशीं त्याच्या मुलाची दाई त्या मुलाला मिठाई देण्याची आशा दाखवून त्याची समजूत करीत होती. तो मुलगा मिठाईच्या आशेनें निवांत राहिला. परंतु, त्या धूर्त दाईनें मध्यें दुसऱ्या गोष्टी काढून मिठाईबद्दल त्याला विसर पाडला. हें तिचें कृत्य पाहून त्या मुलाच्या बापानें त्या दाईला आपल्याजवळ बोलावून विचारिलें, "बाई, मीं तुझें कांहीं नुकसान केलें नसतां तूं माझें नुकसान करण्यास प्रवृत्त कां झालीस?" हें ऐकून त्या दाईला फार आश्चर्य वाटलें व भयाभीत होऊन ह्मणाली "महाराज! मीं काय अपराध केला हें मला समजत नाहीं." यावर त्या गृहस्थानें तिनें केलेल्या गोष्टीची आठवण तिला देऊन सांगितलें, "माझ्या मुलाला एव्हांपासून तूं खोटें बोलायला शिकवते आहेस, यापेक्षां दुसरा मोठा अपराध तो कोणता?" असें बोलून त्या दाईजवळ कांहीं पैसे दिले आणि त्याची मिठाई आणवून त्या मुलाला दिली.

आई—त्या बिचाऱ्या दाईला यांत काय समजणार? मुलांच्या आयांना तरी इतकें कोठें समजतें? व त्या आया तरी विचार थोडाच करीत असतात! खरेंच तुझ्याबरोबर बोलतां बोलतां मला पुष्कळ गोष्टींची आठवण झाली आहे. तुला माहीत असेल कीं नाहीं हें

माझ्यानें सांगवत नाहीं. पण, मीं पुष्कळ वेळ पाहिलें आहे आणि कदाचित् दैवयोगानें अथवा असावधतेनेंही मजकडून तसें काम होऊं नये अशाबद्द लआस्थापूर्वक मीं तत्पर असतें. पहा कीं, सर्व लोकांकडे सर्वच वस्तु असतात असें नाहीं. संसारांत पुष्कळ वेळ दुसऱ्याकडून उसनवार जिन्नस आणून आपलें काम करून घ्यावें लागतें. एकदां मी एका गृहस्थाच्या घरीं गेलें होतें, तेव्हां त्याच्या शेजारचा एक मनुष्य कुऱ्हाड मागण्या-करितां त्याजकडे आला. त्या वेळीं त्या गृहस्थानें आपल्या चार वर्षांच्या मुलासमक्ष "कुऱ्हाडीची धार अगदीं मोडली आहे, तिनें लांकडें तुटणार नाहींत." असें सांगितलें. परंतु, चार घटकांपूर्वीच त्या कुऱ्हाडीनें त्यानें लांकडें तोडलीं होतीं हें त्याच्या मुलाला माहीत होतें. मुलें स्वाभाविकच चौकस असतात. त्यामुळें तो मुलगा लाग-लाच कुऱ्हाड पहायला गेला. तेव्हां, अर्थात् ती कुऱ्हाड चांगली दुरुस्त आहे असें त्याच्या नजरेस पडलें. यावरू-न त्या मुलाला काय वाटलें असेल बरें! आणखी असेंही पाहण्यांत येतें कीं, एखाद्या गृहस्थाकडे त्याचा सावकार किंवा त्याचा शिपाई आपलें येणें मागण्याकरितां आला, तर तो गृहस्थ घरांत आपल्या मुलाला सांगतो कीं, "बाबा घरीं नाहींत असें त्याला जाऊन सांग" यावरून जरूर पडेल तर खोटें बोलण्याला कांहीं हरकत नाहीं असें तो अज्ञान मुलगा शिकत नाहीं काय? अशा तऱ्हेचे हजारों प्रसंग मुलांच्या नजरेस पडतात. तेव्हां अशा स्थितींत मुलें सत्यवादि होतील अशी आशा करणें व्यर्थ आहे.

सुंदरी—कुऱ्हाड, पळीभर तेल, किंवा रतिभार मीठ अशा क्षुल्लक वस्तूंकरितां स्त्रिया असत्य बोलतात हें कांहीं खोटें नव्हे. पण, सर्वच ह्मणजे अशा असतात असें नाहीं.

सुबोध—जीं मनुष्यें अशीं नसतात, त्यांचींच मुलें सद्गुणी होतील. जीं आईबापें धर्मनिष्ठ, सच्चरित्र आणि सुशील असतात, तीं आपल्या सदाचरणानें सुसंतानरूपी उत्तम फळ मिळवितात. आतां कांहीं कांहीं ठिकाणीं याला अपवाद दिसतात खरे; पण त्याला कांहीं विशेष कारणें असतात. तीं मागाहून सांगेन.

आई—पुष्कळ वेळ असेंही पाहण्यांत येतें कीं, आईबाप आपल्या मुलांची हरएक मागणी पुरी करण्याविषयीं तत्पर असतात. मागणी योग्य असो किंवा अयोग्य असो; त्याचा विचार न करितां मुलांची प्रत्येक आळ पुरविण्याकडे त्यांचा कल असतो. पण, मुलांच्या मागण्या केव्हां केव्हां इतक्या विलक्षण असतात कीं, त्या पुऱ्या करणें कोणाच्याही स्वाधीन नसतें. रात्रीच्या वेळीं मुलानें ऊन्ह मागितलें, किंवा चांदोबा मला खेळायला दे अशी मागणी केली, तर ती पुरी करणें कोणाच्या स्वाधीन आहे? तेव्हां आरंभापासूनच आईबापांनीं या गोष्टींत तारतम्य ठेविलें पाहिजे.

सुंदरी—मी माझ्या मामाला आपल्या मुलाचे असे बेसुमार लाड करितांना पाहिलें आहे कीं, मामा व मामी हीं दोघेंही त्या मुलाचें प्रत्येक ह्मणणें व प्रत्येक मागणी पुरी करण्याविषयीं झटत असतात. त्यामुळें तो मुलगा

अगदीं नादान होऊन गेला आहे. लिहिण्या वाचण्याकडे त्याचें बिलकूल लक्ष्य नाहीं. एकसारखी टवाळकी चाललेली असते. यामुळें त्याच्याविषयीं आईबापांकडे पुष्कळ कागाळ्या येतात. परंतु, 'आपल्या मुलाचा त्यांत कांहीं दोष नाहीं.' असें सांगून त्या कागाळी आणणारावरोबर उलट तीं भांडायला उठतात.

आई—आई आपल्या बापाचें ऐकत नाहीं, आणि बापही आईकडे तुच्छभावानें वागतो हें जर मुलांनीं पाहिलें, तर तीं मुलेंही त्या आईबापांच्या आज्ञेंत राहणार नाहींत. यासाठींच मी तुझ्यासमक्ष कधीं विवाद करीत नसें, कोणत्याही तऱ्हेचे वाईट शब्द कधीं बोलत नसें, व मनाची अप्रसन्नताही कधीं दाखविली नाहीं. परंतु, पुष्कळ ठिकाणीं याच्या उलट प्रकार नजरेस पडतो. ह्मणजे बापाचा अपमान करायला मुलांना आई शिकवते. तसेंच आईला शिव्या द्यायला किंवा तिचा अपमान करायला मुलांना बाप शिकवितो. असें तुझ्याही पुष्कळ पाहण्यांत आलें असेल.

सुबोध—माझ्या एका मित्रानें एक गोष्ट सांगितलेली मला आठवते ती ही कीं, एका प्रसिद्ध पण दरिद्री अशा गृहस्थानें आपल्या मुलाकरितां एक आंगरखा तयार करून आणला होता. तो त्याच्या गरीब स्थितीला अनुसरून असल्यामुळें भपकेदार नव्हता. ह्मणून त्या मुलानें तो फेंकून दिला. आणि दुसऱ्या एका शेजारच्या मुलाचें नांव घेऊन "त्याच्यासारखा आंगरखा असला तर मी घेईन" असें ह्मणाला. यावर त्याच्या बापानें "मी त्याच्या बापासारखा श्रीमान् नाहीं. तसा असतों,

तर तुला त्यापेक्षांही चांगला आंगरखा दिला असता. मी आपल्या स्थितीप्रमाणें हा तुला दिला हेंच जास्त समज" अशा तऱ्हेनें पुष्कळ समजुतीच्या गोष्टी सांगत असतां त्या मुलाची आई आपली संसारिक स्थिति विसरून जाऊन आपल्या मुलाचा पक्ष घेऊन उठली आणि मुलाला ह्मणाली "तूं असला भिकार आंगरखा मुळींच घेऊं नको." हें आपल्या स्त्रीचें अयोग्य आचरण पाहून तो गृहस्थ व्यथित आणि क्षुब्ध होऊन बोलला, "आपणच आपल्या मुलांच्या अधोगतीला कारण होतों. आपली अवस्था गरीब असल्यामुळें उंचीउंची वस्त्रें आपल्याला घेतां येत नाहींत. ही गोष्ट मुलांना आपण समजून दिली पाहिजे. हें तूं न करितां उलट हा आंगरखा तूं घेऊं नको ह्मणून सांगतेस याला ह्मणावें तरी काय? या तुझ्या कृतीनें त्या मुलाचें नुकसान आणि कुटुंबांत अशांति मात्र उत्पन्न होणार. तूं मुलाला जी सल्ला देतेस, त्याचा फार अनिष्ट परिणाम होईल. लहानपणापासूनच आईबापांची आज्ञा मानण्याविषयीं मुलांना शिकविलें पाहिजे. आणि तसें वळण जर त्यांना दाखविलें नाहीं, तर तीं आपला हुकूम कधींही मानणार नाहींत. यावरून तुझें हें करणें किती भयंकर आहे तें पहा! मी तुलाच विचारतों कीं, या मुलानें कोणाच्या सांगण्याप्रमाणें वागावें बरें? पहा, तुझा हा हुकूम तो मानील तर त्यांत माझी अवज्ञा होणार! बरें, माझ्या मताप्रमाणें तो वागेल, तर त्यांत तुझी अमर्यादा केल्यासारखें होणार. अशा कृतीनेंच मुलें आज्ञाभंग करणारीं अशीं होतात." असो. त्या गृहस्थानें आपल्या मुलाला लाडिकपणानें सांगितलें कीं, "हा

आंगरखा आणला आहे तो तूं घे. दुसऱ्या वेळेला तुला एक फक्कड आंगरखा आणून देईन. आणि जर हें तूं माझें सांगणें ऐकिलें नाहींस, तर आजपर्यंत ज्या तुला चांगल्या चांगल्या वस्तु दिल्या आहेत, त्या सर्व काढून घेईन" हें ऐकून मुलानें तो आंगरखा अंगांत घातला.

आई—तूं जी गोष्ट सांगितलीस, त्यांत त्या गृहस्थाचें बोलणें मला फार पसंत पडलें. यावरून तो गृहस्थ फार सूज्ञ होता हें खचीत.

सुबोध—होय, आई! तो खरोखरच सूज्ञ होता.

आई—हें ऐकून मला दोन गोष्टींची आठवण झाली आहे, त्या तुला आतांच सांगून टाकतें. कारण, ह्मातारपणा-मुळें सर्वच गोष्टी एकदम लक्ष्यांत येत नाहींत. एखादा मुलगा किंवा मुलगी चांगला अभ्यास करील, जरा सुशील आणि शांतभाव दाखवील, तर त्याचे आईबाप व दुसरीं आप्त मनुष्यें त्याच्यासमक्ष त्याची प्रशंसा करितात. त्यामुळें तीं अल्पबुद्धि व चंचळ विचाराचीं मुलें चढून जातात. मीं अनेक ठिकाणीं असें पाहिलें आहे कीं, पुष्कळ मुलें आत्मप्रशंसेमुळें गर्विष्ठ होऊन जीवनमार्गांत उन्नत्ति मिळविण्याला असमर्थ झालीं आहेत.

सुंदरी—तर काय मुलांच्या चांगल्या कामासाठीं देखील त्यांची स्तुति करणें अयोग्य? अशा रीतीनें जर त्यांना उत्साह मिळाला नाहीं, तर पुढें आयुष्यांत सुकी-र्ति मिळविण्याला त्यांना उत्साह तरी कसा येईल?

आई—छीः ग! मुलांना उत्साह देऊं नये असें मीं ह्मणत नाहीं. त्यांचें चांगलें काम पाहून त्यांना मदत

करावी, आपल्या सुधारणेविषयीं जर तीं प्रयत्न करीत असलीं, तर तो पाहून आदर किंवा स्नेहभाव त्यांना दाखवावा; हें आपलें कर्तव्यच होय. इतकेंच नव्हे तर मुलांच्या जीवनांत जे कांहीं चांगले गुण पाहण्याची आपली इच्छा असेल, त्यांचें बीज हळूहळू त्यांच्या मनांत प्रवेश करीत आहे कीं नाहीं तेंदेखील लक्ष्यपूर्वक पाहिलें पाहिजे.

दुसरी गोष्ट अशी आहे कीं, तुला स्मृति असेल कीं नाहीं कोण जाणे. पण, मी प्रथम ह्मणालें होतें कीं, सुबोधचंद्राच्या दंगामस्तीनें अवघें घर कांपत असे. पुष्कळ वेळ तुझ्या त्रासानें लोकांस दुःख होई. परंतु, आह्मीं एक वेळदेखील असें ह्मटलें नाहीं कीं, "सुबोध आमच्या धाकांत नाहीं किंवा त्याला आज्ञेंत ठेवण्यास आह्मी असमर्थ आहों." त्याचें कारण इतकेंच कीं, एक वेळ मुलांस आपलीं मातापितरें आपल्याला शासनांत ठेवण्यास असमर्थ आहेत असें वाटलें, ह्मणजे मग तीं कोणाचेंही ऐकत नाहींत.

तिसऱ्या एका गोष्टीचें स्मरण झालें. मुलगा असो किंवा मुलगी असो, एकदां त्यांनीं आपल्या मातेला त्रासदायक व वाईट बोलणारी, आणि पित्याला निष्ठुर, जुलमी, व नेहमीं दुःख देणारा असें ओळखिलें, ह्मणजे मग त्यांची सुमनुष्य होण्याची आशाच करायला नको.

**सुबोध**—अगदीं खरें बोललीस आई! असाच एक प्रकार मीं स्वतः पाहिला आहे. मी उत्तर हिंदुस्थानांत होतों, तेव्हां तिकडील बऱ्याच लोकांशीं माझें दळणवळण,

जाणेंयेणें व स्नेहभाव होता. एके दिवशीं आह्मीं बरीच मित्रमंडळी फिरावयास गेलों होतों. तेव्हां त्यांतील एक गृहस्थ अनावधतेनें अति अपवित्रभावयुक्त कांहीं गोष्ट सांगूं लागला. त्यासरसा मीं त्याचा तिरस्कार केला. मला माहीत होतें कीं, तो एका प्रतिष्ठीत कायस्थकुळांत जन्मला आहे. मी त्याला त्याच्या कुटुंबाची मानमर्यादा आणि त्यानें जें शिक्षण मिळविलें होतें, त्याचें स्मरण देऊन फारच तीव्रभावानें टपका देऊं लागलों. तेव्हां तो फार लाजला, आणि अपमानित होऊन आपण केलेल्या अपराधाबद्दल वारंवार क्षमा मागूं लागला. व आपल्या बालमित्रांस संबोधून ह्मणाला "मित्र हो, मीं तुह्मांला कितीएक वेळ सांगितलें असेल कीं, जेव्हां तुह्मी माझें असें अन्यायाचरण पहाल, तेव्हां मला चांगली शिक्षा करा. पण, ती तुमच्याकडून होत नाहीं; आणि माझा स्वभाव सुधारावा ह्मणून मात्र आशा करितां, ती कशी सफल व्हावी?,, त्याचे युवक स्नेही मला सांगूं लागले, "अहो, हा अलीकडे बराच सुधारला आहे." तेव्हां तो मनुष्य आपल्या परिवारांतील वडिलांच्या वाईट वर्तणूकेच्या गोष्टी सांगूं लागला. तो ह्मणाला, "महाशय! ह्या नीच कृत्यांत खरोखरच माझा अन्याय नाहीं. मी पुष्कळ खटपट करितों; पण बालकालांतील संशय सुटत नाहीं. त्याला मी तरी काय करूं? जेव्हां मी लहान होतों, तेव्हांपासून माझी आई, वडील बहिणी व इतर मंडळी यांच्याशीं-क्रोधांध असेल तेव्हांची गोष्ट निराळी पण—सामान्य काळींही विरक्त होऊन माझा बाप ज्या रीतीचे नीच शब्द उच्चारत होता, त्याच प्रकारचें सर्वांचें आच-

रण असे. मग त्यांच्या सहवासानें माझा स्वभाव तिरस्कारणीय झाला यांत नवल काय? जें घर कुशिक्षणाचें केवळ विस्तृत क्षेत्र, त्यांत उत्पन्न होऊन आणि अशा मनुष्याच्या सहवासांत लहानाचा थोर होऊन मी सभ्य स्वभावाचा मनुष्य होईन; अशी आशाच करायला नको!

आई—दुसरी एक महत्वाची गोष्ट अशी आहे कीं, मुलगा लहानपणापासून कोणत्या स्वभावाच्या मुलांशीं खेळत आहे, याविषयीं आईबापांनीं फारच जपलें पाहिजे. त्याकडे जर लक्ष्य दिलें नाहीं, तर मुलांच्या कल्याणाची आशाच करायला नको. कारण, निसर्गतःच वाईट मुलांची संगत त्यांना आधीं लागावयाची. तुझ्याबद्दल आह्मीं फार खबरदारी घेतली होती, ह्मणूनच तुझ्यासारख्या सुपुत्राची आई होऊन आज मी आनंदांत आहें. याविषयीं मीं तुला पुष्कळ सांगितलें आहे; तें लक्ष्यांत ठेवून तूं आपल्या मुलाला सुकीर्तिवान् करण्याविषयीं प्रयत्न कर; ह्मणजे तुला व मला फार समाधान वाटेल.

सुबोध—आई, तूं जें सांगितलेंस, तें खरोखरच विचारणीय आहे. कारण, "ज्या जैसी संगति, त्यासि तैसी गति; संगतीनें रीति, सर्व कांहीं." या पूज्य साधूच्या वचनांतही हाच उपदेश आहे. विलायतेंतील एका पंडितानें ह्मटलें आहे कीं, "जी माता आपलें मूल दूध पीत नाहीं ह्मणून त्याचे हात धरून त्याला दरडाविते, वाघिणीसारखी गुरगुरत त्याच्या अंगावर जाते, ती आपल्या लेंकरास नीतिशिक्षण काय देणार? दाराच्या फटींत बोट चेंगरून गेल्यामुळें मूल रडून आक्रोश करीत आहे

तरी त्याचें बोट बाहेर न काढितां जो बाप उलट लेंकराच्या अंगावर धांवून त्वेषानें त्याला चोपीत असतो, रागें भरत असतो, संतापतो, त्याच्या अंगीं न्यायबुद्धीचा अंश कितीसा असणार? तसेंच एखादें मूल रस्त्यांत पडून त्याचा हात-पाय दुखावला, तर तो बरा होण्यासाठीं औ-षध-पाणी न करितां मूल घरीं येतांच त्यावर रागानें अपशब्दांचा भडिमार करावयाचा; अशा आईबापांकडून मुलांना सुशिक्षण कसचें मिळणार? अशीं आईबापें थोडीं-थोडकीं नाहींत. पुष्कळ आहेत! बहुधा घरोघर असे प्रकार आहेत असें ह्मटलें तरी चालेल. आपल्या देशांत तर असे प्रकार पुष्कळांनीं पाहिले असतील. अशा स्थि-तींत मुलांना फार त्रास होऊन त्यांच्या मनांत सुविचार कधींच येणार नाहींत. आईबापांबद्दल तर त्यां-च्या मनांत तिरस्कारबुद्धि सतत जागृत राहील. अशी स्थिति पुष्कळ ठिकाणीं अनुभवास येते. बापाचें तोंड मुलगा पहात नाहीं. मुलग्याला बाप दृष्टीसमोर नको. बापाच्या पश्चात दुर्दैवानें आई जिवंत असल्यास तिला बहुतकरून निराळीच चूल पेटविण्याची पाळी यावी. कारण, सास्वा-सुनांचें जमत नाहीं. अशीं शेंकडों उदाहरणें देतां येतील. पण, याचें कारण मुलांच्या लहानपणच्या शिक्षणांतच असतें. याबद्दल मात्र कोणी विचार करीत नाहीं. पहा! कित्येक ठिकाणीं असेही प्रकार आढळतील कीं, मुलें आजारी पडलीं ह्मणजे त्यांच्या माता त्यांस मारूं लागतात! मरणोन्मुख झालेल्या मुलांस औषधोपचार करीत असतां त्या वेळींही पुष्कळ आया शिव्या देणाऱ्या किंवा कर्कश वचनें बोलणाऱ्या सांपडतील. "मेल्या"

"शिंच्या" "कपाळकरंट्या" "फुटक्या कपाळाच्या" इ० अपशब्दांची त्यांजवर वृष्टी होत असावयाची! मग मातेचा असा खेदास्पद स्वभाव असल्यावर मातापुत्रांत कधींही सलोखा राहणार नाहीं यांत कांहीं नवल नाहीं. प्रत्यक्ष बापच जर कठोर शब्दांनीं मुलाची समजूत करूं लागला, तर त्या मुलाचा स्वभाव कशा प्रकारचा होईल हें निराळें सांगितलें पाहिजे काय? यामुळेंच पितापुत्रांत भिन्नभाव अवलोकनांत येतो. मुलगा ज्या वेळीं उडण्या-बागडण्यांत, खेळण्यांत किंवा एखादी गम्मत पाहण्यांत रममाण झालेला असेल, त्या वेळीं आईबापांनीं त्याला रागें भरून त्याच्या मनाला नीरस वाटणाऱ्या एखाद्या कामाकडे गुंतवून देणें ह्मणजे त्याच्या मनाचा उत्साहभंग होऊन त्याची निराशा करणें होय. एखादे वेळीं आईबापांस मुलांना घेऊन गाडींतून प्रवास करण्याचा प्रसंग आला ह्मणजे स्वाभाविकच मुलांची बाह्य वस्तूंच्या दर्शनाकडे कौतूहलपूर्वक प्रवृत्ति होते; परंतु गाडी चालू असल्यामुळें आईबाप त्यांना उभें राहून गम्मत पहायला देत नाहींत; त्यामुळें त्याचा विरस होतो व त्या आईबापांविषयीं त्यांच्या मनांत असद्भाव उत्पन्न होऊन त्यांच्या मनांतील प्रेमभावही कमी-कमी होत जातो. व तोच वाढत जाऊन त्या मुलांचें आचरण निंद्य होतें."

आई—तूं आतां सांगितलेंस तशा प्रकारची एक गोष्ट मीं स्वतः पाहिली आहे. तूं त्या दुल्लभरायाला ओळखतोस? तो लहान असतां एका वेळीं झाडावरून पडून त्याचा हात दुखावला. आसपासच्या लोकांनीं त्याला वरीं आणल्यावर त्याच्या भयंकर दुखापतीचा विचार

न करितां केवळ निर्दयपणानें त्याच्या बापानें त्याला इतका मारला कीं, त्याला जी थोडीशी शुद्ध आली होती ती पुनः नाहींशी होऊन तो मूर्च्छित पडला. आणि याबद्दल जवळच्या लोकांनीं त्या निर्दय अविचारी बापाला दोषही दि- ला! सुबोध, तूं बरोबर सांगितलेंस. आईबापांच्या निष्ठुर व असभ्य आचरणानें मुलें वाईट स्वभावाचीं होतात. यांत कांहीं संशय नाहीं.

सुबोध—आज इतकेंच पुरे करूं; आतां मला बा- हेर जायचें आहे.

---

## प्रकरण चौथें.

मध्यें एक आठवडा गेला. मागील रविवारीं जें संभाषण झालें होतें, तें सुंदरीनें लक्ष्यपूर्वक ऐकलें असल्यामुळें ति- च्या मनांत तो विषय ठसून गेला होता व त्याविषयींच तिचा एकसारखा विचार चाललेला असे. त्या रविवारीं दुपारीं त्यांना एकत्र बसायला सांपडलें नाहीं. कारण, सुबोधचंद्राला एका स्नेह्याकडे मेजवानीस आमंत्रण होतें व त्याच्या मातोश्रीची तब्येतही ठीक नव्हती. त्यामुळें तीं त्या संभाषणांत नव्हतीं.

सुबोधचंद्र घरीं आल्यावर कांहीं वेळानें सुंदरी त्याला ह्मणाली "गेल्या रविवारीं सासुबाईनीं सबळ कारणें दाखवून आईबापांच्या दोषानेंच मुलें सद्गुणी होत नाहींत असें सिद्ध केलें होतें व आपणही उदाहरणें देऊन असें दाखविलें होतें कीं, आपणच आपल्या मुलांचे

नुकसानीस कारण होतो. आज त्याविषयींच आणखी कांहीं सांगायचें ना?"

सुबोध—होय सांगतो. कुटुंबव्यवस्थेंत नेहमीं जे अशिक्षणाचे प्रकार घडतात आणि त्यामुळें बालकांच्या कोमल व सरळ अंतःकरणांत जे मलीन विकार उत्पन्न होतात, ते होऊं नयेत ह्मणून या विषयाची जितकी जास्त चर्चा करावी व जितकें समजून घ्यावें तितकें थोडेंच आहे. दोन चार गोष्टींनींच हा महत्वाचा विषय पुरा होणार नाहीं. आईनें जें कांहीं सांगितलें, तें केवळ मला मनुष्यपणांत आणण्यासाठीं अवलंबन केलेल्या मार्गाचा थोडासा भाग होता. ज्या तिच्या उपायांनीं मी या स्थितीला आलों, ते उपाय अनुकरण करण्यासारखे आहेत. परंतु, ते तादृश महत्वाचे नाहींत. कारण, माझ्यासारखा मनुष्य ह्मणजे मानवसमाजाला भूषणास्पद नव्हे. मला लहानपणापासून चांगलें शिक्षण मिळाल्यामुळें मनुष्यत्वाचे कित्येक गूण माझ्या अंगीं आले आहेत. परंतु, समाजांत याची काय किंमत आहे? वास्तविक पाहिलें तर ही कांहीं खरी उन्नत्ति नव्हे. "मी कांहीं वाईट काम करीत नाहीं" हें ह्मणजे मोठेंसें भूषण आहे असें नाहीं. मनुष्य असून पशुवृत्तीचें आचरण करीत नाहीं हा काय प्रशंसेचा विषय? ही प्रशंसा कसली?

सुंदरी—वाईट काम केल्यानें मनुष्य जर निंदनीय होतो, तर जो मनुष्य निंद्य गोष्टींपासून लांब राहून व्यवहारांत वागतो तो अवश्य वंदनीय झालाच पाहिजे. अशा मनुष्यत्वाचें गौरव कां न व्हावें हें मला समजत नाहीं.

सुबोध०—वाईट काम न करणें आणि सौजन्य मिळविणें यांत मोठा भेद आहे. कोणतेंही खराब काम करण्याकडे प्रवृत्ति नसून चांगलेपणानें आपलें आयुष्य घालविण्याचा एक प्रकार; आणि ज्ञानसंपादनानें जीवनभांडार सुसमृद्ध करून त्यांतील थोडथोडा अंश जनमंडळाची शोभा वाढविण्याकडे व आपल्या आत्म्याचें चिरकालीक कल्याण करण्याकडे खर्च करणें हा दुसरा प्रकार. माझ्यासारख्या माणसाच्या जीवनचरित्रांत दुसरा गुण अल्प प्रमाणानेंही दिसून येणार नाहीं; ह्मणूनच मी आपल्याला धन्य समजत नाहीं. मनुष्यांत असा कांहीं तरी गुण पाहिजे कीं, त्याचें नांव ऐकल्याबरोबर जनसमूहाचीं मनें प्रसन्न झालीं पाहिजेत. आणि त्याच गुणाबद्दल अनुक्रमें एकेक गोष्ट तुला सांगण्याचा माझा विचार आहे.

सुंदरी—गेल्या रविवारीं सासुबाई असल्यामुळें मी पुष्कळ गोष्टी विचारल्या नाहींत. त्या दिवशीं एका इंग्रजी पुस्तकांतून वाचून दाखविलें होतें कीं, "लहान मुलें जें पाहतात, ऐकतात किंवा मिळवितात त्याविषयीं आपल्या आकलन शक्तीप्रमाणें त्याचें ज्ञान मिळवून तेंच पुढें तीं मोठमोठ्या कामाकडे लावितात." याचा अर्थ काय? त्या दिवशीं मी त्याचा अर्थ चांगलासा समजलें नाहीं.

सुबोध०—एखादें सुरेखसें फूल मुलाच्यापुढें धरलें, तर तें मूल आश्चर्ययुक्त होऊन त्या फुलाकडे टकमक पहात रहातें. तसेंच एखादें मंजूळ वाद्य वाजविलें किंवा गाणें ह्मटलें, तर तें मूल चित्त देऊन ऐकूं लागतें हें तूं

पाहिलें आहेसच. मुलांना झोंप लागण्यासाठीं गाणीं ह्मणण्याची रीति सर्व लोकांत आहे. याचें कारण इतकेंच कीं, लहानपणीं मुलांची पृथ्वींतील सर्व वस्तूंचें ज्ञान प्राप्त करून घेण्याची जिज्ञासा प्रबळ असते; आणि सुदैवानें ही जिज्ञासा, त्या मुलांचे आईबाप, सोयरेधायरे, शेजारीपाजारी यांच्या सुवर्तनानें प्रज्वलित अग्निज्वालेप्रमाणें वृद्धिंगत होत राहील, तर ही पृथ्वी व हें अनंत विश्वराज्य त्या मुलांचें नेहमींचें खेळणें होणार आहे. व असें झाल्यामुळेंच आज **न्यूटन, ग्यालिलियो, आर्यभट्ट, भास्कराचार्य, वराहमिहिर, ऍडिसन, स्पेन्सर** इत्यादिकांच्या नांवानें ही पृथ्वी गौरवभरित झाली आहे. सदरहु महात्म्यांना लहानपणीं उत्तम शिक्षण मिळाल्यामुळेंच त्यांनीं या अपार, अनंत, अतर्क्य अशा विश्वांतील रत्नांचा शोध लाविला. यावरून लहानपणचें शिक्षण किती महत्वाचें आहे बरें?

**सुंदरी**—आतां मात्र माझ्या पूर्ण लक्ष्यांत आलें. आतां बालसंगोपनाविषयीं आणखी कांहीं सांगायचें असेल तें सांगावें.

सुबोध०—याविषयीं सांगावें तितकें थोडेंच आहे. पण, सर्वच गोष्टींची एकदम आठवण होत नाहीं. बोलतां बोलतां जसजसा ओघ येईल, तसतशी एकेक गोष्ट तुला समजून देईन. आज दोन गोष्टींबद्दल तुला सांगायचें आहे. आपल्या देशांत लहान मुलांना आईबाप सांगत असतात कीं, "मुला, जर तूं लक्ष्यपूर्वक अभ्यास केला नाहींस, तर पुढें काय खाशील? चार पैसे जर तुला

मिळाले नाहींत, तर तुला खायाला कोण घालणार आहे?"
"उन्नतचरित व्हावें, ज्ञानाची मनोहर ज्योति संपादन करावी, धर्म आणि नीति या रत्नांनीं आपला जीवनस्तंभ स्थापन करावा." याबद्दल काळजी घेण्याचें सोडून पैसा मिळविणें हेंच मनुष्याचें जीवनसार्थक आहे अशा कुशिक्षेचें विषयबीज मुलांच्या कोमल मनांत रोवून आपण आपल्या देशाचें सर्वस्वी नुकसान करीत आहों. सुशिक्षित मनुष्य पैसा मिळवून आपला निर्वाह करील यांत काय संदेह आहे? त्याला काय लहानपणींच शिक्षणाबरोबर द्रव्यार्जनाची खोटी चिंता लावून दिली पाहिजे? आपल्या देशांत जे सुशिक्षित वर्गामध्यें सध्या मोडतात, त्यांनीं लहानपणच्या शिक्षणावरून जी उन्नति मिळविली आहे, त्यापेक्षां विद्यार्जन हें द्रव्यार्जनाकरितांच नव्हे तर ज्ञानार्जनाकरितां आहे अशा उपदेशाचा ठसा जर त्यांच्या मनावर बालपणीं ठसला असता, तर त्यांनीं यापेक्षां अधिक उन्नति मिळविली नसती काय? ते मनुष्यजीवनांतील अतिश्रेष्ठ व अतिमहत्वाचें कर्तव्य काय तें ठरवून तें अमलांत आणण्यासाठीं सतत उद्योग करीत राहिले असते; यांत कांहीं संशय नाहीं. याकरितां मी असें ह्मणतों कीं, द्रव्यार्जनाकरितांच आईबापें लहानपणापासून आपणाकडून विद्याभ्यास करवितात असें मुलांना कधींही वाटतां नये. दुसरी गोष्ट अशी आहे कीं, स्नेह आणि शुभेच्छा यां विरहित कठोर शासन करणें हें कोमल मनाच्या मुलांना अति अपायकारक आहे. ज्या वेळीं शिक्षा करण्याचा प्रसंगच येईल, त्या वेळीं शिक्षा करणाराचें मन प्रसन्न व

प्रेमयुक्त असलें पाहिजे. परंतु, पुष्कळ वेळ रागाच्या आवेशांत आपलें कर्तव्य विसरून जाऊन आपण शिक्षा करतों ती फार कडक होते. व असें होणें अगदीं वाईट आहे. पण, शिक्षा करतांना ही एक गोष्ट लक्ष्यांत असली पाहिजे कीं, अपराधानुरूप शिक्षा झाली पाहिजे. नाहींतर लहान अपराधाला मोठी शिक्षा व मोठ्या अपराधाला लहान शिक्षा किंवा एखादे वेळीं तिकडे मुळींच दुर्लक्ष्य करणें यामुळें मुलें हळूहळू अपराधाविषयीं निर्भय होत जातात. अपराध झाला कीं अपराधानुरूप शिक्षा व्हावयाची असा मुलांचा ग्रह झाला पाहिजे. याकरितां शिक्षा करते वेळीं अपराधाचें स्थान, कारण व योग्यता यांचा विचार करणें चांगल्या आईबापांचें अवश्य कर्तव्य आहे.

या वेळीं सुंदरीचें मुखकमल चिंता व खेद यांनीं युक्त असें पाहून सुबोधचंद्र तिला ह्मणाला "तूं निराश होऊं नको. कारण, आपण आस्थापूर्वक आपलें काम बजावीत आहों. जें आमचें कर्तव्य असें आह्मी समजतों त्याला अनुसरूनच आमचें वर्तन आहे. दुसऱ्या कोणत्या मार्गाचें अवलंबन केल्यानें अथवा कोणते ग्रंथ वाचल्यानें या विषयाचें ज्ञान वाढेल याविषयीं विचार करून ते विचार अमलांत आणण्याविषयीं अंतःकरणपूर्वक यत्न करीत आहों. असाच विचार करून उमेदीनें जर आपलें कर्तव्य बजावीत असलों, तर आमचा हेतु ईश्वरकृपेनें शेवटास गेल्याशिवाय खचित राहणार नाहीं.

सुंदरी—आज या विषयाबद्दल जितकें बोलणें व्हावें

तितकें झालें नाहीं; तरी असें कांहीं सांगा कीं, तें बालसंगोपनांत विशेष उपयोगीं पडेल.

सुबोध—काय? मीं आतां दोन तीन गोष्टी सांगितल्या त्या जरूरीच्या नाहींत?

सुंदरी—नाहीं असें माझें ह्मणणें नाहीं. माझ्या मनांतील हेतु हा कीं, यापेक्षां आणखी कांहीं गोष्टी कळाव्या.

सुबोध—बरें, तर मी एका सन्मान्य इंग्रजी विद्वानाच्या पुस्तकावरून शिशुशिक्षणसंबंधी कांहीं सोप्या गोष्टी सांगतों त्या लक्ष्यपूर्वक ऐकून घे. समज कीं, एखादा मुलगा जिन्यावरून किंवा आगाशीवरून पडून त्याला दुखापत झाली, अथवा सुरीनें हात कापून रक्त निघूं लागलें, अथवा सोंगड्यांबरोबर खेळत असतां आपलें आवडतें खेळणें हरविलें, तर अशा स्थितींत त्याला मारण्याची काय जरूर आहे?

सुंदरी—जो मुलगा असावधतेनें आपल्याला दुखापत करून घेतो, तो आपल्याबरोबर आईबापांनाही त्रास देतो. कारण, त्याला औषधपाणी वगैरे करण्याबद्दल त्याच्या आईबापांना श्रम पडून थोडाबहुत खर्चही करण्याची पाळी येते. तसेंच त्याचें खेळणें हरवलें, तर त्याला पैसे खर्चून दुसरें घेऊन द्यावें लागतें. या सर्व कारणांनीं आईबाप क्रोधीत होऊन मुलांना मार देतात.

सुबोध—काय? हा सुपरिणामी उपाय आहे?

सुंदरी—अशा स्थितींत आईबापांनीं शिक्षा करण्यावांचून अन्य उपाय काय करावा?

सुबोध०—दुसरा उपाय कांहींच नाहीं? समज कीं, एक मुलगा असावधानपणानें पळतां पळतां पडून त्याच्या पायांला मोठी जखम झाली; त्यामुळें दोन तीन मनुष्यांनीं उचलून त्याला घरीं आणिलें. या वेळीं शहाणा मनुष्य त्या मुलाच्या असावधानतेला अनुरूप अशीच शिक्षा झाली असें समजून शांत होईल; आणि ज्या उपायांनीं तो मुलगा लवकर बरा होईल, ते उपाय करूं लागेल. या बाबतींत आईबापांनीं इतकें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, मुलांनीं सृष्टिक्रमाविरुद्ध कांहीं अन्याय केला, तर लागलीच त्यांना योग्य शिक्षा होत असते व त्यामुळें हें ज्ञान त्यांस सहज होऊन तीं सावधपणानें वागायला शिकतात.

सुंदरी—मुलांच्या हातून एखादा सामान्य अपराध झाला, तर त्याबद्दल आपल्या सांगण्याप्रमाणें वागणें ठीक होईल. पण, जेव्हां एखादा मोठा अपराध त्यांच्या हातून घडत असेल, त्या वेळीं कसें करावें? समजा कीं, एखादा मुलगा कागदाचा कपटा घेऊन दिव्यावर पेटवीत असतां त्याला अटकाव न केल्यामुळें अंगावरील चिरगुटें पेटून त्याचें अंग भाजलें, तर अशा ठिकाणीं ही शिक्षणपद्धति प्रसंगीं प्राणघातक होणार नाहीं काय?

सुबोध०—अशा वेळीं त्या मुलाचा तिरस्कार अथवा त्याला शिक्षा न करितां त्याच्या हातांतील कागदाचा कपटा अथवा तसलीच एखादी क्षुल्लक वस्तु त्याला जाळूं द्यावी. पण, त्याला प्रसंगीं जास्त इजा होऊं नये ह्मणून त्यावर नजर मात्र ठेविली पाहिजे. माझ्या एका मित्राचा मुलगा मला फार आवडत असे. तो नेहमीं दिव्याजवळ जाऊन मला विचारी कीं, "हें काय आहे?" तेव्हां त्याचा

तो आश्चर्ययुक्त चेहरा व जिज्ञासा पाहून मीं एक दिवशीं त्याला ह्मटलें "तूंच सांग, तें काय आहे तें. त्याच्याजवळ जाऊन हात लावून पहा ह्मणजे तुला समजेल." असें ह्मणून मीं दिव्यावर हात धरून त्याला दाखविला. तेव्हां माझ्याप्रमाणेंच तोही दिव्यावर हात धरायला गेला. पण, चांगला चटका बसल्यामुळें त्यानें रडण्याला सुरवात केली. तेव्हां पुनः मीं आपला हात दिव्यावर धरून दाखविला. त्या वेळीं रडणें बंद करून तो पुनः दिव्याकडे गेला. याप्रमाणें दोन तीन वेळां केल्यामुळें त्याला फार आश्चर्य वाटलें व रडणें बंद करून पुनः पुनः तसें करण्याबद्दल तो आग्रह करूं लागला. पण, मीं त्याला "तूंच फिरून करून पहा" असें सांगितलें. परंतु, फिरून तो दिव्याजवळ गेला नाहीं व आपोआप त्याला विस्तवाचा धर्म समजला. हें साहजिक शिक्षण नव्हे काय? त्याला यांत रागें भरावें लागलें नाहीं, किंवा शिक्षा करून त्याचें कोमल मन व्यग्र करण्याचीही जरूर पडली नाहीं. सहज तऱ्हेनें तो दिव्याजवळ सावधपणानें वागायला शिकला.

सुंदरी-बरें, मुलानें दुसऱ्या कोणाची वस्तु चोरून आणिली आणि त्यास विचारल्यावरून खोटें बोलून त्यानें आपला दोष झांकला, तर या ठिकाणीं काय करावें?

सुबोध०—मीं माझ्या मित्राच्या तोंडून एक गोष्ट ऐकिली आहे तीच तुला सांगतों. एक गृहस्थ आपल्या मित्राच्या घरीं आपल्या मुलांबाळांसह गेला होता. चार दिवस तेथें राहून परत घरीं आल्यावर आपल्या मुलाच्या हातांत त्यानें कांहीं खेळणीं पाहिलीं. तेव्हां, त्या

गृहस्थाच्या मनांत संशय येऊन "हीं खेळणीं तूं कोठून आणिलींस?" ह्मणून त्याला त्यानें विचारिलें. तेव्हां त्या मुलानें हीं त्या गृहस्थानें मला दिलीं असें सांगितलें. यावर त्या गृहस्थानें जास्त विचारपूस न करितां आपल्या मित्राला पत्र लिहून खुलासा मागितला. तेव्हां तिकडून लिहून आलें कीं, "आपण गेल्यानंतर आह्मीं अमुक अमुक खेळण्यांची चौकशी केली; पण कोठें सांपडत नाहींत. आह्मीं तीं कोणाला दिलेलीं नाहींत." हें वाचल्यावर त्या गृहस्थानें आपल्या मुलास बोलावून आणून त्याला तें पत्र वाचून दाखविलें आणि सांगितलें कीं, "हे जिन्नस घेऊन तूं त्यांच्या घरीं जा; आणि हे त्यांच्या स्वाधीन करून घरांतील सर्व मनुष्यांची क्षमा माग आणि त्यांचें एक पत्र घेऊन ये." तेव्हां तो मुलगा त्या मित्राच्या घरीं गेला; आणि ते जिन्नस त्या गृहस्थाच्यापुढें ठेवून सजल नयनांनीं त्याची क्षमा मागूं लागला. त्यानेंही क्षमा करून एक पत्र दिलें व त्याची रवानगी केली.

**सुंदरी**—पण, लहान मुलगा असला तर?

**सुबोध०**—तसें असेल, तर त्याला घेऊन बापानें जावें; आणि त्याची चूक त्याला दाखविण्याचा प्रयत्न करावा व त्याच्याकडूनच क्षमा मागवावी. असें एक दोन वेळ झालें ह्मणजे त्याची त्यालाच लाज वाटूं लागते; आणि त्याच्या हातून तसा अपराध पुनः घडत नाहीं. तात्पर्य कीं, मुलांना मार-झोड करण्यापेक्षां असल्या सोप्या उपायांची योजना करावी. हें फार चांगलें.

सुंदरी—आपण जे उपाय सांगितले, ते सर्व सोपे असून चांगले आहेत. परंतु, फारच थोडे लोक याबद्दल विचार करीत असतील.

सुबोध०—लोक बालसंगोपनाबद्दल तादृश विचार करीत नाहींत; हाच दुःखाचा विषय आहे. धमकी किंवा मार दिल्यानें मुलांची केवढी हानि होते हें जर त्यांना समजेल, तर ते मुलांना कधींही धमकी किंवा मार देणार नाहींत.

सुंदरी—धमकी किंवा मार दिल्यानें मुलांची कशी कशी हानि होते हें मला समजून सांगावें.

सुबोध०—धमकी अथवा मार दिल्यानें बालकांच्या मनाचा उत्साह किंवा तेज शुष्क होऊन जातें; आणि तीं आळशी व भित्रीं होतात. वारंवार जर असें होत गेलें, तर तीं हळूहळू जड होऊन त्यांचें बहुतेक सौजन्य लुप्त होत जातें. तूंच पाहिलें असशील कीं, आपण एखादें इच्छित काम करूं गेलों आणि त्यांत अडचणी येत असल्या, तर आपल्या अंतःकरणास किती दुःख होतें? जर आपल्यासारख्या परिपक्क अंतःकरणांत अडचणरूप तरंगांनीं पावलोपावलीं हानि होते, तर कोमलमति बालकांचें कोंवळें मन ग्रीष्म ऋतूंतील सूर्याच्या प्रखर तापानें वृक्षादिकांचे कोमलपल्लव जसे कोमेजून जातात, तसें होईल यांत नवल कसलें? पराधीनतेनें मनुष्यत्वाचा लोप होतो. आणि हाच नियम जसा थोरांस लागू होतो, तसाच लहानांसही आहे.

सुंदरी—मग आपल्या ह्मणण्याचा भावार्थ मुलांना मोकळें सोडावें; त्यांच्यावर धाक अथवा जरब ठेवूं नये; असाच ना ?

सुबोध०—मुलांना स्वच्छंद सोडणें जसें अवश्य आहे, त्याप्रमाणेंच त्यांच्या मनावर दाब असणेंही जरूर आहे.

सुंदरी—असें कसें होईल? मुलांना स्वच्छंद सोडणें व त्यांच्यावर दाब ठेवणें या गोष्टी परस्पर विरुद्ध नाहींत का?

सुबोध०—मुलांच्या मनावर दाब ठेवणें याचा अर्थ तूं काय समजतेस?

सुंदरी—मुलें स्वइच्छेनें कांहीं करूं लागलीं, तर त्यांच्या मनांत भयाचा आभास राहील असें करणें, आपल्या इच्छेप्रमाणें तीं वागतील अशी तजवीज करणें, इच्छेप्रमाणें तीं न चालतील तर आपली इच्छा किंवा नियम यांच्या ताब्यांत राहण्याचें त्यांना भाग पाडणें याचा अर्थ धाक.

सुबोध०—फार चांगलें. तूं विचार करून पहा कीं, आपण उभयतां परस्परांची स्वतंत्रता राखून एकमेकांच्या मनाप्रमाणें काम करीत आहों कीं नाहीं? मला पुष्कळ गोष्टींची आठवण आहे कीं, ज्या गोष्टींत तुझी स्वतंत्रता कायम राखून मीं आपल्या इच्छेप्रमाणें तुला वागविलें आहे. तुला रागें भरून किंवा उपदेश करून अथवा माझ्या इच्छेप्रमाणें हरएक काम तुझ्याकडून करवीत होतों हें तुला त्या वेळीं समजत नव्हतें. तात्पर्य, मनुष्या-

च्या मनाचा असा एक चमत्कारिक धर्म आहे कीं, स्वतःची स्वतंत्रता कायम राखून दुसऱ्याची ताबेदारी करितां येते. आणि अशा ताबेदारीपासून तिळमात्र अपकार होणार नाहीं.

सुंदरी—आतां मी समजलें. आपण बोलतां बोलतां मला अशा स्थानीं आणिलें आहे कीं, माझ्या चारही बाजूस कल्याण, स्नेह आणि प्रीति आहे!

सुबोध०—होय, मनुष्याच्या मनांत जर कल्याण, स्नेह, आणि प्रीति यांचें वास्तव्य असेल, तरच तो दुसऱ्याला आपलासा करून घेईल. या प्रेमराज्यांत अशक्य असें कांहींच नाहीं. तूं पुष्कळ वेळां पाहिलें असशील कीं, जो मनुष्य मुलाला आंगाखांद्यावर घेऊन खेळवितो, हंसवितो, नाचवितो, त्याचे लाड करितो, त्या मनुष्याला पाहिल्याबरोबर तें मूल अत्यानंदानें त्याच्याकडे जाण्यास आपले चिमुकले हात पसरून कसें आतुर झालेलें असतें. कारण, प्रेमानें मुलें जशीं आपल्याला वश होतात, तशीं दुसऱ्या कशानेंही होणार नाहींत. तेव्हां काय कीं, मुलांना स्वच्छंद वागूं द्यावें. पण, त्या मुलांना लक्ष्यांत न येईल अशी त्यांच्यावर नजर ठेवावी. व जेव्हां जेव्हां तीं मुलें आपणाकडे पाहतील, तेव्हां तेव्हां आपल्या चेहऱ्यावर स्नेह व शुभेच्छा हीं त्यांना दिसलीं पाहिजेत. असें झालें ह्मणजे त्या मुलांच्या मनांत आपणाविषयीं पूज्यभाव उत्पन्न होऊन तीं सर्व तऱ्हेनें आपलीं ताबेदार होतील.

सुंदरी—आतां माझ्या लक्ष्यांत आलें कीं, स्नेह व कल्याण यांनीं युक्त जें शासन, तेंच खरें शासन होय.

आणि अशा साधनानेंच मनुष्याची उन्नति होणार आहे.

**सुबोध**०—मीं सांगितलें अशा तऱ्हेच्या शासनांत ठेवून मुलांना सुमनुष्य करण्याची आईबापांची जर इच्छा असेल, तर त्या आईबापांनीं अगोदर उत्तम शासनांत राहिलें पाहिजे. जीं आईबापें वारंवार अल्पतर कारणानें विरक्त होऊन क्रोधाधीन होतात, आणि ज्यांचें मन अभिमान आणि अहंकार यांनीं दूषित झालेलें आहे, त्यांना जर सुचरित व विवेकी होण्याची इच्छा असेल, तर त्यांनीं सुशिक्षण, सावधानता व सदुपदेश हीं संपादिलीं पाहिजेत.

---

## प्रकरण पांचवें.

याप्रमाणें रोज थोडथोडें संभाषण व चर्चा करितां करितां एक महिना निघून गेला. मध्यें केव्हां केव्हां सात आठ दिवसही संभाषणावांचून जात. या विषयाचें महत्व पाहतां, त्यांना मिळे तो अवकाश फारच थोडा होता. आजपासून नाताळची सुट्टी मिळाली होती; त्यामुळें सुंदरीचें मुखकमल अत्यानंदानें प्रफुल्ल झालें. तिचें मन निरंतर याच विषयाच्या कल्पनासुमार्गांत धांवत होतें. सुंदरी कठोर व्रत धारण करून चांगल्या मार्गास लागली होती; त्यामुळें सुसंतान संपादन करून स्वतःचें व स्वतःच्या वंशाचें मुख उज्वल करून मनुष्यजन्माचें सार्थक्य कसें करावें, याच विचारांत ती गर्क होऊन गेली होती. आज सुंदरी

ही हास्यमुखानें प्रियकराच्या खांदीत येऊन ह्मणाली, "आतां या रजेंत तरी दुसरे कोणीकडे न जातां बालसंगोपनाविषयीं जें आणखी कांहीं मला सांगण्यासारखें असेल तें सांगावें; अशी मनापासून प्रार्थना आहे.

सुबोध०—मीं तुला आजपर्यंत पुष्कळ उपयुक्त गोष्टी सांगितल्या व पुढेंही सांगेन. आणखी ज्या मला माहीत नसतील, त्या समजून घेऊन त्याही तुला सांगाव्या असा माझा हेतु आहे. इतके दिवस मी तुला सांगायला विसरलों अशी फार अगत्याची एक गोष्ट आहे; ती मी तुला आज सांगतों; ह्मणजे तुझी खातरी होईल कीं, हा संसार भयानक दुःखाचें व दुर्दशेचें निवासस्थान होण्याला आईबापांचा मूर्खपणाच कारण आहे.

सुंदरी—कोणत्याही विषयाला आरंभ करण्यापूर्वी आपण असें कांहीं बोलतां कीं, तें ऐकल्याबरोबर माझें मन तन्मय होऊन जातें व आपलें पुढील भाषण ऐकण्यालाही आतूर होतें. आपल्याला जें सांगायचें असेल, तें लौकर सांगावें; मी ऐकण्यास तयार आहें.

सुबोध०—प्रजोत्पादनाला दांपत्यशरीरस्थिति कशी असली पाहिजे याबद्दल लोक मुळींच विचार करीत नाहींत. प्रजोत्पादनासबंधीं आपलें कर्तव्य लोक समजतील, तर आज आपल्या समाजांत सध्यां जे विकलांग तसेच चिररुग्ण लोक दिसतात, ते दिसले नसते. या अशा मनुष्यांनीं जन्म घेऊन संसारांतील दुःखकष्टाचा प्रवाह फारच मोठा केला आहे. याला जबाबदार कोण बरें? धर्मज्ञानविरहित व अविवेकी असे आईबापच याला जबाबदार आहेत. कारण,

अशा आईबापांच्या पोटींच त्या हतभाग्य माणसांनीं जन्म घेतला आहे.

सुंदरी—तर अशा माणसांनीं लग्नच करूं नये कीं काय?

सुबोध०—यांत काय संदेह आहे? एक इंद्रियविज्ञान-शास्त्रवेत्ता एके ठिकाणीं लिहितो कीं, आईबाप अस्वस्थ-चित्त असतां जर एखाद्या मुलाचा जीवनसंचार झाला, तर तें मूल जन्मतःच उन्माद रोगांत पडलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कारण, तें मूल पांच सहा वर्षांचें झालें तरी जन्मदात्या आईबापांस किंवा इतर नातलगांस चांगलें ओळखण्यास व आपला मनोविकार व्यक्त करण्यास तें असमर्थ असतें. केवळ क्षुधेच्या वेळीं अस्पष्ट शब्दांनीं मनाचा भाव साधारणसा दाखवितें इतकेंच. हें ह्मणणें पुष्कळ दृष्टांतावरून सिद्ध करितां येईल. फार लांब कशाला? दुसऱ्या एका प्रतिष्ठित व सर्वमान्य ग्रंथकाराचें अनुभविक असें ह्मणणें आहे कीं, एका प्रख्यात न्याया-धिशाचे घरीं सर्व गोष्टींची अनुकूलता होती. सर्वत्र आनंदीआनंद होता तशांत त्याची आपल्या स्त्रीवर अत्यंत प्रीति असल्यामुळें तिला ज्या ज्या गोष्टींनीं आनंद व सुख होईल, त्या त्या गोष्टी करून तिला प्र-सन्नहृदय ठेवण्याविषयीं त्याचा प्रयत्न होता. आधिव्याधि-रूपी सर्व अडचणी नाहींशा करून सद्गुण आणि नीति यांच्या उपदेशामृत वर्षावानें तो तिचें मन परितृप्त करीत होता. अशा संधीस तिच्या उदरीं एका कन्येचा जीवनसंचार झाला. त्या कन्येचें स्वरूप व प्रकृति अशी होती कीं, त्याचें वर्णन ऐकल्याबरोबर आनंद होतो.

ती कधीं रडत नसे. बडबड करीत नव्हती. एखादे ठिकाणीं बसविली ह्मणजे आपल्याशींच एकटी बसून खेळत असे. तिचें मुखकमल तर नेहमीं प्रफुल्ल व प्रसन्न असें असे. तिचा स्वभावही अवर्णनीय होता; त्यामुळें तिला पाहिल्याबरोबर कोणालाही सद्गुण, सुरूप, सुप्रकृति यांचें मूर्तिमंत दर्शन होत आहे कीं काय असें वाटे. या वरच्या दोन्ही उदाहरणांत किती बरें अंतर आहे? तूं विचार करून पहा कीं, आईबापांच्या शारीरिक व मानसिक स्थितीवर त्यांच्या संतानजीवनाची उन्नति किंवा अवनति किती अवलंबून आहे? हा विचार लोक करीत नसल्यामुळेंच त्यांनीं हा संसार भारी कष्टप्रद करून सोडला आहे. यासाठींच मी ह्मणतों कीं, ज्यांची शारीरिक अथवा मानसिक स्थिति दुरुस्त नसेल, त्यांनीं मुळीं लग्नच करूं नये हें चांगलें. कारण, अशा लग्नापासून जी संतति होणार, तीपासून संसारांत सुख न होतां हानीच फार होईल. विकलांग आणि रोगी प्रजा उत्पन्न केल्याचें श्रेय घेणें यासारखें दुर्भाग्य तें कोणतें? एखाद्या यमपाशांत पडलेल्या मनुष्यास जर समजलें कीं, आपल्या पश्चात् जे लोक राहिले आहेत ते आपापल्या भाग्याची निंदा करितील, तर त्या आसन्नमरण गृहस्थाची मृत्युयातना शेंकडोंपट वाढणार नाहीं काय? तनदुरुस्त, बलवान्, धर्मनिरत, सुकीर्तिवान् असें संतान मागें ठेवून मृत्यूला आलिंगन देण्यांत सुख आहे; यांत कांहीं संशय नाहीं.

**सुंदरी**—तर मग, ज्याची शारीरिक व मानसिक प्रकृति चांगली असेल, त्यांनींच विवाह करावा. इतरांनीं

करणें हें अनहितकारक आहे; असाच आपल्या बोलण्याचा भावार्थ ना?

सुबोध०—होय असाच; आणि तो निसर्गतःच सत्य आहे. पण, आपल्या लोकांची स्थिति फारच निराळी आहे. आपल्या मुलांचे दोष लपवून ठेवून दुसऱ्याच्या मुलांशीं त्यांचा शरीरसंबंध जोडून देतात ही खेदास्पद स्थिति टाकून देऊन आपल्या मुलांना सुमनुष्य बनविण्याचा जर ते प्रयत्न करितील, तर हा संसार अत्यंत श्रेयस्कर होईल; यांत तिळमात्र शंका नाहीं.

सुंदरी—आईबापांचें शरीर निरोगी व बलवान् असावें. मग तीं सुशिक्षित किंवा अशिक्षित असोत; मात्र त्यांच्या अंगीं मनुष्यजीवनाला शोभविणारे असे कांहीं गुण असले ह्मणजे झालें. असेंच ना?

सुबोध०—माझा मतलब याहून निराळा आहे. आपलीं मुलें निरोगी व स्तुतिपात्र व्हावीं, अशी ज्यांची इच्छा असेल, त्यांनीं आईबाप होण्यापूर्वींच आत्मोन्नतीकरितां नियमित यत्नवान् झालें पाहिजे. असें वारंवार सांगण्याचा हेतु हा कीं, मनुष्याच्या आंगचे दुर्गुण, कुशिक्षा, आणि दुराचार हे वंशपरंपरेनें चालणारे असतात. मागें एकदां सांगितलें आहे कीं, आईबापांच्या आंगचे कित्येक रोग मुलांना जडतात; तसेंच आईबापांची प्रकृति चांगली असली तर मुलें सुदृढ व सशक्त होतात; त्याप्रमाणेंच त्यांच्या मनाची उन्नति अथवा अवनति, सरलता अथवा कुटिलता, बुद्धिहीनता अथवा विद्वत्ता हींदेखील मुलांच्या चारित्रांत जशींच्यातशींच प्रतिफलित होतात. इतकेंच

केवळ नव्हे तर आईबापांचे क्षणिक मनोविकारही मुलांच्या अंगीं कायमचे होऊन ते मंगल अथवा अमंगलकारक होतात.

सुंदरी—असें कसें होईल? आईबापांचे क्षणिक मनोभाव त्यांच्या मुलांचें चांगलें वाईट करण्याला कसे कारणीभूत होतील?

सुबोध०—एका प्रख्यात इंग्रज डाक्तरानें याबद्दल चांगला विचार केला आहे. तो ह्मणतो—"यागोष्टीची सत्यता दाखवायला पुष्कळ कारणें आहेत. केवळ आईबापांच्या स्वभावावर त्यांच्या संततीचें हितानहित अवलंबून असतें एवढेंच नव्हे; तर आईच्या उदरीं मुलाचा जीवनसंचार होतो त्या वेळीं त्या आईबापांच्या मनाची स्थिति जशी असेल, त्याला अनुसरूनच त्या मुलाचा स्वभाव होतो.*" दुसऱ्या एका दार्शनिक पंडितानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे—"मुलें चांगलीं वाईट होणें हें आईबापांच्या स्थितीवर अवलंबून आहे. या गोष्टीच्या सत्यतेला मुलांचा स्वभाव व प्रकृति बहुतकरून आईबापांप्रमाणेंच असते. मातेच्या शरीरापासून व मनापासून जो नवा देह व मन बनतें आणि ज्या रक्तापासून तें पुष्ट होतें, तो देह व तें मन मातेच्या स्वभावचरित्राचें विभागी होणार नाहीं असें कसें होईल? खरी गोष्ट अशी आहे कीं, बालक आपली शरीर-मन-रूप संपत्ति आईबापांपासूनच मिळवितें यांत कांहीं संदेह नाहीं†" आप-

---

* कारपेंटरकृत मनुष्यविज्ञानशास्त्र पृ० ९०५

† ओ. एस. फॉवलरकृत लव ॲन्ड पेरेन्टज ॲपलाइड टु धी इम्प्रुवमेन्ट आफ् ऑफस्प्रींग पृ० ३१

ह्यामध्येंही "यथा बीजं तथांकुरः" "यदन्नं भक्षयेत् नित्यं जायते तादृशी प्रजा" या अर्थाचीं द्योतक वृद्धवचनें पुष्कळ तूं ऐकलीं असशील.

सुंदरी—हाय हाय! असें आहेना? मग मनुष्य इच्छा करील तर संसाराला इंद्राच्या नंदनवनाप्रमाणें सुखकर करील. एकंदरींत मनुष्याला सुखी होण्याचा मार्ग फार सोपा आहे. खरोखर मनुष्यें अविचारानें आपला व आपल्या संसाराचा इतका भयंकर घात करून घेतात.

सुबोध०—केव्हां केव्हां चांगल्या आईबापांच्या घरीं वाईट मुलगा व वाईट आईबापांच्या घरीं चांगला मुलगा आढळतो. याचें कारण समयविशेषीं वधूवरें खराब प्रकृतीचीं असून गर्भसंभवाचे वेळीं नाना प्रकारच्या कारणांनीं त्यांच्या मनाची स्थिति चांगली असली, तर दैवयोगानें तीं उत्तम बालरत्नांचे मालक होतील. तसेंच असेंही पाहण्यांत येतें कीं, एखादें दांपत्य जरी चांगल्या प्रकृतीनें संपन्न असलें, आणि गर्भसंभवाच्या वेळीं तें विकृतमन झालें, तरी त्यांच्या पोटीं कुलांगारच जन्मेल. मी सांगतों याचा अनुभव तुलादेखील असेल. एखाद्या मनुष्याला पांच चार मुलें असतात; परंतु तीं भिन्नभिन्न स्वभावाचीं असतात. याचेंही कारण हेंच आहे. धार्मिक आईबापांच्या घरीं कुत्सित व दुराचारी मुलें जन्मतात; यासंबंधीं एका * पंडितानें विचारपूर्वक ह्मटलें आहे--

"आईबाप धार्मिक असून गर्भसंभवाचे वेळीं जर

* गेलटन कृत हेरीडीटरी जीनीयस पृ० २८२

त्यांचें मन क्षणभर चंचल झालें असेल, तर त्यांचा मुलगा धर्मनिष्ट न होतां चंचल स्वभावाचाच होईल; आणि आपल्या दुराचरणानें त्या कुटुंबाला कलंक लावील. '' अशा प्रकारचीं उदाहरणें आपल्या पुराणांतरींही शेंकडों सांपडतील.

**सुंदरी**—आपले लोक निरानिराळ्या निरर्थक उद्योगांत जो काळ घालवितात, तो तसा न घालवितां या संबंधाच्या विचारांत घालवितील, तर फार फायदेशीर होणार आहे.

**सुबोध०**—तूंच विचार करून पहा! मीं प्रथम सांगितलें होतें कीं, आपण सुमार्गगामी झाल्यावांचून आपल्या मुलांना सद्गुणी करून संसारांत सोडणें अशक्य आहे. हें कितपत खरें आहे, आणि आपण स्वतःच सद्गुणी होणें हेंही किती कठीण आहे, याविषयीं एकवार विचार करून पहा.

**सुंदरी**—आपण जो स्वभाव धारण करून जन्म घेतलें आहे, त्याचा चांगलेवाईटपणा आपल्या जीवनावर कार्य करणारच. अशा अवस्थेंत या विरोधी स्वभावांच्या आड राहून आपलें रक्षण केलें पाहिजे; व आपणांस भावी मुलांच्या कल्याणाकरितां अगोदरच खबरदारी घेतली पाहिजे; आणि गर्भसंभव झाल्यावरही अतिशय सावधपणानें आपआपल्या जीवनाचा साधुभाव फार उज्वल राखून विवक्षित मुदतीपर्यंत अति सावधपणानें, प्रसन्नभावानें आणि सदुद्योगानें गर्भरक्षण केलें पाहिजे. बालक जन्मास आल्या दिवसापासूनही त्याच्या जीवनास

सद्गति मिळेल अशाबद्दल प्रतिक्षणीं सावध राहिलें पाहिजे. हें फार जोखमाचें नव्हे काय ?

सुबोध०—तूं जें आतां सांगितलेंस; तोच मनुष्यजीवनाच्या महाव्रताचा मूळमंत्र आहे. आतां तूं समजली असशील कीं, थोड्या मेहनतीनें व सामान्य रीतीनें मुलांचें लालनपालन करून इच्छेनुरूप फळ मिळणें अशक्य आहे. मीं वर सांगितलेंच आहे कीं, आपण जरी पुष्कळ यत्न करीत असलों, तरी आपली आशा सर्वांशीं पूर्ण होणें कठीणच आहे. याचा मतलब तूं समजलीस का ? या संसारांत सुपुत्राची माता होणें व सुकीर्तिवान् मुलाचा बाप होणें हा केवढा सुदैवाचा विषय आहे बरें ! असो, आज हा विषय इतकाच पुरा करूं. मला आतां लायब्ररींत ( पुस्तकालयांत ) जायचें आहे.

## प्रकरण सहावें.

आज नाताळचीच सुटी होती. दुपारच्या वेळीं सुंदरी घरांतील कामकाज आटोपून सुबोधचंद्राच्या खोलींत आली. तेव्हां सुबोधचंद्र एकाग्रमनानें डाक्तर चीवेसी कृत "आयांस बोध" या नांवाचें इंग्रजी पुस्तक वाचीत होता. सुंदरी प्रसन्न मनानें आपणाकडे येत आहे असें पाहून तो बोलला "घरांतील काम काज करून तूं थकली आहेस. कांहीं वेळ विश्रांति घे; नंतर संभाषणाला आरंभ करूं."

सुंदरी—आजपर्यंत विश्रांतिसुख मी पुष्कळ अनुभविलें आहे. ज्या विचारांनीं माझें मन व प्राण संपूर्ण रीतीनें वश करून घेतले आहेत, त्या विचारांमुळें या जन्मांत क्षणमात्रही विसावा मला मिळणार नाहीं. माझे सुखाचे व विश्रांतीचे दिवस निघून गेले आहेत. आतां फक्त माझ्या परमधनाला ( मुलाला ) सद्गुणी केल्यावर मी मेलें तरी माझ्या जन्माचें सार्थक झालें असें समजेन. आपण आतां विलंब करूं नका. मला कांहीं सांगायचें असेल, त्याला आरंभ होऊं द्या.

सुबोध०—जा, आईला बोलावून आण. आई जवळ असल्यानें फार फायदा होईल.

सुंदरी—आपणच बोलावा. मी काय सांगून त्यांना बोलावूं ?

सुबोधचंद्र खोलीच्या बाहेर येऊन पाहतो तों त्याची आई स्वच्छ प्रकाशांत बसून काव्यदोहन पुस्तकांतील ध्रुवाख्यान वाचीत आहे. तें पुरें झाल्यावर **सुबोधचंद्र** ह्मणाला, "आई, इच्छा असली तर आपला नेहमींचा विषय पुढें चालवूं." हें ऐकून माता उठून **सुबोधचंद्रा**च्या खोलींत आली.

सुबोध०—आई, हें पुस्तक वाचीत असतां एकाएकीं माझ्या मनांत असा विचार उत्पन्न झाला कीं, "मनुष्यसुजीवनाचा राजरस्ता संसार हा आहे. पण, या संसारमार्गांतून कोणत्या रीतीनें जावें हें ठरविणें अगत्याचें आहे. याविषयीं विचार करितांना असें समजतें कीं, बालपणापासून आरंभ करून लोक अभ्यासानें संसारसूत्रांत ज्ञानरूपी पुष्पांची माला गुंतवीत असतात. ज्यांच्या ज्ञा-

नाचा अंकुर शिक्षारूप जलानें सुमार्गगामी होतो, त्यांचा परिश्रम सफल होतो. त्यानें केलेली पुष्पमाला आदरणीय होऊन विश्वांतील एक संपत्ति होते. त्या पुष्पमालेचा सुवास संसाराला सुगंधमय करून त्याला प्रसन्न ठेवितो. पृथ्वीवरील इतर लोक त्या महारत्नाकडे सतृष्ण दृष्टीनें पाहतात. पण, याच्या उलट ज्यांच्या जीवनक्षेत्रांत शिक्षणाचा प्रथम प्रवाह ज्ञानांकुराला विरुद्ध मार्गाकडे वळवितो, त्यांचा जीवनाभिनय मलिन, हीनप्रभाव व पापी असतो. त्यांच्याकडे लोक धिःकार-युक्त दृष्टीनें पहातात. चुकूनही त्यांच्याबद्दल कोणी विचार करीत नाहीं. आतां जर संसाराचा सुमार्ग लोकांना इतका प्रिय आहे, सुखाच्या मार्गावर फिरण्या-ची जर मनुष्यांची इच्छा दिसते, आणि तोच मार्ग मिळण्याविषयीं जर सर्व आयुष्य खर्च होतें, तर मनुष्या-चें मन जीवनाच्या प्रथम मुहुर्तापासूनच सुशिक्षणानें सुसंस्कृत होत गेलें पाहिजे. आणि असें झालें तरच त्या मनुष्याचें जीवन स्तुतिपात्र होईल. यांत कांहीं शंका नाहीं.

सुंदरी—मी चांगल्या तऱ्हेनें आपलें बोलणें समजलें, आपणच जनमंडलाच्या हितानहिताबद्दल जबाबदार आहों. स्त्रीजातीच्या सुप्रकृतीवरच समाजहिताचा आधार असतो. एक दिवस आपण सांगितलें होतें कीं, "आई" हा शब्दच शिशुशिक्षणाचें दुसरें नांव आहे. ही गोष्ट सर्वांशीं खरी आहे.

सुबोध०—या जगतीतलावर स्वतंत्र आणि नीति-ज्ञ धर्मवीरांनीं जन्म घेऊन मानवजीवनाचें महत्व वाढविलें

आहे. या पृथ्वीवर सुनीतिपरायण, साहसी, सदाशय राजे आणि सेनापति यांनीं अवतार धारण करून स्वज्ञातिमर्यादा स्वतंत्रता आणि गौरव यांचें संरक्षण केलें आहे. या अतिविस्तृत भूमंडलावर असंख्य नरनारींनीं आपआपल्या जीवनमार्गावर कर्तव्य ज्ञानप्रदीप हातीं घेऊन दृढप्रतिज्ञेनें संसारांतील मायामोहाबरोबर संग्राम करून पुढील चाल धरिली. आणि जनजीवनांत स्वर्गीय दृष्टांताचा जाज्वल्य रेखापात करून गपचुप गमन केलें. सुंदरी, तूं खात्रीनें समज कीं, अशा मानवरत्नांचें बाल्यकालांतील आश्रयस्थलच (मातांक) त्यांस धर्मवीर, नीतिपूर्ण, अध्यवसायसंपन्न आणि उत्साही करण्यास कारण झालें आहे.

माता—तूं खरें सांगितलेंस. या संसारांत जीं स्तुतिपात्र नररत्नें आढळतात, तीं मातेच्या चांगुलपणामुळेंच तशीं होतात. आणि जीं संसारांत उन्नतचरित न होतां नीच, स्वार्थपर, कुलकलंक अशीं कुमनुष्यें आढळतात तींही मातेच्या दोषास्पद आचरणानेंच तशीं होतात. तात्पर्य मुलांचें चांगलें किंवा वाईट होणें हें आईवरच अवलंबून आहे.

सुंदरी—आपण केव्हां केव्हां बंगाल्यांतील मोठमोठ्या माणसांच्या गोष्टी सांगतां ते महात्मे मनुष्य आईच्या गुणामुळेंच उन्नतीला पोंचले काय?

सुबोध—काय, हा अद्याप तुला संशयच? मी आतां तुला तिकडील कित्येक महान् पुरुषांचीं चरित्रें सांगतों; ह्मणजे तुझी खात्री होईल कीं, त्या महान् पुरुषांच्या सत्कीर्तीला व उन्नत गुणांला त्यांच्या मातांचे सद्गुण आणि धर्मभाव यांनींच विशेष सहाय केलें आहे.

प्रथम बाबु केशवचंद्रसेन, यांचें जीवन चरित्र घेऊं.

सुंदरी—बरें, हेंच सांगावें.

सुबोध०—भारतगौरवधन जो बाबु केशवचंद्रसेन ज्याच्या उदार धर्मविचारानें भारतवर्षांत नवजीवन संचारलें आहे, यूरोप आणि अमेरिका ज्याचीं धर्ममतें समजून घेण्याकरितां सर्वदां आतूर झालेलीं असत, त्या महान बुद्धिशाली केशवचंद्रसेनाच्या बाल्यकालांतील आश्रयस्थल स्नेहममतेची मूर्तिमती देवी जी माता तिची मांडीच विविध प्रकारच्या सद्गुणाची अधिकारी होय. त्याचीं आईबापें धर्मपरायण होतीं. केशवचंद्रसेनानें आपल्या आईच्या मरणसमयीं तिच्या पायांची धूळ मस्तकावर धारण करून ह्मटलें "आई, तुझ्यासारखी माता सर्वांसच प्राप्त होणार नाहीं. तुझ्या सद्गुणप्रसादानेंच मी या स्थितीस पोंचलों आहें." केशवचंद्रसेन मनुष्यपणाची आणि वीरत्वाची छबी या दुनियेंत ठेवून गेला आहे. शिशुपणांत त्याच्या कोमल मनावर त्याच्या धर्मपरायण मातेनें धर्मपरायणतेचें बीजारोपण केलें होतें असें ह्मटलें पाहिजे. आणि ह्मणूनच असे अपार साहसी व तेजस्वी धर्मवीर निर्माण करण्याची शक्ति या आर्यजननीच्या अंगीं अद्याप आहे; असें लोक समजतात.

माता—अशा गोष्टी ऐकिल्या ह्मणजे आशा आणि आनंद यांनीं हृदय भरून येतें, आणि त्याबरोबरच आपल्या दुर्दशेचें स्मरण होऊन मनाला क्लेश उत्पन्न होतो. ही तुझी गोष्ट ऐकल्यावर माझ्या मनांत असें आलें कीं, जर हे सर्व उन्नत गुण माझ्या अंगीं असते, तर तुला अलौकिक मनुष्य बनवून या संसारांत मी

सुमाता होऊन राहिलें असतें. पण, तसें माझ्या नाशिबीं नव्हतें. तरी, त्यांतल्यात्यांत संतोषाला जागा एवढीच कीं, माझ्या अंगीं जी थोडीबहुत बुद्धि व सामान्य ज्ञान होतें, त्यांच्यायोगानें तुला सुमनुष्य करण्यास कांहीं आळस केला नाहीं. धन्य त्या वंगदेश भूमीची कीं, जींत केशवचंद्रसेन, ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या जननींनीं जन्म घेऊन या आर्यभूवर सुपुत्ररूपी रत्न निर्माण करून यावत्चंद्र दिवाकरौ आपलें नांव सुवर्णाक्षरांनीं लिहून आपल्याला धन्य ह्मणवून घेतलें आहे.

सुबोध०—आतां दुसऱ्या एका इसमाची गोष्ट सांगतों. त्या तरुणानें बाल्यकाळीं आपल्या आईबापांचे जे सद्गुण पाहिले होते, त्या सद्गुणांचा याच्या मनावर संस्कार होण्यापूर्वींच त्याचीं मातापितरें स्वर्गवासी झालीं. त्यामुळें हा स्वेच्छाचारी होऊन शेजारच्या टवाळ मुलांची त्याला संगत लागली व तो अगदीं खराब होऊन गेला. त्याला दुराचरणापासून मुक्त करण्याचा कांहीं इलाज राहिला नव्हता; गेलेलें मनुष्यत्व पुनः मिळण्याची कांहीं आशा नव्हती; व केवळ पशूवत् होऊन आपल्या आत्मइष्ट मंडळीच्या नजरेबाहेर राहून आयुष्याचे दिवस कष्टप्रद स्थितींत घालवीत होता. अशी स्थिति होती तरी त्याच्या मनांतून स्वतःच्या आईबापांचें महत्व, उदारता, न्यायपरता आणि धर्मनिष्ठा यांची स्मृति अगदींच मावळली नव्हती. केव्हां केव्हां त्रासानें विरक्त होऊन तो एकांतस्थळीं विचार करीत बसे. त्या वेळीं त्याला रडेंही येई व आईबापांच्या स्थितीची आठवण होऊन फार वाईट

वाटे. " अशा सद्गुणी आणि धर्मभीरू आईबापांच्या पोटीं जन्म घेऊन मी असा हीन व दुराचारी बनलों. मी धर्मस्वरूप आईबापांचा मुलगा असून अत्यंत पापाचरणी झालों. यापेक्षां मला मृत्यु येईल तर फारच चांगलें होईल. सद्गुणराशी व गौरवन्वित अशा आईबापांच्या नांवाला कलंक लावण्यापूर्वीं मी जगांतून नाहीं होतों तर फार आनंदाची गोष्ट होती. " आई, त्या तरुणाच्या बाल्यकाळीं आईबापांच्या चारित्राचा महान् भाव त्याच्या कोमल मनांत अंकित झाला होता ह्मणूनच तो तरुण मनुष्य दुराचरणजालांतून हळूहळू मुक्त होऊन सध्यां संसारांत प्रविष्ट होऊन दिवसेंदिवस उन्नति मिळवीत आहे. आतां त्याला पाहिलें ह्मणजे मोठा आनंद होतो.

**सुंदरी**—दुसऱ्या आणखी कित्येक सुमातांविषयीं सांगावें. मला या गोष्टी ऐकून फार आनंद होतो.

**माता**—तुमच्या अशाच गोष्टी चालूंदे. मला कथा ऐकायला जायचें आहे; तिकडे मी जातें.

**सुबोध०**—आई, जरा बैस.

**माता**—छे. कथेची वेळ होऊन गेली. मला बसायचा आग्रह करूं नको.

**सुबोध०**—आपल्या देशांत असे महात्मे पुरुष जन्मून त्यांनीं स्वज्ञातिमहत्व व जनमंडलाचें गौरव वृद्धिंगत केलें आहे. सुंदरी, तूं निश्चयानें समज कीं, ते महात्मे पुरुष सद्गुणसंपन्न आईबापांच्या घरीं जन्मून लालितपालित झालेले होते. माता चांगल्या प्रकृतीची व धार्मिक असेल, तर तिचा मुलगा सत्चरित्र आणि धर्मिष्ट होईल; याबद्दल तुला कित्येक उदाहरणें सांगितलीं. व आणखी-

ही सांगतां येतील. पण, या ठिकाणीं आज विशेष विस्तार करीत नाहीं. तूं **थियोडर पार्कर** हें नांव ऐकिलें आहेस?

**सुंदरी**—एका लहानशा पुस्तकांत त्याच्याबद्दल थोडें-सें वाचलें होतें. त्याच्याविषयीं आपल्याला काय सांगायचें असेल तें सांगावें.

**सुबोध०**—त्याच्याविषयीं एका पुस्तकांत लिहिलें आहे कीं, तो पांच वर्षांचा असतां एके दिवशीं शेतांतून घरीं येत असतां, वाटेंत एका लहानशा तलावांत एक कांसवाचें पोर खेळत होतें. त्यास मारण्याच्या उद्देशानें हातांत एक दगड घेऊन तो जवळ गेला आणि आतां दगड मारणार; इतक्यांत "**पार्कर**, मारूं नको." असे शब्द ऐकल्याचा त्याला भास होऊन आश्चर्यानें तो चोहों बाजूस पाहूं लागला. पण, कोणी दिसलें नाहीं. तेव्हां तो भयचकित होऊन धांवत धांवत आईजवळ गेला व तिच्या मांडीवर बसून सर्व हकीकत तिला सांगितली आणि विचारिलें, "आई, मला हें कोणी सांगितलें?" आईनें उत्तर दिलें "बाळा, लोक याला **विवेक** असें ह्मणतात. आणि मी तर याला **ईश्वरीप्रेरणा** असें ह्मणतें. हें बोलणें ऐकायचा जसजसा तूं प्रयत्न करशील, तसतसें तुला तें स्पष्ट ऐकूं येऊं लागेल; आणि तेंच तुझ्या उन्नत-जीवनमार्गाचें प्रदर्शक होईल." पहा, पार्कर अशा उदारचरित मातेच्या उदरीं जन्मला होता ह्मणूनच तो आज उन्नतशील अमेरिकेच्या आकाशांत उज्वल नक्षत्र होऊन राहिला आहे. केवळ अमेरिकेंतच नव्हे; तर सर्व भूमंडलपटावर अक्षय अक्षरांनीं महात्म्या **पार्कर**चें नांव

चिरअंकित राहील. सुंदरी, तूं "टामकाकाची झोंपडी" या नांवाचा विषय एका मासिकपुस्तकांत आला होता, तो वाचला आहेस?

सुंदरी—होय, त्यांत गुलामाच्या व्यापाराविषयीं फारच भयंकर हकीकत दिली आहे.

सुबोध०—गुलामाचा व्यापार नाहींसा करण्यासाठीं ज्या महात्म्यांनीं आपले प्राण खर्ची घातले, त्यांत महात्मा पार्कर हा अग्रेसर पुरुष होता. त्याच्या आंगच्या उत्साहउद्यम, अध्यवसाय आणि धर्मनिष्ठा या गुणांनीं अमेरिकेंत एक आश्चर्यकारक फेरफार करून सोडला आहे. अशा तऱ्हेनें मुलांच्या अविकसित विवेक आणि धर्मभाव या गुणांना परिस्फुट करण्यासाठीं किती माता विचारपूर्वक यत्न करीत असतील बरें! पण, अशाच तऱ्हेच्या मातेचें सुशिक्षण मिळाल्यामुळें पार्कर स्तुत्यर्ह सज्जन मंडळींत विराजमान झाला आहे. सुशिक्षित आई असल्यावांचून सुपुत्र होणार नाहीं; या नियमाची सत्यता दाखविणारीं शेंकडों प्रमाणें नजरेसमोर असतां, आपले लोक समाजहिताचें आदिस्थान जी स्त्रीजाति, ती सुशिक्षित करण्याच्या कामीं फारच आळस करितात; हें फार शोचनीय आहे.

सुंदरी—पुष्कळ लोकांच्या तोंडून मीं ऐकिलें आहे कीं, स्त्रियांना लिहायला वाचायला शिकविलें तर कुटुंबांत अशांति उत्पन्न होते; व त्या गर्विष्ट होऊन नवऱ्याच्या शासनांत राहत नाहींत.

सुबोध०—क्षुद्र मनाच्या मनुष्यांना त्यांचाही कुसंस्कार दूर करण्यासाठीं इतकें सांगितलें ह्मणजे पुरे कीं,

सुशिक्षणाचा निर्मळ प्रवाह कधींही अस्वस्थतेचें बीज निर्माण करणार नाहीं. आपल्या खराब विचारानें उद्भत झालेला कुभाव तुमची शांतिप्रियता आणि उदारता यांचा नाश करितो. नारीजीवनाची जी दुर्दशा झाली आहे, त्याला वास्तविक जबाबदार तुह्मीच आहां. ज्या वेळीं आपला संसार, आपला गांव व स्वदेश यांच्या कल्याणासाठीं आपलें चित्त चिंताव्यग्र होतें, त्या वेळीं सुविचारानें आपल्या मनाचा असा निश्चय होतो कीं, स्त्रीजातीला सुशिक्षित करणें हेंच आपलें आदि व अवश्य कर्तव्य आहे. कारण, भावी उन्नतीचा उद्गम तेथेंच आहे. सुंदरी, तुह्मा स्त्रीजातीची उन्नति झाल्याशिवाय आपल्या समाजाचें अर्थात् देशाचें कल्याण कदापि होणार नाहीं; आपल्या देशांत पौरुष व सुजनत्व यांचा उदय होणार नाहीं; आणि आपल्या समाजाची दुर्दशाही दूर होणार नाहीं. तुझ्या पित्यानें तुला ल्याहायला वाचायला शिकविलें होतें. पण, त्यापासून या आमच्या घरांत कांहीं अशांति अथवा विशृंखलभाव उत्पन्न झाला नाहीं. उलट या माझ्या लहानशा संसारांत शांति व आराम विराजमान झालें आहे; आणि त्याचा सुखानुभव मी नित्य घेत आहें. माझी आई रोज हरिनामाचा जप करीत असते. तिनें तुझ्याविषयीं कधीं विरक्ति अथवा तुझ्या विद्याभ्यासाबद्दल तिरस्कार दाखविलेला नाहीं.

**सुंदरी**— ज्या अवस्थेंत राहून आपण सर्वदां सुख आणि शांति अनुभवीत आहों, ती अवस्था थोड्याच लोकांच्या नशिबीं असेल. आणि कदाचित् कित्येकांच्या नशिबीं असली, तरी त्या सुखस्थितीचा त्यांना अनुभव

येतां येत नाहीं. किंवा ज्या अवस्थेला आपण सुखदायी समजतों, त्या अवस्थेंत पुष्कळ लोक असंतुष्ट असतात. आपल्या संसारांत सुख आणि शांति नांदत आहे; याचें मुख्य कारण सासुबाईच आहेत. त्यांच्यासारखी शांत-स्वभावाची व धार्मिक बायको फारच विरळा. माझ्या हातून अज्ञानपणानें पुष्कळ चुका घडतात; पण एक वेळही त्यांच्या तोंडून कठोर शब्द आला नाहीं. मला कांहीं सांगायचें झालें, तर अशा गोड शब्दांनीं सांगतात कीं, तें एकून मी कधींही असंतुष्ट झालें नाहीं.

सुबोध०—या संसारांतील सुखाचा बहुतेक भाग तुमच्या स्त्रीजातीच्या उन्नतीवर अवलंबून आहे. तुमच्या जीवनचा उत्कर्ष केल्यानें जनमंडलाचा हरएक विषयांत लाभ होणार आहे. त्या सर्वांत शिशुशिक्षण हा लाभ मोठा आहे. कुसंस्कार, भूतप्रेताबद्दल मिथ्या कल्पना, विलक्षण धर्मवेड यांनीं दूषित झालेल्या मनापेक्षां सुशिक्षणानें सुसंस्कृत झालेल्या आयांचें हृदय जर कोमल मनाच्या बालक-बालिकांचें परिचारक होईल, तर आपल्या देशाची भावी स्थिति निराळेंच स्वरूप धारण करील; यांत कांहीं शंका नाहीं.

सुंदरी—जे आईच्या सद्गुणामुळें या संसारांत सौजन्य आणि अतुल प्रतिभा ठेवून गेले, अशा सज्जनांविषयीं आणखी कांहीं सांगाल तर बरें होईल.

**सुबोध०—अमेरिकेंतील जान रेनडल्फ** नांवाच्या एका राजनीतिज्ञ पंडितानें एके ठिकाणीं लिहिलें आहे— " जर मला लहानपणची आठवण वरचेवर झाली नसती, तर मी ईश्वरविद्वेषी नास्तिक बनलों असतों. माझी स्वर्ग-

वासी माता माझे हात आपल्या हातांनीं धरून व मला गुडघ्यांवर बसवून सांगते कीं, "आपला पिता (देव) स्वर्गांत आहे." आईचा धर्मभाव आणि चरित्र यांनीं मुलांच्या जीवनाचें कसें आश्चर्यकारक परिवर्तन होतें याबद्दल कवि कॉपर यानें स्वतःचा मित्र रेवरेंड जान न्यूटन याच्या जीवनचरित्रांत एके ठिकाणीं लिहिलें आहे कीं, "जान न्यूटन याचे आईबाप मरण पावल्यावर हा खारव्याचें काम करूं लागला इतकेंच नव्हे, तर यानें पुष्कळ अनन्वित कृत्यें केलीं. तो आपल्या यौवनचांचल्यामुळें पापमार्गांत दडला आणि त्या पापकर्दमांतच आपलें आयुष्य घालवूं लागला. कांहीं दिवस लोटल्यावर एके दिवशीं स्वस्थ पडला असतां त्याला बाल्यकालांतील आईच्या उपदेशाची आठवण होऊन आपल्या निंदनीय स्थितीबद्दल फार वाईट वाटलें व तेव्हांपासून त्याचें आचरण सुधारत जाऊन त्याला वाटूं लागलें कीं, आपली स्वर्गवासी माता स्वर्गाचें आवरण उन्मोचन करून माझ्या हृदयांत प्रविष्ट झाली आहे; आणि ती हळूहळू मला धर्म आणि नीति यांचा मार्ग दाखवीत आहे. शेरुटन येथील एका स्त्रीविद्यालयांत परीक्षा होत असतां अमेरिकेचा प्रख्यात प्रेसिडेंट एदम हा तेथें हजर होता. त्या वेळीं त्या विद्यार्थी बालिकांनीं जें त्याला मानपत्र दिलें, तें पाहून त्याचें हृदय विरघळलें. व त्या मानपत्राच्या उत्तरांत त्यानें आपल्या जीवनचरित्रावर आईच्या सदुपदेशाचा ठसा कितपत वठला आहे हें खालीं लिहिलेल्या शब्दांत सुंदर भावानें प्रकाशित केलें होतें. "सुशिक्षित आणि संतानपालनांत संपूर्ण रीतीनें कुशल अशी माता मिळणें हें मनुष्याचें मोठ्यांत मोठें भाग्य सम-

जलें पाहिजे. आणि मी तसा भाग्यशाली आहें असें सांगून मातेविषयींचें एक लहानसें कर्तव्य बजावूं पहात आहें. लहानपणांत माझी माता मला सदुपदेश करीत असे आणि त्याचें तात्पर्य जें नीति आणि धर्म परायणता, तें माझें सन्मित्र होऊन मजमध्यें वास करीत आहे आणि तें खरोखर माझ्या प्राणांतापर्यंत तसेंच राहील. अहाहा! त्या पवित्र मातेनें मला जें जें सुशिक्षण दिलें होतें, तें तें मी संपूर्ण रीतीनें अमलांत आणूं शकलों नाहीं; ह्मणून मी फार दिलगीर आहें. आतां मला येथें हेंही कबूल केलें पाहिजे कीं, मजमध्यें जी जी अपूर्णता राहिली आहे, ती सारी माझीच चूक आहे. कारण, त्या परलोकवासी पूज्य मातेच्या सदुपदेशाप्रमाणें मी वागलों नाहीं. * " फ्रान्सचा बादशहा **नेपोलियन बोनापार्ट** ह्मणत असे कीं, " बालकांचें भावी चांगलें किंवा वाईट होणें हें मातेवर अवलंबून आहे. मीं आपल्या जीवनांत उन्नति, उत्साह, उद्योगीपणा आणि आत्मसंयमन वगैरे जे गुण मिळविले आहेत, ते न मिळविण्याच्या कामीं माझे मातेनें मला जी मदत केली आहे, ती अवर्णनीय आहे. " **नेपोलियन बोनापार्टचें** चरित्र लिहिणारा ह्मणतो कीं, " त्याच्या मातेशिवाय त्यावर दुसऱ्या कोणाचीही सत्ता चालत नसे. त्याच्या आईनें त्याला सदुपायावलंबनानें, प्रीतिपूर्ण शासनानें व न्यायाचरणानें मातेवर प्रीति करण्यास शिकविलें होतें. ह्मणूनच तो तिची आज्ञा पालन करण्यांत तत्पर असे.*" सुंदरी, फार काय सांगूं? सुशिक्षण व सदाचरण हेंच वंशपरंपरेनें जनमंडळाचें फार कल्याण अथवा अकल्याण करणारें आहे. आतां तूंच

* स्माईल कृत करेक्टर पृ० ४७—४२

विचार करून पहा कीं, स्त्रियांचें सामर्थ्य सर्वकाळीं व सर्व ठिकाणीं एकसारखें आहे कीं नाहीं? जनमंडळाची नीति आणि चरित्र स्त्रियांच्या अवस्थेची उन्नति अथवा अवनति यांवर किति आधार ठेवून आहे? जेथील जेथील स्त्रियांनीं जितकी जितकी उन्नति मिळविली आहे आणि सुशिक्षण संपादिलें आहे, तेथील तेथील लोकसमाज तितकी तितकी उन्नति मिळविण्यास पुढें सरसावला आहे. आणि जेथील स्त्रीजीवन कुशिक्षण, कुसंस्कार आणि खराब आचरण यांत बुडालेलें आहे, तेथील लोकसमाज अवनतीस जाऊन हीनदशाग्रस्त झाला आहे.

---

# प्रकरण सातवें.

सुंदरी आणि सुबोधचंद्र यांनीं अशा रीतीनें संभाषण चालवून जें नवीन ज्ञान मिळविलें होतें, त्या ज्ञानाचा उपयोग करण्याची संधिही त्याच वेळीं होती. त्यामुळें त्यांची जीवनगति बदलली होती इतकेंच नव्हे; तर आकांक्षा आशेच्या मार्गांत अग्रेसर होऊन राहिली होती. त्यांच्या अंगीं गुप्त असलेला साधुभाव प्रकाशित होऊं लागला होता. अरुणोदय झाल्याबरोबर जसा अंधकाराचा नाश होतो, त्याप्रमाणें साधुसंकल्पाच्या प्रवाहानें अपवित्र भाव त्यांच्या मनांतून हळूहळू जात चालला होता. कर्तव्यज्ञानाचा प्रभाव असा आहे कीं, तें मनुष्याची जडता आणि आलस्य कायमचें घालवितें. त्यांच्या अंतःकरणांत या वेळीं असा आश्चर्यजनक उत्साह आणि उद्यम उत्पन्न झाला होता कीं, त्यामुळें त्यांच्या मनाला

स्वस्थता नव्हती. आपल्या मुलाला सौजन्य देण्यासाठीं ती यत्न करूं लागली. आणि आजपर्यंत जे संकेत व उपाय त्यांनीं समजून घेतले होते, ते चारपांच महिन्यांच्या बालकाला सुशिक्षण देण्याच्या उपयोगीं पडण्यासारखे होते. आज संध्याकाळीं **सुबोधचंद्र**, आई आणि **सुंदरी** यांजबरोबर बोलत बसला.

**सुबोध**०—आई, मला सौजन्य प्राप्त होण्याकरितां तूं ज्या उपायांचें अवलंबन केलें होतेंस, त्यांपैकीं मात्र कित्येक तूं मागें सांगितले होतेस. आज आणखी कांहीं सांगायचें ना ?

**आई**—ज्या खराब शिक्षणानें बालकांचें जीवन कुमार्गाकडे वळतें, त्याबद्दल थोडेंसें वर्णन करून कोणत्या उपायांनीं तुला कुमार्गापासून दूर ठेविलें होतें त्यांपैकीं कित्येक उपाय मीं सांगितले होते. पण, ज्या उपायांनीं प्रत्यक्ष तुझ्या शिक्षणाला मदत झाली, त्याबद्दल कांहीं सांगितलें नव्हतें; तें आज सांगतें. ज्या वेळीं तूं शिक्षण घेण्यायोग्य झाला होतास, त्या वेळीं ज्ञानाच्या न्यूनतेमुळें कित्येक विषय मला चांगले समजत नव्हते. पण, मी आज अनुभवानें पुष्कळ गोष्टी जास्त समजतें. आपला मुलगा कर्तव्यभूमीवर धर्मप्रदीप हातांत घेऊन ज्ञानमार्गावर पुढेंपुढें जावा अशी प्रत्येक आईबापांची इच्छा असते. कारण, कीर्तिमान मुलाच्या योगानें वंशाची योग्यता वाढते. **सुबोध**, तूं इंग्रजी शिकला आहेस. पुष्कळ इंग्रजी ग्रंथांवरून बालशिक्षणाबद्दल चांगल्याचांगल्या गोष्टींचा विचार करून आपल्या बायकोला सांगतो आहेस; हें पाहून मला फार आनंद होतो. परंतु,

आमच्या देशांतील मुलांना सुमनुष्य करण्यासाठीं स्वदेशीयांचींच आदर्शरूप चरित्रें गोष्टींच्या रूपानें त्यांना समजाविलीं पाहिजेत.

सुबोध०–आई, मला पक्की आठवण आहे कीं, मी जेव्हां लहान होतों, त्या वेळीं तूं मला जवळ बसवून राजा हरिश्चंद्राची कथा, वाल्मिकाची मुक्ति वगैरे गोष्टी सांगत असस व मी मोठ्या उत्सुकतेनें त्या ऐकत होतों. त्या मी कधींही विसरणार नाहीं. आजही मला त्या गोष्टी जशाच्या तशा आठवतात.

आई–राजाधिराज हरिश्चंद्रानें स्वार्थत्याग आणि अनंत क्लेश सहन केले; पण सत्य सोडिलें नाहीं. रत्नाकरानें रामनामस्मरण करून नवजीवन मिळविलें व वाल्मीकि नांवानें तो जगद्विख्यात झाला. या गोष्टी जर बालकांच्या कोमल मनावर ठसल्या नाहींत, तर तीं कशीं सत्यनिष्ठ होतील? जगदीशाचे ठिकाणीं त्यांची दृढभक्ति कशी बसेल? वाल्मिकाची मुक्ति, हरिश्चंद्राचा सत्यप्रियतेकरितां स्वार्थत्याग, युधिष्ठिराची धर्मनिष्ठा, भीष्माचें शरशय्याशयन, पार्थ वीराचें रणकौशल्य व बाहुबल, रघुकुलतिलक रामचंद्राची पितृभक्ति, बंधुप्रेम व प्रजारंजनार्थ स्वार्थत्याग, लक्ष्मणाची वडील बंधूवर निस्सीम निष्ठा आणि वीरत्व, त्याप्रमाणेंच राजकुमारी सती पार्वति हिला तिच्या बापानें केलेली शिवनिंदा सहन न झाल्यामुळें तिनें केलेली आत्महत्या, राजदुहिता व राजवधू असतां सीता आपल्या पतीबरोबर अरण्यांत जाण्यास तयार झाली, वनवासांतील दुःखें तिला समजाविलीं तरी तिचा आग्रह सुटला नाहीं, रामचंद्राच्या

सहवासांत बराच कालपर्यंत दुःखकष्ट भोगावे लागले, तरी तिच्या मनांत असमाधान कधींही शिरलें नाहीं. दरिद्री ब्राह्मणकुमार सत्यवान अल्पायुषी आहे हें समजलें तरी सावित्रीचा सत्यवानाला वरण्याविषयीं ठरलेला निश्चय ढळला नाहीं व शेवटीं आपल्या अलौकिक पातिव्रत्य गुणाचें आश्चर्यजनक उदाहरण तिनें मागें ठेविलें आहे. अशा तऱ्हेच्या सर्व सद्गुणदर्शक गोष्टी सरळ भाषेनें लहान लहान बालक-बालिकांच्या अस्फुट अंतःकरणावर ठसविण्याचा प्रयत्न करणें अत्यंत जरूर आहे. आपल्या देशांतील लोक वंशवृद्धि झाली नाहीं तर महा पापी असें समजतात व नरकयातनेंतून आपली सुटका होत नाहीं अशी त्यांची समजूत आहे, त्यामुळें संतानप्राप्तीकरितां ते अनेक खायखाही करितात. पण, आपल्या मुलांना सुमनुष्य करण्याच्या कामांत ते अगदीं लक्ष्य देत नाहींत हें पाहून फार दुःख होतें.

सुबोध०—आई, असें हें कां बरें होतें? याबद्दल लोक कांहीं विचारच करीत नाहींत? मला वाटतें हा विषय चांगला समजत नसल्यामुळें आपल्या लोकांची फार दुर्दशा झाली आहे.

आई—सुबोध, आजकाल आपले लोक संसारिक बुद्धीला अत्यंत वशीभूत होऊन गेले आहेत व धर्मबुद्धि, आणि धर्मभाव हीं जनमंडळाच्या अंतःकरणांतून अज्जी निघून जाऊं पहात आहेत; त्यामुळेंच आपल्या लोकांची अशी दुर्दशा झाली आहे. 'अरण्यवास केल्याशिवाय धर्मसाधन होत नाहीं. व्यापाराच्या कामांत ठकविद्या पाहिजेच पाहिजे. नोकरी करीत असतां प्रवंचना करणें आणि

लांच खाणें यांत अन्याय नाहीं.' असा कुभाव आपल्या लोकांत शिरला आहे. हेंही आपल्या दुर्दशेचें एक कारण होय. अशा अवस्थेंत आईबाप मुलांना सुशिक्षित करण्यास समर्थ होत नाहींत. आपणच जर मनुष्यत्वाला झुगारून दिलें, तर आपलीं मुलें सुमनुष्य करण्याची इच्छा तरी त्यांना कशी प्राप्त होणार? एखादे वेळीं आंधळा पाहूं शकेल, बहिऱ्याला ऐकूं येईल, मुका बोलेल, पण आईबाप मनुष्यत्वांत नसून सुसंतानाची इच्छा करणें, सत्यवादी आणि धर्माकांक्षी आईबाप नसून धर्मनिष्ठ मुलें होण्याची इच्छा करणें, आपण स्वतः व्याभिचारी आणि दारूबाज असून चांगल्या मुलांचा बाप होऊं इच्छिणें यापेक्षां दुसरा मोठा अन्याय तो कोणता? तसेंच जी आई पिशाच्याची भीति बाळगते, "रात्रीं अंधारांत पिशाच्यांची फिरण्याची वेळ असते, पिंपळाच्या वृक्षावर आपला समंद ठेवलेलाच!" अशी जिची समजूत असते, आणि सुदृढ प्रकृति असून भूतपिशाच्याची बाधा झाली असा जिचा विश्वास बसतो, त्या आईचीं मुलें सद्गुणी कधींही निपजणार नाहींत.

**सुबोध०**---आई, स्वदेशाची प्राचीन स्थिति आणि अर्वाचीन स्थिति यांची जर तुलना केली, तर काय बरें फरक दिसेल?

आई --एक मोठें परिवर्तन पहाण्यांत येईल कीं, पूर्वींचीं मनुष्यें धर्मावर निष्ठा ठेवून आपलें कर्तव्य बजावीत असत. सध्यांही अशीं कित्येक कुटुंबें पहाण्यांत येतात. अशा कुटुंबांत एखादे वेळीं असें होतें कीं, वृद्ध घरधनीण सर्वांना जेवायला वाढल्यावर आपण जेवायला बसणार,

इतक्यांत कोणीतरी अतिथी येतो. तेव्हां ती आपलें वाढलेलें पान त्या अतिथीच्यापुढें ठेवते आणि आपण सर्व दिवस निराहार राहते; अथवा पुनः स्वयंपाक करून जेवते. हें त्या वृद्ध मातेचें कृत्य मुलांनीं पाहिलें ह्मणजे परोपकाराविषयींची श्रद्धा त्यांच्या मनांत जागृत होते. प्राचीनकाळीं हिंदु कुटुंबांत अतिथिसत्कार, विपत्तींत पडलेल्यांस आश्रय देणें वगैरे चांगल्या गोष्टी मुलांच्या नजरेस पडत; त्यामुळें मुलें सहज दयाशील, परोपकारी, धर्मनिष्ठ, मिष्टभाषी अशीं स्वाभाविक होत. पण, ते सुखाचे दिवस निघून गेले. प्राचीनकाळीं घरच्या घरीं जो व्यवहार त्यांच्या नजरेस पडे, त्यावरून तीं सहज सुशिक्षित होत असत. पण, सध्यां त्याच्या विरुद्ध स्थिति पहाण्यांत येते.

सुबोध०—आई, तुझें बोलणें मला फार गोड लागतें.

आई—पूर्वीं बाराही महिने घरोघर कांहींना कांहीं तरी धर्मकृत्यें वरचेवर होत असत. परंतु, सध्यां त्यांचा लोप होत चालला आहे. त्यांच्या बदला दुसऱ्या नव्या गोष्टींचाही स्वीकार होत नाहीं. व पहिल्या धर्मानुष्ठानाच्या जागाही कमी होत चालल्या. तेव्हां मुलांच्या नजरेला ज़र असें वडिलांचें वर्तन नमुन्याला असलें, तर तीं तरी धर्मनिष्ठ कशीं होतील?

सुबोध०—आपले लोक परक्याचे दोष शोधण्यांत आणि परक्याची निंदा व चर्चा करण्यांत हुशार झाले आहेत. दुसऱ्याचे लहानसे जरी दोष असले, तरी ते पर्वतप्राय करून त्यांची चर्चा करण्यांत आनंद मानून सर्व वेळ त्यांतच घालविण्याची त्यांना हौस असते; त्यामुळें अशा लोकांचीं मुलें लहानपणापासूनच हा गुण शिकतात. सद्गुणी होण्या-

ची आशा न उरल्यामुळें उत्तरकाळीं त्यांच्या संसाराची हानि होते. याकरितां प्रत्येक आईबापानें अशी खबरदारी घेतली पाहिजे कीं, आपलें प्रत्येक काम प्रतिक्षणीं मुलांना किर्त्याप्रमाणें झालें पाहिजे.

आई—आपल्या आईबापांची चराचर विश्वपति परमेश्वरावर निष्ठा नाहीं, आपल्या दोषांकडे त्यांचें लक्ष्य नाहीं आणि पुष्कळ वेळ आपल्या मलमय जीवनावर सदय होऊन न्यायरहित जीवन चालवितात, असें जर मुलांच्या अवलोकनांत आलें, तर तींही अखेरपर्यंत कर्तव्यज्ञानरहित होऊन स्वार्थपरायणतेच्या भयंकर तडाक्यांत सांपडतात; यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

सुबोध०—आणखी थोडासा स्थिरभावानें विचार केला ह्मणजे असें दिसतें कीं, धार्मिकाला धर्मज्ञान, राजाला राज्यशासनाचें ज्ञान, समाजाला समाजशृंखलाविषयक ज्ञान, हें जर लोकांच्या अंगीं नसेल, तर खरोखर योग्य गृहस्थ किंवा योग्य गृहिणी होतां येणारच नाहीं. आणि या सर्व गुणांच्या ज्ञानाभावानें कुटुंबाचें कल्याण कधींही होणार नाहीं. सारांश, मनुष्याच्या अंगीं हे गुण जितके जास्त असतील, तितका तो संसारांत धन्य धन्य होणार यांत संदेह नाहीं.

---

## प्रकरण आठवें.

आतां सुबोधचंद्राचा मुलगा बोलायला चालायला लागला आहे. दुसऱ्याचें बोलणें त्याला समजूं लागलें. त्याची शरीररचना आणि शक्ति यांबरोबर त्याच्या

अंतःकरणांतील विचारांकुराचीही वृद्धि होऊं लागली. त्याच्या प्रत्येक कृत्यांत ज्ञानाचा भास दिसूं लागला होता. त्या मुलाच्या जीवनाचा असा समय आला होता कीं, त्याच्या दृष्टीसमोर मनुष्यजीवनाचें वीरत्व, महत्व, साधुता आणि विनय यांचें साक्षात् चित्र धरल्यास पुण्य, पवित्रता, प्रेम आणि दया यांची छवी त्याच्या हृदयपटावर अंकित व्हावी. आणि मलीन संसाराच्या दुर्गंधमय विषारी हवेपासून त्याला दूर ठेविल्यास नानाप्रकारच्या कुशिक्षेपासून त्याचा बचाव होईल. तो मुलगा आपल्या मनोहर नयनाभिनयानें मातापिता आणि इतर आत्मजन यांच्या नयनमनाची परितृप्ति करीत होता.

एके दिवशीं सायंकाळीं सुंदरी आपल्या पतीशेजारीं बसून बोलत होती. ती ह्मणाली-"इतके दिवसपर्यंत आपलें जें बोलणें चाललें होतें, तें आपल्या स्वतःच्या कर्तव्याबद्दल ह्मणजे मुलाला सुशिक्षण देण्याला आपण कसें असलें पाहिजे; कोणकोणत्या गोष्टींची तयारी केली पाहिजे याविषयीं होतें. आणि ज्या गोष्टींचा प्रत्यक्ष संबंध मुलांच्या शिक्षणाकडे आहे, अशाही कित्येक गोष्टी आपण मला सांगितल्या आहेत. त्यावरून माझी अशी खात्री आहे कीं, आपल्या विचाराप्रमाणें जर मुलांना शिक्षण मिळेल, तर तीं खरोखरच मोठीं भाग्यशाली व स्तुतिपात्र होतील. आतां या आपल्या बाळाचें मन, विचार, बुद्धि, ज्ञान हीं विकसित होण्यासाठीं कसकशी तयारी केली पाहिजे याबद्दल कांहीं सांगणें व्हावें.

**सुबोध०**—मुलांना सुशिक्षण देण्यासारखें कठीण परंतु महत्वाचें असें दुसरें एकही काम नाहीं. या शिक्ष-

णांत जर विचारपूर्वक सुधारणा केली, तर आपल्या देशांतील पाप, ताप, रोग, आणि दारिद्र्य यांचा नाश होण्याचा संभव आहे. असो, या विषयाबद्दल तुला सांगूं लागलों तर कित्येक महिने लोटतील; यासाठीं आज तुला थोडक्यांत सांगतों.

तुला आरंभीं एक वेळ सांगितलें आहे कीं, मुलें जन्मल्यापासूनच शिक्षण मिळवूं लागतात. त्यांचे सुकोमल नेत्र प्रतिक्षणीं निरनिराळ्या अद्भुत वस्तु पाहतात. आणि त्यांचे सुकुमार कान प्रतिक्षणीं गुरु, लघु, मधुर, कर्कश असे नानाविध आवाज ऐकत असतात. जसजसें त्यांचें शरीर शुक्लेंदुप्रमाणें वृद्धिंगत होत असतें, तसतशा त्यांच्या मनोवृत्तीही दिवसेंदिवस जागृत होऊं लागतात. यासाठीं अगदीं लहानपणापासूनच मुलांचीं मनें सुमार्गाकडे लावण्याची व कुमार्गापासून दूर ठेवण्याची खबरदारी घेतली पाहिजे. त्यांना आरंभींच विनय शिकविला नसल्यास मोठेपणीं त्यांच्या अंगीं तो गुण येणें कठीण जातें. मुलें दोन वर्षांचीं होत तोंपर्यंत आईवांचून दुसरें कोणी त्यांना वशीभूत करण्याला समर्थ नसतें. त्या अवधींत केवळ स्नेहमयी माताच आपल्या मनोहर स्वभावानें मुलांच्या मनांत श्रमरहित शिक्षण व विनय यांचें बीजारोपण करण्यास समर्थ असते. त्या वेळीं तीच माता शिक्षागुरु आणि तिचा मृदुअंकच सुशिक्षण मिळविण्याचें स्थळ असतें. आणि त्यामुळें तीं मुलें तनदुरुस्त आणि प्रसन्नहृदय राहून नानाप्रकारचे प्रत्यक्षगोचर पदार्थ ओळखूं लागतात व त्यांचे गुणदोष त्यांना समजतात. कीटपतंगादि जीवजं-

तूंना त्रास देण्यांत अथवा त्यांचा संहार करण्यांत पराङ्गमुख होतात आणि मत्सरवगैरे रिपूंच्या स्वाधीन न होतां इतर मुलांबरोबर मित्रत्व करण्याला शिकतात. याकरितां आरंभींच खबरदारी ठेविली पाहिजे. सध्यां आपला मुलगा दोन वर्षांचा झाला आहे. त्याला एव्हांपासूनच शाळेंत पाठविला पाहिजे. कारण, त्याचें वय या वेळीं शिक्षणायोग्य झालें आहे. आपल्या निर्मळचंद्राला ( त्यांच्या मुलाचें नांव ) दोन वर्षें पुरीं होऊन तिसरें वर्ष चालू आहे. या वेळींच मोठी खबरदारी ठेविली पाहिजे. हें वय जर लाडिकपणांत अथवा बेफिकिरींत घालविलें, तर पुढें त्याचा चांगला परिणाम होणार नाहीं. तुला माहितच आहे कीं, कोमल लता जशी वांकवावी तशी वांकते. त्याप्रमाणेंच निर्मळचंद्राच्या मनोवृत्तिरूप लता ज्या मार्गाकडे वळवूं, त्यावरच त्याच्या भावी वर्तणुकीचा बहुतेक अंश अवलंबून आहे. अशा लहान वयांतच मुलांच्या मनांत एकप्रकारचा फेरफार होत असतो. तीं आसपासच्या मंडळींचीं हरएक कृत्यें सुतीक्ष्ण नजरेनें पहात असतात. आणि त्याची छाया मुलांच्या मनावर अचलित राहते. यासाठीं आपल्याला आमच्या व निर्मळचंद्राच्या सहवासांत जीं मनुष्यें असतील, त्यांच्या वागणुकीवर पूर्ण लक्ष्य ठेविलें पाहिजे. सुंदरी, यावरून आपणा उभयतांवर केवढी जबाबदारी आहे बरें? अशा वयाच्या मुलांकरितां विलायतेंत शाळा आहेत व त्यांत मुलांच्या मनाला त्रास न देतां हंसत खेळत सुशिक्षण देतात.

सुंदरी—दोन वर्षांचीं मुलें तीं काय? आणि शाळेंत

जाऊन तीं शिकणार तरी कशीं? उलट रडून रडून त्या बिचाऱ्या शिक्षकाला पुरे पुरेसें करीत असतील! जरा मूल रडलें कीं त्याच्या आपाला त्रास होतो. मग अशा मुलांना संभाळून त्यांचें मन शांत राखायाला गुरुजी समर्थ असतात?

सुबोध०— असें नव्हे. अशा लहान मुलांना शिकविण्याचें स्थळ आपल्या देशांतील गांवठी किंवा सरकारी शाळा नव्हे. त्या मुलांच्या शाळा निराळ्या प्रकारच्या व निराळ्याच धोरणावर चालविण्यांत येतात. अशा शाळा आपल्या देशांत मुळीं नाहींतच. विलायत आणि जर्मनी या देशांत मात्र अशा शाळा आहेत. त्यांतील व्यवस्था व शिक्षण हीं कांहीं विचित्र आहेत. आपल्या देशांत लहान मुलांना शिकविण्याकरितां जसे चार पांच रुपये पगाराचे शिक्षक असतात, तसे त्या शाळेंत नाहींत. त्यांत अनुभवी, विद्वान्, वृद्ध आणि शांत प्रकृतीचे व मोठमोठ्या पगाराचे शिक्षक असतात.

सुंदरी—या शाळांबद्दल आणखी कांहीं माहिती असेल तर मला सांगावी.

सुबोध०—या शाळांतील शिक्षण अशा प्रकारचें असतें कीं, तें मुलांना मनोरंजक होऊन त्या शाळा मुलांना क्रीडाभुवनाप्रमाणें वाटतात. त्या शाळेंतील व्यवस्था व शिक्षणपद्धति यांचें वर्णन करूं लागलों, तर लांबच्या-लांब चऱ्हाट होईल. करितां मुख्यमुख्य नियमांचेंच थोडेंसें वर्णन करितों.

१ अभ्यासाची जागा विशाल असून तींत स्वच्छ आणि निर्मळ हवा मोकळेपणानें खेळेल अशी असते. सर्व ठिकाणीं

चांगला प्रकाश पडत असतो व त्यांत मुलांच्या मनावर स्वच्छपणाचें महत्व ठसवीत असतात.

२ मुलांच्या मनांत चांगल्या गोष्टींविषयीं प्रीति आणि वाईट गोष्टींबद्दल तिरस्कार उत्पन्न होईल, असा बंदोबस्त त्या विद्यालयांत ठेविलेला असतो. व त्याकरितां त्यांची कर्मणुकीची जागा स्वच्छ व सुंदर अशी ठेविलेली असून नानाविध सुंदर फुलझाडांनीं सुशोभित केलेली असते. तो सुंदर व भव्य देखावा मुलांच्या नजरेसमोर असल्यामुळें त्यांची चित्तवृत्ति प्रसन्न राहून त्यांचीं मनें दिवसेंदिवस निर्मळ होत जातात.

३ मुलांचे हस्तपादादि अवयव संचलित राहून त्यांची वृद्धि व्हावी याकरितां त्या शाळेजवळ मोकळेपणानें स्वच्छ हवा खेळेल असें एक क्रीडाभुवन असतें.

४ मोठेपणीं नानाप्रकारच्या लोकांशीं व्यवहार कसा ठेवावा यांबद्दलही शिक्षण देण्याची व्यवस्था त्या विद्यालयांत व्हावी, ह्मणून निरनिराळ्या दर्जाचीं पुष्कळ मुलें एके ठिकाणीं ठेवलेलीं असतात. त्या मुलांची संख्या निदान ९० तरी असते.

५ तीं मुलें परस्परांशीं कशीं वागतात यावर शिक्षकांची नजर असते. तीं एकत्र जमून जेव्हां खेळत असतात, तेव्हां त्यांच्या वर्तनावर शिक्षकांची आडून नजर असते. त्यांस एखाद्या मुलाचें गैरवर्तन दिसल्यास तावडतोब त्याच्या अन्यायाबद्दल समजूत देण्यांत येते.

६ त्या शाळेंतील गुरुजी मुलांशीं नेहमीं स्नेहानें, दयेनें, वात्सल्यानें व प्रसन्न भावानें वागतात; आणि

आपल्या सुवर्तनानें मुलांचीं मनें सुप्रसन्न ठेवितात. परंतु, आपला भाव कमी न व्हावा ह्मणून गुरुजींना खबरदारी ठेवावी लागते

७ मुंग्या, माशावगैरे लहान जीवजंतु मुलांच्या दृष्टीस पडले ह्मणजे तीं त्यांना पकडून मारून टाकतात; असें झालें ह्मणजे निर्दयाचरणाची त्यांना संवय होते. यासाठीं अशा कामांत मुलांवर चांगली नजर ठेवावी लागते. दुसऱ्या प्राण्यांना त्रास देणें ही धर्माविरुद्ध गोष्ट आहे हें समजण्यासाठीं कित्येक पाळलेले पशु असतात; त्यांबरोबर कसें वागावें, त्यांवर दया कशी ठेवावी वगैरे गोष्टींचा अभ्यास मुलांकडून करवून त्यांच्या मनांतील निर्दयतेचें बीज काढून टाकण्याची व्यवस्था केलेली असते.

८ श्रद्धा. भक्ति, दया, क्षमा, न्याय, सत्य, सरलता, वात्सल्य, उदारभाव यांविषयीं मुलांना नेहमीं उत्साहित ठेवून राग, द्वेष, मिथ्याभाषण, लोभ, मद, मात्सर्य, खळता, कापट्य, भीरुता, निष्ठुरता, अश्लीलता वगैरे सर्व दोषांपासून त्या मुलांना दूर ठेविलेलें असतें. एखाद्या मुलाकडून अनुचित आचरण झाल्यास त्याच्या इतर सोबत्यांसमक्ष त्या अपराधाचें स्वरूप दाखवून. त्याला लाज वाटे असें करितात. किंवा गुरुजी न्यायाधीश होऊन त्यांतीलच कित्येक मुलांस पंच नेमतात व त्या अपराधाची चौकशी करितात. असें झालें ह्मणजे त्या अपराधी मुलाला अत्यंत लाज वाटून तो त्या दुर्गुणांपासून लांब राहतो आणि इतर मुलेंही अधर्माचरणानें न वागण्याविषयीं दक्षता ठेवितात. आणि न्याय, सत्य व दया यांचें बीज त्या मुलांच्या मनांत अंकुरीत होतें.

९ भुताखेताची भीति आणि असेच दुसरे भ्रामक कुसंस्कार जनमंडलांत व्यापून राहिलेले दिसतात. एतदर्थ ते सारे भ्रमांकुर बालकांच्या विमल अंतःकरणांत शिरूं नयेत ह्मणून त्यांना वारंवार उपदेश करीत राहणें व बोलतां चालतां या गोष्टीचा अनादर व उपहास करून तिचा मुलांच्या मनांत शिरकाव न होईल अशी दक्षता ठेवणें जरूरीचें आहे असा त्यांचा समज आहे.

१० मुलांची शारीरिक शक्ति वाढेल व धर्मप्रवृत्ति कशी वृद्धि पावेल याविषयीं काय काय व्यवस्था केलेली असते हें वर सांगण्यांत आलें आहे. त्याप्रमाणेंच मुलांची मानसिक शक्तिही वाढेल अशी व्यवस्था ठेविलेली असते. मुलांचीं डोळे कान वगैरे ज्ञानेंद्रियें आरंभीं सतेज आणि कर्मशील असतात. यासाठीं नाना प्रकारचे सृष्टपदार्थ व कलाकुसरीच्या वस्तु एकत्र करून त्याविषयीं माहिती देण्याची व्यवस्था केल्यानें अल्प काळांत मुलांचीं ज्ञानेंद्रियें ज्ञानार्जनाला योग्य अशीं होतात. आरंभींच मुलांना अक्षरें आणि शब्द शिकविण्यापेक्षां आसपासच्या वस्तूंचें ज्ञान करून देणें फायदेशीर आहे; हें बहुमतानें सिद्ध झालें आहे. मुलें मूलाक्षरें आणि शब्द शिकण्याला इतकीं अनुरक्त नसतात; परंतु झाड, वेल, फळ, फूल, मूळ, पशु, पक्षी, पतंग, तसेंच मृत्तिका, पाषाण, धातु वगैरेंच्या मूर्ति पाहण्यास व त्यांविषयीं माहिती ऐकण्यास आग्रह आणि फारच उत्सुकता दर्शवितात; यासाठीं अशा शाळेंत नाना प्रकारच्या सजीव, निर्जीव आणि दुर्लभ पदार्थांच्या प्रतिकृति व चित्रें एकत्र करून ठेवलेलीं असतात. मुलांना आरंभींच "श्री ग" घालून देऊन नीरस

कंटाळवाणी वाटणारी घोकंपट्टी सुरू करण्यापेक्षां आसपासच्या वस्तूंचा आकार, रंग, प्रकार, गुणदोष वगैरेविषयीं सुबोध माहिती सांगितल्यास त्यांचीं मनें प्रसन्न राहून ज्ञानार्जनाला योग्य अशीं थोडक्या मुदतींत होतात. व हें थोडक्या वेळांत मिळविलेलें ज्ञान तारुण्यांत मोठमोठ्या विषयांचें विवेचन करण्यास फार उपयोगी पडतें. मुलांना रोज नवीन शिकण्याची हौस असते, ती कायम राहण्याकरितां रोजच्या रोज कांहींना कांहीं तरी नवा विषय शिकविण्याची व्यवस्था केलेली असते. परंतु रोज एक तासापेक्षां जास्त शिकवीत नाहींत. नाना प्रकारच्या वस्तूंचे गुणदोष, विविध पशुपक्ष्यांविषयीं माहिती, देश, शहरें, नद्या, वगैरेंचीं नांवें, थोडींशीं गणितविषयक मूळतत्वें. रेखागणितसंबंधीं आकृति व धर्मनीतिविषयक लहान लहान उपदेशपर निबंध असे विषय त्या बालविद्यालयांत शिकवीत असतात.

अशा बालविद्यालयांत शिक्षकाचें काम करणें हें मोठें कठीण आहे. त्याच्या अंगीं पुष्कळ अलौकिक गुण असावे लागतात. ज्यानें आपण स्वतः विविधप्रकारचें उत्तम शिक्षण मिळविलें आहे, त्याच्या हातूनच अनभिज्ञ बालकांना शिकविण्याचें काम होईल. जो शांत. सहृदय, क्षमावान, धैर्यवान, मधुरभाषी. दृष्टांतःकरण आणि खुशमिजासी असेल; जो मुलांना आईप्रमाणें ममता दाखवील; भ वाप्रमाणें सद्भाव दाखवून स्नेहास्पद व श्रद्धाभाजन होऊं शकेल; आणि जो शिकवीत असतां मुलांचीं मनें एकाग्रतेनें आपणाकडे आकर्षण करून त्या मुलांच्या मनोवृत्ति सुमार्गाकडे

लावण्याचे उत्तम उपाय जाणत असेल, तोच या विद्यालयांत शिक्षक होण्याला पात्र होतो. असे शिक्षक तयार करण्याकरितां एक पाठशाला असते. त्या शाळेंत जे पास होतील, त्यांसच या विद्यालयांत जागा मिळते.

या बालविद्यालयांत ६।७ वर्षे वयापर्यंत राहून नंतर त्या मुलांस दुसऱ्या शाळेंत पाठवितात व तींत १४।१५ वर्षांच्या वयापर्यंत ठेवून पहिल्यापेक्षां जास्त कठीण विषय शिकवितात ज्ञानाची उन्नति आणि ज्ञानार्जनाविषयींची भक्ति उत्पन्न करणें या दोन गोष्टी शिक्षणालयाच्या बंदोबस्तावर अवलंबून आहेत. यासाठीं, बालविद्यालयाप्रमाणेंच या शाळेची व्यवस्थाही गंभीर व स्वच्छ ठेवावी लागते. शालागृह व सभोंवारची जागा हीं उत्तम असलीं ह्मणजे मुलांचें मनोरंजन होऊन ज्ञानार्जनही चांगलें होतें. शालागृहाच्या सभोंवार विविध वनस्पतींनीं युक्त अशी व्यवस्थित बाग करणें जरूर आहे. तीपासून मुलांना वनस्पतिशास्त्र शिकण्याला मदत होते. त्या बागेंतील रस्ते व्यवस्थेशीर केलेले असावे व जागोजाग त्यांत आसनें केलेलीं असावींत. ह्मणजे त्या आसनावर ठिकठिकाणीं विद्यार्थी बसून अनेकविध विषयांवर त्यांचे संभाषणप्रसंग घडतात. त्यामुळें त्यांचें मनोरंजन होऊन सहजीं पुष्कळ गोष्टींचें शिक्षण मिळतें. अशा सुरम्य ठिकाणीं विद्यार्थ्यांना सुशिक्षित शिक्षकाकडून नियमाप्रमाणें जर शिक्षण मिळत गेलें, तर त्या विद्यार्थ्यांच्या मनांत त्या शाळेविषयीं व त्यांत मिळणाऱ्या शिक्षणाविषयीं चिरकालिक पूज्य बुद्धि उत्पन्न होईल व त्यांना धन्यता वाटेल. इतकेंच

नव्हे; तर अशा तऱ्हेचें शालागृह ज्ञानार्जनाला व विद्यार्थि सुवृत्त होण्याला अत्यंत उपयोगी होणार आहे. तसेंच अशा विद्यालयांत साक्रेटीस, बेकन, न्यूटन, फ्रांक्लिन, पास्कोल, वाशिंगटन, मेन्सीनी, शिवाजी, आर्यभट्ट, भास्कराचार्य, राजमोहनराय, केशवचंद्रसेन, दादाभाईनवरोजी, महर्षि देवेंद्रनाथ टागोर, तुकाराम, नानक, ईश्वरचंद्र विद्यासागर, इत्यादि जगद्विख्यात महात्म्यांच्या त्यांत विशेषतः ज्यांनीं प्रथम वयांतच ज्ञानानुशीलन आणि धर्मानुष्ठान यांत सुयश मिळविलें आहे अशांच्या प्रतिमूर्ति ठिक ठिकाणीं ठेवण्यांत आल्या व ठिक ठिकाणीं लांकडाच्या फळ्यांवर परमार्थघटित व सुनीतिसूचक नीतिसिद्धांत तसेंच पदार्थविद्यादि विज्ञानशास्त्रासंबंधीं ठळक तत्वें मोठ्या अक्षरांनीं लिहिलेलीं असलीं तर तीं पाहून विद्यार्थ्यांना चांगलें स्मरण राहील आणि त्यांतही शिक्षक जर वारंवार त्यांविषयीं विवरण करून मुलांच्या मनावर त्या गोष्टींचा चांगला संस्कार व्हावा अशी खटपट करतील, तर फारच चांगलें होणार आहे.

निरनिराळे विषय मुलांना समजून देत असतां ज्या ज्या वस्तूंची जरूर असेल, त्या त्या वस्तूंचा संग्रह करून ठेवणें जरूर आहे. सृष्टिशास्त्रासंबंधीं अनेक विषय प्रत्यक्ष परीक्षा करून शिकविण्यासाठीं दुर्बीण, सुक्ष्मदर्शकयंत्र, उष्णतामापक, वायुभारमापक, होकायंत्र वगैरे विविध यंत्रसंग्रह व वाप्पयंत्र, पवनचक्की, पाणचक्की यांच्या लहान प्रतिकृति तयार ठेवल्या पाहिजेत प्राकृतिक इतिहास शिकविण्यासाठीं सजीव अथवा निर्जीव पशु-

पक्षी. कीटपंतगादि जंतु, नानाप्रकारच्या वृक्षलतादि वनस्पति आणि सोनें, रुपें, तांबें, पारा, लोखंड, शिसें, कथील इत्यादि खनीज वस्तूंचा संग्रह करून ठेविला पाहिजे. ज्या वस्तु मिळणें दुर्लभ असतील त्यांचीं चित्रें काढून ठेवलेलीं असावींत.

बालकांस ईश्वरनिर्मित आणि कारागिरांच्या वस्तूंविषयीं शिक्षण देण्याकरितां त्यांचीं सुंदर अशीं चित्रमय प्रतिरूपें संग्रह करून तेथें ठेवावींत. नदी, पर्वत, समुद्र, सरोवर, गुहा, ज्वालामुखी, पाण्याचे धबधबे, ऊन पाण्याचे झरे, समुद्रावरील बर्फ, बर्फाच्छादित जमिनी, झाडें, गांव, नगरें, उपनगरें, सुप्रसिद्ध कीर्तिस्तंभ, मोठमोठे कारखाने इ. इ. शिक्षणोपयोगी नमुने व अनेक देशांतील सृष्टिजन्य उत्तमोत्तम देखावे काढून ते त्या पाठशाळेंत सर्वत्र टांगून ठेवलेले असावेत. ह्मणजे विद्यार्थ्यांची त्यांवर वारंवार नजर जाऊन त्यांना चांगलें स्मरण राहील. आणि वारंवार ते देखावे स्मरणांत येऊन त्यांना आनंद होईल. तसेंच एक कांचेचें यंत्र असतें; त्यांतून चित्रांकडे पाहिलें असतां तीं सजीव आहेत असा भास होतो. त्या यंत्रानेंही मुलांस ते देखावे व चित्रें दाखवीत गेल्यास विद्यार्थिमंडल साक्षात् दर्शनभावानें अपर्याप्त ज्ञानामृतरस आणि आनंदसुधा यांचें पान संतोषानें करूं लागेल.

सध्यां जर्मनी आणि अमेरिका या देशांत विद्येचा प्रसार फारच झाला आहे. खेड्यांपाड्यांतीलसुद्धां सर्व साधारण लोक विद्यामृत सेवनाला समर्थ झाले आहेत. त्यामुळें शिक्षणाध्यापनाच्या पद्धतिविषयीं फार खबरदारी घेतली जाते. प्रशिया देशांतील प्राथमिक शिक्षणालयांत-

ही परमार्थ आणि धर्मनीति, रेखागणित आणि अंकगणित, पदार्थविद्या आणि रसायणविद्या, इतिहास, भूगोल, चित्रविद्या, हस्तलिपी, संगीत, थोडथोडी कारागिरी आणि कसरत इत्यादि विषयांचें शिक्षण मिळतें. एका विद्यानुरागी सुपंडितानें जर्मनींतील कित्येक विद्यालयांतील शिक्षणाध्यापन पद्धतीविषयीं जार्जकुंव नांवाच्या एका विद्वानाला पत्र लिहिलें होतें त्यांत पुष्कळ गोष्टींचें वर्णन आहे. त्यांतील थोडेसें तुला सांगतों.

येथील विद्यार्थि शिक्षकाला भीतिदायक न समजतां मित्रासारखा मानतात. तो शिक्षक त्या विद्यार्थ्यांना बहुतकरून प्रत्येक आठवड्यास जवळपासच्या कारखान्यांत घेऊन जातो व त्या कारखान्याचे सर्व भाग दाखवून कोणत्या शक्तीनें कोणतें कार्य होतें वगैरेबद्दल खुलासेवार माहिती सांगतो. ते कागद करण्याच्या कारखान्यांत गेले, तर चिंध्या साफ कशा करितात, त्या कुटून त्यांचा कागद कसा होतो, त्यांत आणखी कोणकोणते पदार्थ कशा प्रमाणानें मिसळतात, त्या लगद्यापासून कागद कशा रीतीनें सुकवितात, नंतर त्यांच्या घड्या घालून प्रती कशा लावितात वगैरे त्या कारखान्यांतील एकंदर गोष्टी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दाखवून त्या कारखान्याचें व त्यांत उत्पन्न होणाऱ्या वस्तूंचें सविस्तर वर्णन लिहून आणण्याविषयीं शिक्षक त्यांस धडा नेमून देतो.

उन्हाळ्याच्या दिवसांत आपले विद्यार्थी बरोबर घेऊन ते शिक्षक दोन तीन आठवड्यांच्या प्रवासास जात असतात. जातां जातां वाटेंत जें जें कांहीं कौतूहलजनक असेल, तें तें विद्यार्थ्यांस दाखवितात. ते जाऊं लागले

ह्मणजे रस्त्याच्या आसपास जे कारखाने, पुरातन शहरें, किल्ले वगैरे असतील, आणि जी जी अवलोकनीय वस्तु असेल, ती ती त्यांस दाखवितात. व जातांना धातु, वनस्पति, पतंग वगैरे चमत्कारिक सृष्टिजन्य पदार्थ आढळतील त्यांचा संग्रह करीत जातात. या त्यांच्या करण्यानें विद्यार्थ्यांना सृष्टीचें सूक्ष्म रीतीनें अवलोकन करण्याची संवय लागते, वाटेंत एखादी खाण लागली तर तो पहाडी प्रदेश चढून जाऊन व त्या खाणींत उतरून त्यांत काम कसें करितात, त्यांत वायु व प्रकाश यांचा पुरवठा कसा करण्यांत येतो, आंतील पदार्थ बाहेर कसे काढितात, बाहेर काढल्यावर ते कोणत्या रीतीनें शुद्ध करितात, शुद्ध झाल्यावर त्यांचा कोणकोणत्या कामाकडे कसा विनियोग करण्यांत येतो वगैरे गोष्टींचें प्रत्यक्ष ज्ञान करून देत असतात.

विद्यार्थ्यांस हे सर्व विषय अवगत झाले ह्मणजे त्यांस एखाद्या लोखंडी कामाच्या कारखान्यांत नेतात. तेथें त्यांस पुष्कळ गोष्टींचें ज्ञान होतें. अग्निस्थानें, नाना प्रकारच्या भट्ट्या, लोखंड गाळण्याची पद्धति वगैरे गोष्टी त्यांस दाखविण्यांत येतात. खरोखर ती वेळ उत्तम शिक्षणाचीच समजावयाची. दुसऱ्या एखाद्या वेळीं पाठशाळेचे शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांस पक्कान्नें तयार करण्याच्या कारखान्यांत, कांचेच्या कारखान्यांत अथवा चिनई भांडीं अगर तशाच तऱ्हेच्या दुसऱ्या रसायनावलंबी वस्तु तयार करण्याच्या कारखान्यांत घेऊन जातात. जवळपास एखादा खनिजद्रव्यमिश्रित पाण्याचा झरा असला, तर तेथें विद्यार्थ्यांसह जाऊन त्या पाण्याच्या स्वभावाविषयीं

विद्यार्थीस बोध करितात. सारांश, विद्यार्थ्यांची ज्ञानोन्नति होण्यास जे जे सोपे मार्ग असतील, त्यांचें तावडतोब अवलंबन करण्यास ते बिलकुल आळस करीत नाहींत.

अशा रीतीनें प्रवास करण्यापासून विद्यार्थ्यांच्या मनाची उन्नति होते इतकेंच नव्हे, तर त्यांचें शरीरदेखील मजबूत होतें. ते थकूं नयेत व त्यांच्या मनाला त्रास वाटूं नये ह्मणून घाईनें प्रवास न करितां रोज थोडथोडा करण्यांत येतो.

हा प्रवास पुरा होऊन विद्यालयांत विद्यार्थि परत आल्यावर प्रत्येकाला त्या प्रवासाचें वर्णन लिहावें लागतें. ज्या प्रदेशांत प्रवास झाला असेल, तो प्रदेश कसा आहे, कोणकोणत्या वस्तु त्यांत उत्पन्न होतात. खनिज वस्तु कोणत्या मिळतात, कारागिरीच्या कोणत्या वस्तूंची समृद्धि आहे, सृष्टिचमत्कार कोणते आहेत वगैरे विषय लिहून आणिल्यावर शिक्षक ते तपासून पाहतात व त्यांत ज्या सुधारणा करावयाच्या असतील त्या विद्यार्थ्यांस समजून देतात. प्रवासांत ज्या वस्तूंचा संग्रह केला असतो, त्या वस्तु विद्यालयांत शिक्षणाच्या कामीं लावितात. हे विद्यार्थि भूगोल, ज्योतिष, रेखागणित, धर्मपुस्तक आणि फ्रेंच भाषा वगैरे अनेक विषय शिकतात. ज्योतिषशास्त्रांत केवळ चंद्राचें दूरत्व, पृथ्वीचें महत्व व गति इत्यादि ठोकळ विषय शिकूनच राहत नाहींत तर त्यांत ज्या बारिकसारिक गोष्टी असतील, त्यांचेंही साक्षात् ज्ञान करून घेतात. रेखागणित शिकविण्याकरितां लांकडाच्या निरनिराळ्या आकृति तयार केलेल्या असतात; त्यांवरून रेखागणिताचें चांगलें ज्ञान होतें. ज्या विद्या-

र्थ्यांस लाटीन भाषा शिकण्याची हौस असेल, त्यांस ती शिकवितात. कसरत शिकविण्याचीही तेथेंच तयारी असून ती शिकण्याबद्दल विद्यार्थ्यांस वारंवार प्रोत्साहन देण्यांत येतें. सारांश, त्यांच्या शिक्षणाच्या व्यवस्थेची आणि तयारीची जितकी तारीफ करावी तितकी थोडीच होईल.

**सुंदरी,** आपणासारख्या गरिबांच्या घरीं अशी आशानुरूप सिद्धता होणें कठीण आहे. माझ्या मलाच किती तरी न्यूनता दिसते आणि ती नाहींशी करण्यासाठीं ही मी पुष्कळ यत्न करीत असतों. तुलाही ज्या न्यूनता दिसतील, त्या मला सांगत जा; ह्मणजे त्याही नाहींशा करण्याची यथाशक्ति खटपट करूं. आणि ज्या गोष्टी तुला सांगाव्यात असें वाटेल, त्या तुला मी सांगत जाईन.

सुंदरी—आपल्या घरीं तो फोटोग्राफांचा आलबम आहे कीं नाहीं तो उघडून केव्हां केव्हां मी आपल्या चंद्राला दाखवीत असतें. त्याला मी हात लावायला गेलें ह्मणजे तो इतकी घाई करितो कीं, ती मला वर्णन करितां येत नाहीं. आलबम उघडून तो आपली तसवीर दाखवायला मला सांगतो. ती काढल्यावर ह्मणतो "आई, हा बघ मी" तुमची तसवीर काढली ह्मणजे ती ओळखून नांव घेऊन सांगतो. आणि माझी तसवीर दाखविली ह्मणजे "आई, ही तूं ना ग?" ह्मणून विचारूं लागतो. ह्यावरून निर्विवाद सिद्ध होतें कीं, दोन वर्षांचें मूल आमची आणि आपली तसवीर ओळखण्यास समर्थ आहे. त्याचं आलबममध्यें ज्या दुसऱ्या प्रसिद्ध पुरुषांच्या तसबिरा आहेत--त्यांस त्यानें कधीं पाहिलेंदेखील नसेल—त्या त्यास दाखवून त्यांचीं

नांवें एक दोन वेळ सांगितलीं ह्मणजे पुरे. तीं तो सहज ओळखितो. यावरून स्पष्ट दिसतें कीं. त्याला नवें शिकण्याची व तें स्मरणांत ठेवण्याची शक्ति आली आहे. यावरून मला असें वाटतें कीं, कांहीं उपाय केला तर याची जिज्ञासा व कौतुक यांची वृद्धि एव्हांपासून होईल.

सुबोध०—विलायतेंत मुलांनीं अक्षर लवकर ओळखावीं ह्मणून शिकविण्याचे नाना प्रकारचे सोपे उपाय योजिले आहेत. समज कीं. एक मोठें असें A अक्षर लिहून त्याच्याखालीं एक गाढवाचें चित्र काढलेलें असतें व त्याखालीं ASS=अॅस असें लिहिलेलें असतें. पुढें B असें अक्षर लिहून त्याखालीं एक माशीचें चित्र काढलेलें असतें व त्याखालीं BEE=बी असें लिहितात. अशा तऱ्हेचें पुस्तक हातीं दिलें ह्मणजे मुलें मोठ्या हौसेनें तीं चित्रें पाहत असतात व त्याबरोबरच त्यांस अक्षरांचीही ओळख होते.

सुंदरी—आपल्या येथेंही अशीं दोन तीन पुस्तकें आहेत. एकाचें नांव "चित्रबोध अ० मुलांचें प्रथम प्रिय पुस्तक" व दुसऱ्याचें नांव "सचित्राक्षर बोध." चित्रबोधांत आरंभीं एक मोठा अ काढून त्याखालीं अजगराचें चित्र काढलेलें आहे. परंतु तीं त्यांतील चित्रें हुबेहुब नाहींत. तीं जर तशीं असतीं, तर त्या पुस्तकांपासून फार लाभ होता. अशा पुस्तकांवरून मुलांचें मनोरंजन व अक्षरओळख असे दोन प्रकारचे फायदे आहेत. मी आपल्या चंद्रालाही कव्हां कव्हां त्या

पुस्तकांतील चित्रें दाखवीत असतें. व नुकताच तो थोडींशीं अक्षरेंही ओळखायला लागला आहे.

सुबोध०—या ठिकाणीं लक्ष्यांत ठेवण्यासारखी एक गोष्ट तुला सांगतों. चमत्कारिक वस्तूंच्या दर्शनानें लहान मुलांना शिक्षण दिल्यास त्या मुलांचें मन त्या शिक्षणाकडे एकाग्रतेनें लागून ते विषय त्यांच्या स्मरणांत पक्के राहतात. व त्यांच्या स्मरणशक्तीला परिपक्कता येत जाते. परंतु, शिक्षण देतांना मुलांच्या एकाच मानसिक शक्तीवर जोर देतां नये. कारण, एकच स्मरणशक्ति जर वाढत गेली, तर त्या शक्तीच्या सहगामी अशा कल्पनाशक्ति, विचारशक्ति वगैरे मागें राहतात आणि मनाच्या सर्व भागांची समता राहत नाहीं. जर नुस्ती मानसिक शक्ति वाढवित गेलें, तर शारीरिक स्थिति बिघडण्याचा संभव आहे. याकरितां शारीरिक स्थिति व मानसिक शक्ति या दोहोंचा सारख्या प्रमाणानें विकास होईल अशी शिक्षणाची व्यवस्था ठेविली पाहिजे. *

सुंदरी—मुलांची सर्व प्रकारें उन्नति करणें मोठें कठीण काम आहे. मुलांच्या आरंभींच्या कृत्यांपासून त्यांची स्मरणशक्तीच आरंभीं विकास पावते आणि हळूहळू तिच्यामागून ज्ञानशक्ति आणि विचारशक्ति यांचा विकास होत असतो यांत वावगें काय आहे ?

सुबोध०—मुलांच्या सर्व मनःशक्ति एकदम अंकुरित झालेल्या असतात. त्यांत जिला बाहेरून मदत मिळते, ती आरंभींच विकास पावून लोकांच्या नजरेस पडते. याकरिता

---

* बेन्स कृत एज्युकेशन यज्ञ आ सायन्स पृ० १२१.

सर्व शक्तींचा सारख्या प्रमाणानें हळूहळू विकास होत जावा अशी व्यवस्था ठेविली पाहिजे. आतां स्मरणशक्तीला आरंभीं स्वाभाविकच मदत मिळत असल्यामुळें ती आरंभींच वृद्धि पावते. पण इतर शक्तिही अगदींच वाढत नाहींत असें नाहीं. तूं आपल्या दोन वर्षांच्या मुलाला विचार कीं, आह्मां दोघांतून तुला कोण जास्त आवडतें? तर तो तुझेंच नांव घेईल. यावरून त्याला विचारशक्ति उत्पन्न झाली आहे असें समजलें पाहिजे.

सुंदरी—मुलांची स्मरणशक्ति कशी वाढवावी याबद्दल थोडेंसें माझ्या लक्ष्यांत आलें. पण, सर्वशक्तींचा एकदम विकास व्हावा ह्मणून कशी व्यवस्था ठेविली पाहिजे?

सुबोध०—मुलांस ज्ञानाची सूचना कशी होते याबद्दल तुला बरेंच सांगितलें आहे. आतां तें ज्ञान कोणत्या उपायानें सहज वाढेल त्याबद्दल थोडेंसें सांगतों. समज कीं, आपला मुलगा हात, पाय, डोळे, नाक, कान वगैरे अवयवांचीं नांवें समजतो. त्याला "तुझे केंस कुठें आहेत" ह्मणून विचारिलें, तर तो डोकीस हात लावून दाखवितो. तसेंच आई, बाप, आजी वगैरे घरांतील मनुष्यांस तो ओळखितो. आईबद्दल बाबा असा शब्द त्याच्या तोंडांतून आल्यास त्याची त्याला लाज वाटते. हें सर्व ज्ञानामुळें होतें. हें ज्ञान घरांतील सामान्य व्यवहारांतच गुरफटून ठेवणें, विचारवंताचें काम नव्हे?

सुंदरी—मुलांच्या ज्ञानाची वृद्धि होण्याला आणखी कांहीं उपाय असल्यास सांगावे.

**सुबोध०**—उद्यां मला रजा आहे. तेव्हां तूं आणि मी आपल्या **निर्मळचंद्रास** घेऊन राणीच्या बागेंतील संग्रहस्थान आणि पशुसंग्रहालय पहावयास जाऊं ह्मणजे **निर्मळचंद्राचें** आजचें ज्ञान उद्यां किती वाढलें हें तुला सहज समजणार आहे. व मुलांचें ज्ञान वाढविण्याचे उपाय कोणते हें ही तुझ्या लक्ष्यांत येईल.

---

# प्रकरण नववें.

दुसरे दिवशीं जेवणखाण आटोपल्यावर **सुबोधचंद्र,** आपली बायको व मुलगा यांस बरोबर घेऊन राणीच्या बागेंत गेला. तेथें जातांना एके ठिकाणीं कित्येक वानर दृष्टीस पडले. तेव्हां **निर्मळचंद्र** आतुरतेनें आईबापांस मागें टाकून पुढें दुडदुड धांवत गेला आणि उत्साहपूर्ण अशा बोबड्या शब्दांनीं आईबापांस हांक मारून सांगूं लागला, " बघा ! ही काय मौज ! किती तरी हे वानर !!! " त्या आनंदाच्या भरांत तो केव्हां आईचा ओंचा धरून ओढी व केव्हां बापाच्या कोटास धरून ओढी. तो आपल्या मनांत विचार करी कीं, इतके वानर एक ठिकाणीं मीं कधींही पाहिले नाहींत. त्याप्रमाणेंच आईबापांनींही पाहिले नसतील. मुलांना असें वाटत असतें कीं, आपल्याला ज्या गोष्टी नव्या वाटतात, त्या इतरांसही नव्याच असतील. तेथें एक वानराचें पोर आईच्या पोटास चिकटून निजलें होतें. व ती त्या पोरासहित इकडे तिकडे धांवत होती. पण, तें पोर पडत नव्हतें हें पाहून **निर्मळचंद्र** आपल्या आईला ह्मणाला—

" आई, तें पाहिलेंस का ? पोर कसें आईच्या पोटास चिकटून राहिलें आहे. ."

अशा रीतीनें **सुबोधचंद्र** व **सुंदरी** यांनीं बागेंत फिरून सिंह, वाघ, अस्वल, हरीण, नीलगाय, रानमाणसें, इ. वन्यग्रामपशु **निर्मलचंद्राला** दाखविले. **सुंदरीनें** ती बाग पूर्वीं पाहिली होती; त्यामुळें तिला कांहीं विशेष आश्चर्य वाटलें नाहीं. जर आरंभीं ती पाहिलेली नसती, तर तिलाही आनंद झाला असता; यांत संशय नाहीं. परंतु **सुबोधचंद्र** आणि **सुंदरी** यांस त्यापेक्षांही विशेष आनंदाची गोष्ट ही होती कीं, **निर्मळचंद्र** प्रत्येक पशूचें नांव, तो काय करतो, काय खातो वगैरे प्रश्न विचारून आपल्या बुद्धिप्रमाणें माहिती मिळवीत होता. प्रत्येक नवीन जनावरें पाहतांच त्याचा आनंद त्याच्या पोटांत मावेनासा होई. तो आतुर होऊन "बाबा, हें काय ? आई तें कोण ? " असे अनेक प्रश्न विचारीत असे. अशा रीतीनें सर्व बगीचा फिरून झाल्यावर तीं पदार्थसंग्रहालयांत गेलीं. तेथील रचना पाहून **निर्मळचंद्राला** फारच आश्चर्य वाटलें व नानाविध वस्तु पाहून त्यांविषयीं तो आईबापांना एकसारखे प्रश्न करूं लागला. सर्व बाग पाहून झाल्यावर गाडींत बसून तीं परत घराकडे निघालीं. चालतां चालतां निर्मळचंद्र गाडींतच झोंपी गेला. सुंदरी सुबोधचंद्राला ह्मणाली. "या खेपेला मी एक नवें जनावर पाहिलें. मागें जेव्हां मी बाग पाहायला आलें होतें, त्या वेळीं या बागेंत गेंडा नव्हता; तो आज पाहिला. आणि दोनतीन रानमाणसेंही नव्यानेंच पहायला सांपडलीं.

सुबोध०—केव्हां केव्हां टाऊनहाल, विक्टोरिया-

गार्डन, सर जमशेटजी जिजीभाई हास्पिटल, मेडिकल-कॉलेजचें संग्रहालय, प्रिन्सेस डॉक अशा स्थळीं फिरावयास गेल्यानें पुष्कळ नव्या व चमत्कारिक वस्तु पहावयास सांपडतात. व त्यामुळें सृष्ट गोष्टींचें व ऐतिहासिक गोष्टींचें ज्ञान मिळतें.

सुंदरी—आपण सांगितलें तें ठीक आहे. अशा फिरण्यानें लाभ होईल. पण, अशा फिरण्याला खर्च करणें हें सोपें नव्हे. आपल्यासारख्या गरीबांना नेहमीं असें फिरणें कधींही शोभणार नाहीं. मी त्यामुळेंच विचार करीत आहें कीं, जे असे गरीब असतील त्यांनीं काय करावें?

सुबोध०—आपल्यासारख्या किंवा विशेषत: आमच्याहूनही गरीब लोकांकरितां अल्पमोली अशा जीवजंतूंच्या हुबेहुब तसबिरी त्यांच्या संक्षिप्त वर्णनासह विकत मिळतात; त्या घेऊन गरिबांनीं आपापल्या घरीं बसून पहाव्या, वाचाव्या व आपापल्या मुलांबाळांसही त्यांची माहिती करून द्यावी. विलायतेंत बालशिक्षणाकरितां अशा तसबिराच बनवून राहात नाहींत. दुसरे नानातऱ्हेचे त्यांनीं उपाय योजिले आहेत. मुलांचीं खेळणीं, खाण्याचे पदार्थ हींसुद्धां वर्णमालेंतील प्रत्येक वर्णाच्या आकाराचीं तशींच गणितसंबंधीं आकृतीसारखीं केलेलीं असतात; त्यामुळें मुलांना सहज अक्षरओळख होऊन गणिताचेंही अल्प ज्ञान होतें.

सुंदरी—तें कसें तें मला सांगा.

सुबोध०—इंग्रजी वर्ण शिकविण्याकरितां पत्ते किंवा गंजिफा यांच्यासारखीं पानें करून त्या प्रत्येकावर

एकेक वर्ण लिहिलेला असतो. अशीं कित्येक पानें घेऊन तीं मुलांच्या पुढें टाकावीं आणि त्यास ए, डी, एन्, पी, एक्स हे वर्ण शोधून काढ ह्मणून सांगावें. ह्मणजे मुलें मोठ्या हौसेनें त्या कामास लागतात आणि काम बिनचुक झालें ह्मणजे त्यांस मोठा आनंद होतो. अशाच प्रकारें पेपरमिठाच्या वड्या, बिसकीट वगैरे खाण्याच्या पदार्थांवर एक सुरेख चित्र देऊन एकेक अक्षर असतें. ते पदार्थ मुलांना खायला देऊन विचारावें ह्मणजे उत्तर मिळतें "एक घोडावाली ए; दुसरी घड्याळवाली डी मी खाल्ली." या त्यांच्या करण्यानें एकदम दोन गोष्टी साधतात.

सुंदरी—ही तर शिक्षणाची मोठ्या मौजेची तऱ्हा आहे. मुलांना शिकवायला असा सुंदर उपाय आहे हें मला ठाऊक नव्हतें. आपल्या देशांत जर असें कांहीं साधन असेल, तर केवढा फायदा होईल? आई स्वतःच घरच्याघरीं गांवठी शाळेंतलें अर्धें शिक्षण देईल.

अशा रीतीनें बोलतां बोलतां तीं आपल्या घरीं येऊन पोंचलीं. निर्मळचंद्राची झोंप जाऊन तो जागा झाला. आणि उठून पाहतो तों तो घरीं येऊन पोंहचला होता व संध्याकाळही झाला होता. रामचंद्र वगैरे सुबोधचंद्राचे कित्येक मित्र त्याच्या घरीं आले होते. त्यांना पाहून निर्मळचंद्रानें आपल्या नव्या ज्ञानसंग्रहाचा दरवाजा उघडला. रामचंद्राला पाहतांच निर्मळचंद्र नाचत नाचत त्याच्याजवळ जाऊन सांगूं लागला "मी आज पुष्कळ वानर पाहिले. एक वानराचें पोर आपल्या आईच्या पोटावर निजलें होतें. तें कांहीं

केल्या खालीं उतरत नव्हतें. मीही आईच्या कडेवरून उतरणार नाहीं. एक वाघ, दोन वाघ, तीन वाघ, ते फाडून खातील ह्मणून मी जवळ गेलों नाहीं. सिंह आहे तोदेखील ओरबडतो, तो माणसाला खाऊन टाकतो.

रामचंद्र—आणखी तूं काय पाहिलेंस?

निर्मळचंद्र—दुसरें काय? साप पाहिला. तो कसा अंगदीं फणकारत होता. त्याच्याजवळ कोणी जात नव्हतें. मला चावायला आला होता, पण मी भ्यालों नाहीं.

रामचंद्र—बरें, आणखी काय?

निर्मळचंद्रानें ओंठावर बोट ठेवून सांगितलें—मी किती तरी पाहिलें! पुष्कळ पांखरें त्या बागेंत आहेत. केवढे तरी मोठे मी पक्षी पाहिले—एक पक्षी होता त्याचें अंग फार मजेदार होतें. दुसरी एक मी गंमत पाहिली. एक पक्षी वर तोंड करून फिरत होता. वर तोंड करूनच तो खात होता. त्याला मान खालीं करतांच येत नव्हती. जगन्नाथ (एका मुलाचें नांव) आपल्या बापाबरोबर आला होता. (तो निर्मळचंद्राच्या जोडीचाच होता) तो माझ्या खांद्यावर हात ठेवून स्नेहानें मला वारंवार हाक मारून सांगूं लागला. "ते बघ, त्या घरांत किती तरी वानर ठेवलेले आहेत. ते बिछान्यावर निजतात." मीं त्यांना खायला दिलें तें त्यांनीं खाल्लें. ते मोठे गमतीनें नाचतात. मला तर ते फारच आवडले.

रामचंद्र—तुला ते फार आवडले तर त्यांना आपल्याबरोबर घरीं कां नाहीं आणिलेंस? त्यांचें नांव काय तें तुला माहित आहे?

निर्मळचंद्र—त्यांचें नांव वानर.

रामचंद्र—नाहीं, त्यांचें नाव वानर नव्हे.

निर्मळ०—तर त्यांचें नांव काय?

रामचद्र—त्यांना रानमाणसें ह्मणतात.

निर्मळ०—काय रानमांणसें! तीं काय करतात?

रामचंद्र—तीं रानांत राहतात, आणि रानांतील फळें खाऊन फिरत असतात.

निर्मळ०—काय तीं रानांत राहतात? छेः तीं तर बगीच्यांत आहेत. तुह्मांला ठाऊक नाहीं का? तीं त्या एका घरांत आहेत. मी त्यांस स्वतः पाहिलें.

रामचंद्र—रानांतून धरून आणून त्या घरांत त्यांना ठेविलें आहे.

निर्मळ०—धरून आणिलीं आहेत तर मीही त्यांना धरून आणीन; त्यांच्याजवळ बसेन; त्यांना खायला देईन; त्यांच्यावर ममता करीन.

रामचंद्र—तूं त्यांना धरायला गेलास तर तुला तीं ओरबडतील. तुझ्यानें त्यांना धरवणार नाहीं.

निर्मळचंद्र—मी त्यांना घट्ट धरून घरीं आणीन.

अशा तऱ्हेनें निर्मळकुमार आज स्वतः मिळविलेल्या नव्या ज्ञानाचें पुनरावर्तन बराच वेळपर्यंत करीत होता. सुंदरी एका बाजूस आपल्या मुलाचे स्वभावमधुर व अस्फुट असे बोल ऐकत होती. त्यानें ज्या ज्या वस्तु पाहिल्या होत्या, त्या त्या बहुतेक त्याच्या लक्षांत होत्या व त्या तो दुसऱ्यास सांगत होता. हें पाहून तिला आनंदाचें भरतें

आलें व आपल्या मुलानें आज पुष्कळ ज्ञान मिळविलें ह्मणून तिला फार समाधान वाटलें.

रात्रीचें कामकाज आटोपल्यावर, सुंदरी सुबोधचंद्रापाशीं येऊन ह्मणाली- " काल आपण जें सांगितलें, तें अगदीं खरें आहे. आज आपल्या निर्मळचंद्रानें कितीतरी ज्ञान मिळविलें आहे. "

सुबोध०—मुलांना अशा तऱ्हेनें शिकविणें फारच सोपें आहे. तूंच विचार करून पहा, आज निर्मळानें किती बरें नवी माहिती मिळविली ?

सुंदरी—त्यानें आज किती तरी नव प्राणी पाहिले !

सुबोध०—इतकेंच नव्हे त्याबरोबर दुसरी माहिती त्यानें कितीतरी मिळविली आहे आजपर्यंत त्याला फक्त प्राण्यांचीं नांवें मात्र माहीत होतीं. पण आज कोणतें जनावर रानांत राहतें, कोणतें जनावर जमिनीच्या ढोलींत राहतें, अशा तऱ्हेची कितीतरी माहिती त्यानें मिळविली आहे.

सुंदरी—बरोबर आहे; असाच आणखी ज्ञानार्जनाचा दुसरा उपाय असल्यास सांगावा.

सुबोध०—बरेच दिवसांपूर्वी एकदां आईनें सांगितलें होतें कीं, धर्मनीति, साधुता, स्नेह, ममता आणि प्रेम तशाच ऐतिहासिक व पौराणिक गोष्टी यांच्यायोगानें मुलांना सुशिक्षण देतां येईल. त्याप्रमाणेंच मुलांना निरनिराळ्या ठिकाणीं फिरविल्यानें वृक्ष, लता, पानें, फुलें, फळें यांचें ज्ञान त्यांस सहज होणार आहे. परंतु, एकदम या सर्व गोष्टींचें शिक्षण देण्याला मुलें जरा जाणतीं झालीं पाहिजेत.

सुंदरी—अद्याप आपण बुद्धि आणि विचारशक्ति वाढविण्याचे सोपे उपाय सांगितले नाहींत.

सुबोध०—बुद्धि आणि विचारशक्ति यांना निरनिराळें करणें कठीण आहे. त्यांत विशेषतः मुलांच्या संबंधानें असंभवनीय आहे. कारण, बुद्धि आणि विचारशक्ति या परस्परावलंबी आहेत. बुद्धिमान् मनुष्य सुविचारी स्वभावतःच असतात. तूं पुष्कळ वेळ पाहिलें असशील कीं, प्रेम आणि सौंदर्य ओळखण्याची शक्ति लहान मुलांच्या अंगीं आलेली असते. कोण आपल्यावर प्रीति करतें, कोण करीत नाहीं, कोणती वस्तु चांगली आहे, कोणती वाईट आहे हें मुलांना चांगलें समजत असतें. ज्या मनुष्याची त्यांच्यावर प्रीति असते, त्याला लांब पाहिल्याबरोबर त्याच्याकडे जाण्याला तें अतीशय आतूर होतें आणि हात पसरून हंसत हंसत जलदीनें त्याच्याकडे जाऊं लागतें. बरें, ज्याच्या प्रीतीची त्याला ओळख पटलेली नसते, त्याच्याकडे जाण्याची त्या मुलाला इच्छाही होत नाहीं; आणि कदाचित् त्यानें घेतलेंच तर त्याला आनंद झालेला दिसत नाहीं. एक सफेत फूल आणि एक तांबडें फूल, एक चकचकित रुपया आणि एक मळकट रुपया, एक मैना आणि एक चिमणी, एक झगझगीत पोषाख आणि एक साधा पोषाख असे जिन्नस जर त्याच्यापुढें ठेविले, तर त्यांत सुंदर असेल तोच पदार्थ तें उचलतें. यावरून मुलांच्या बुद्धीची परीक्षा होत असते. व त्याच वेळीं मुलांची बुद्धि व विचारशक्ति यांचा अंकुर दृष्टीस पडतो. अशा वेळींच मुलांच्या मानसिक वृत्तींची उन्नति करण्याचे

उपाय योजणें हें आईबापांचें कर्तव्य आहे. आणि तें कर्तव्य बजाविण्याला कोणता समय अनुकूल अथवा प्रतिकूल हें त्यांना ओळखितां आलें पाहिजे. *

सुंदरी—अशा तऱ्हेनें कर्तव्य बजाविणारीं आईबापें आपल्यामध्यें फारच कमी आहेत.

सुबोध०—मीं काल सकाळीं निर्मळचंद्राला घेऊन त्या शेजारच्या गोविंदरावांकडे गेलों होतों. तेव्हां तेथें एकजण गात होता. तें ऐकून निर्मळचंद्राला फार आनंद झाला असें दिसलें. गायन पुरें झाल्यावर त्या गाणाराला पुनः ह्मण असें त्यानें सांगितलें नाहीं, पण तो तबला आणि वीणा वाजवायला सांगूं लागला आणि ह्मणाला- "बाबा, हें मला फार आवडतें." यावरून स्पष्ट समजतें कीं, गाण्यापेक्षां त्या वाद्यांचे सूर त्याला फार आवडले. परवांच्या दिवशीं एक मिठाईविक्या मिठाई घेऊन आला होता. तेव्हां तुला जें आवडेल तें त्याच्याकडून घेऊन ये ह्मणून मीं सांगितलें. तेव्हां तो त्याच्याजवळ गेला आणि आपणास आवडणारे पदार्थ त्यानें घेतले. मी त्या मिठाईबद्दल पैसे देऊन त्या मिठाईविक्याला घालविल्यावर स्वतः पसंत करून घेतलेली मिठाई त्यानें मोठ्या आवडीनें खाल्ली. तसेंच पांचसहा दिवसांपूर्वी एकदां असेंच झालें. मीं त्या करंडींतले सहा आंबे स्वतः खाण्यासाठीं बाहेर काढले. त्यावेळीं त्यांतले दोन चांगले आंबे निर्मळानें आपण घेतले. तेव्हां मीं त्याला ह्मटलें :– "बाळे, हे चार आंबे तुला घे आणि तुझ्याजवळचे दोन आंबे मला दे." त्यानें उत्तर दिलें "बाबा,

---

* वेइन्सकृत शिशुशिक्षण पान १२

हे दोन आंबे फार चांगले आहेत; ते मी घेतों" अशा गोष्टींच्या प्रसंगानेंही अकलंबन मनुष्य मुलांना ज्ञान आणि बुद्धि यांच्या मार्गानें घेऊन जाईल. उद्यां तुला मुलांची बुद्धि आणि विचारशक्ति कशी वाढते हें दाखवीन.

---

## प्रकरण दहावें.

दुसरे दिवशीं सकाळीं सुबोधचंद्र दिवाणखान्यांत बसला असतां मुलाला हाक मारून त्याला सांगूं लागला कीं "बाळ, ती पलीकडच्या खोलींतली खुर्ची इकडे आण पाहूं" त्यानें लागलीच ती खुर्ची बापाजवळ आणून ठेविली. तेव्हां सुबोधचंद्रानें सुंदरीला बोलावून सांगितलें "आपल्या मुलाची मौज पाहिलीस का?" इतकें बोलून पुनः आपल्या मुलाला तेथलीच दुसरी एक मोठी खुर्ची आणायला सांगितलें. निर्मळ हुशारीनें गेला खरा; पण त्याला ती खुर्ची हालेना. तेव्हां तो बापाला ह्मणाला "बाबा, ही खुर्ची जड आहे; ती मला हालत नाहीं." तेव्हां सुबोधचंद्र ह्मणाला "बाळ, जर ती खुर्ची तूं आणिलीस, तर तुला एक फक्कड आंबा देईन." तेव्हां निर्मळकुमार पुनः उत्साहानें गेला व जोर करून ती खुर्ची त्यानें खोलीच्या दारापर्यंत ओढीत आणिली. परंतु, ती दारांतून बाहेर येईनाशी झाल्यामुळें पुनः तो बापाला ह्मणाला-"बाबा, खुर्ची दारांत अडकली ती बाहेर येत नाहीं." तेव्हां सुबोध ह्मणाला-"खट-

पट करून पहा. जर ती खुर्ची तूं आणिलीस, तर तुला आंब्याशिवाय आणखी एक सुंदर चेंडू देईन." निर्मळ पुनः खुर्चीजवळ गेला आणि खुर्ची ओढूं लागला; पण ती पुढें येईना. तेव्हां विचार करून युक्तीनें ती खुर्ची वांकडी करून बाहेर काढिली व बापाजवळ घेऊन आला. पुष्कळ मेहनत पडल्यामुळें त्याच्या आंगाला घाम सुटला होता. तो सुंदरीनें आपल्या पदरानें पुसून टाकला व बापानें देऊं केलेल्या वस्तु त्याला स्नेहचुंबनपूर्वक दिल्या. तेव्हां निर्मळचंद्राला अत्यानंद होऊन तो नाचूं लागला.

सुबोध०—एखादा मनुष्य फार मेहनतीनें हिमालयाच्या अति उंच शिखरावर चढला ह्मणजे अथवा भयंकर तुफानांत सांपडलेला एखादा प्रवासी गलबत फुटलें असतां महत्प्रयासानें तरून तीरास लागला ह्मणजे त्याला जसा आनंद वाटतो, तसा आज हा लाडका स्वीकारलेलें काम आपल्या सामर्थ्याबाहेर असूनही तें आपण पार पाडलें ह्मणून विजयी सेनापतीप्रमाणें आल्हादित होऊन कसा डौलानें चालतो आहे पहा. ही मोठी खुर्ची त्याला हालेना! तेव्हां तो ह्मणाला कीं, "ही भारी जड आहे." यावरून याच्या मनांत तारतम्यभाव उत्पन्न झाला आहे असें होतें. दुसरें, त्याला इनामाची आशा दाखविल्यावर तो अवघड काम करण्यास उत्सुक झाला व मोठ्या मेहनतीनें तें काम पार पाडून बक्षीस मिळविलें. अशाच तऱ्हेनें न्यायान्याय, चांगलें-वाईट, हंसणें-रडणें, सुख-दुःख, प्रकाश-अंधार, दिवस-रात्र, थंड-ऊष्ण, चंद्र-सूर्य, उन्हाळा-पावसाळा इत्याद्यनेक प्रसंगांनीं बालक दिवसें-

दिवस ज्ञान, बुद्धि आणि विचारशक्ति यांची उन्नति मिळवितें. आणि आईबाप सूज्ञ व धीमान् असतील तर अशा प्रसंगाच्या शिक्षणानें मुलांची उन्नति निःसंशय करतील.

सुंदरी—पण, सुदैवानें ज्यांच्या मनांत हे असले विचार येतील त्यांची ही गोष्ट!

सुबोध०—तूं पुष्कळ वेळ पाहिलें असशील कीं, आपल्या दारावर महारोगग्रस्त असा एक भिकारी भिक्षेकरितां येत असतो. त्याला निर्मळानें पाहिल्याबरोबर तो माझ्याकडे धांवत येऊन मला ह्मणतो "बाबा, त्याला पैसा द्या; पैसा." व मी पैसा काढून देईपर्यंत मला थार करीत नाहीं. आतां तो अशा भिकाऱ्यावर दया करण्यास कसें शिकला हें तुला माहित नाहीं. एके दिवशीं रस्त्यांत मला एक अत्यंत पीडित असा भिकारी आढळला. त्याला पाहिल्याबरोबर मला फारच कळवळा आला व पाण्यानें डोळेही भरून आले. मी त्याला लागलेच दोन आण्यांचे पैसे देऊन चालता झालों. तेव्हां माझ्याबरोबर निर्मळचंद्रही होता. त्यानें ही गोष्ट पाहिली होती. पहा, या एका प्रसंगानें अशा अनाथ दुबळ्यांवर दया करण्यास तो शिकला आहे.

सुंदरी—तरच भिकारी आला कीं, "आई, भिक्षा घाल, भिक्षा घाल" ह्मणून मला थार करीत नाहीं.

सुबोध०—आपल्या घरीं कोणी पाहुणा आला ह्मणजे त्यास चांगल्या जेवणाची तयारी करीत असतो यावरून स्वतःची खाण्याची वस्तु दुसऱ्यास देण्याचें तो शिकला आहे. कित्येक दिवसांपूर्वी मी निर्मळचंद्राला

बरोबर घेऊन त्या **गोविंदरावांना** भेटायला गेलों होतों. तेथें **गोविंदरावांनीं** त्याला दोन आंबे आणि दोन अंजीर खायला दिले. इतक्यांत त्याचा मामा तेथें आला. त्यानें सहज **निर्मळचंद्रा**पाशीं खायला मागितलें. तेव्हां झट्दिशीं त्यानें एक आंबा आणि एक अंजीर त्याच्या हातावर ठेवला. पुनः तो मागूं लागला पण त्यानें कांहीं दिलें नाहीं. त्याच्याबरोबरच दुसरा एक गृहस्थ आला होता. त्यानें **निर्मळा**जवळ तो आंबा आणि अंजीर मागितला तेव्हां त्यालाही तीं दोन्ही फळें देऊन टाकलीं! मी त्याची परीक्षा पाहण्यासाठीं ह्मटलें "बाळ, चल आपण घरीं जाऊं." असें ह्मटल्याबरोबर म्लानवदन न करितां माझा हात धरून तो चालायला लागला. तेव्हां पुनः त्या गृहस्थांनीं त्याला हाक मारून ते आंबे व अंजीर खायला दिले व त्यानें ते आनंदानें खाल्ले.

**सुंदरी**—आपल्या **निर्मळचंद्राला** कोणी कांहीं खायला दिलें ह्मणजे तो स्वतः खात असतां दुसरें कोणी जवळ असेल तर त्याला दिल्याशिवाय कधीं राहत नाहीं. मीच जवळ असलें तर माझ्या तोंडांत तरी घालायला लागतो. आपण त्या दिवशीं सांगत होतां कीं, आमच्या घरीं एखादा मित्र किंवा आप्त आला तर त्याला जाऊं देत नाहीं. हरयत्न करून पाहतो. आणि तो जायलाच निघाला तरी त्याचा पदर सोडीत नाहीं. कोणी आप्त असो किंवा परका असो; तो त्याला आपलासाच वाटतो. हा त्याचा स्वभाव फार चांगला आहे.

**सुबोध०**—आजच एक गोष्ट झाली आहे. ती ऐकिलीस ह्मणजे आपल्या मुलाच्या मनांत सद्भाव दि-

वर्षोदिवस जास्त जास्त प्रकाशित होत चालला आहे असें तुला दिसेल.

**सुंदरी**– ( मोठ्या उत्सुकतेनें ) आज काय झालें ?

**सुबोध०**— आज सकाळीं एक मनुष्य त्या समोरच्या झाडास डोकें टेंकून रडत होता. निर्मळ माझ्याबरोबर रस्त्यावर फिरत होता. मी कांहीं विचारांत होतों; त्यामुळें त्या रडणाऱ्या मनुष्याकडे माझें लक्ष्य गेलें नाहीं. पण, निर्मळच्या दृष्टीस पडतांच तो त्याच्याजवळ धांवत गेला आणि त्याला हातानें हालवून रडण्याचें कारण विचारिलें. परंतु, त्याच्याकडून उत्तर न मिळाल्यामुळें तसाच धांवत मजकडे आला आणि मला सांगूं लागला "बाबा, तो बघा आपला मिठाईविक्या रडतो आहे, तिकडे चला." मी जवळ जाऊन पाहतों तर खरोखरच मिठाईविक्या तेथें रडत उभा होता. निर्मळानें त्याचें धोतर ओढून त्याला रडूं नको ह्मणून सांगितलें व मीही दोन तीन वेळ त्याला रडण्याचें कारण विचारिलें. तेव्हां रडत रडत तो मला ह्मणाला "रावसाहेब, माझा वृद्ध बाप मला सोडून गेला. त्याची शेवटची भेटही झाली नाहीं. मी एकटा एकच त्याचा मुलगा असून शेवटीं त्याच्या सेवेला अंतरलों ह्मणून मला भारी दुःख वाटतें. आणि ह्मणूनच मी रडत आहें." मीं त्याला दोन गोष्टी सांगून शांत केला. व निर्मळही आपल्या मधुर शब्दांनीं त्याचें सांत्वन करूं लागला. निर्मळाचा तो प्रेमभाव पाहून त्याला फार आश्चर्य वाटलें व त्याच्या मनांत आदरबुद्धि उत्पन्न झाली.

सुंदरी—जेव्हां भावजी आजारी होते, तेव्हां मी सुरतेस गेलें होतें. ज्या घरीं आह्मी राहिलों होतों, तेथें एक मैना होती. ती स्पष्ट आवाजानें निर्मळचंद्र असें नांव घेऊन हाक मारीत असे. याचीही तिच्यावर अत्यंत प्रीति जडली होती. तो तिला वरचेवर गोंजारी व चांगलें चांगलें खायला घाली. आणि ती मैना आपण घेऊन जाऊं ह्मणून मला फारच आग्रह करीत असे. यावरून मला वाटतें कीं, घरीं कुत्रें, मांजर, गाय, खबुतर वगैरे पशुपक्षी बाळगले तर मुलांचें मन मनुष्यजातीविषयींच प्रेममय न राहतां पशुपक्ष्यांविषयींही त्यांच्या मनांत आदरबुद्धि उत्पन्न होईल.

सुबोध०—तूं ठीक बोललीस. मुलांना सुशिक्षण देऊन त्यांना नम्रप्रकृति व बहुगुणालंकृत करणें हें आईचें अवश्य कर्तव्य आहे. मुलांच्या मनांत लहानपणींच ज्या वृत्ति उद्भत झालेल्या असतात, त्या ओळखून मुलाच्या प्रकृतिमानाप्रमाणें त्यांपैकीं कित्येकांस तेजस्वी केल्या पाहिजेत व बाकीच्या आपल्या आटोक्यांत ठेविल्या पाहिजेत. कारण, मुलांच्या वाईट वृत्तींचाच स्वभावत आधीं विकास होतो. तेव्हां सर्व मनोवृत्ति जर पालकाच्या स्वाधीन नसल्या, तर फार नुकसान होईल. यासाठीं मुलांच्या आचरणावर सर्वदां नजर ठेवून त्यांच्या मनांतील असत् मनोवृत्ति निस्तेज होतील व सत् प्रवृत्ति विकसित होतील याविषयीं खबरदारी ठेविली पाहिजे.

मुलाला एखाद्या वस्तूची इच्छा झाली ह्मणजे तें फार करून रडतें. अशा वेळीं फार सावधगिरी ठेवावी. कारण, हे प्रसंग मुलाच्या मनांत शठता उत्पन्न करण्या-

ला सहायभूत होतात. बालकांशीं व्यवहार ठेवावयाचा त्यांत सहनशील, शांत, शिष्ट आणि दयाळू असें आपलें वर्तन असलें पाहिजे. वाईट चालीच्या मुलांचें वर्तन सुधारावयाचें असेल, तर आईबापांनीं अगोदर सच्चरित्र झालें पाहिजे. अपशब्द, ताडन, निर्भत्सना वगैरे उपाय जे योजितात, ते मोठी चूक करितात असें ह्मटलें पाहिजे. बालकांच्यासमोर क्रोध प्रकाशित न करितां आपल्या स्नेहमयी सदाचरणानेंच त्यांना वश केलें पाहिजे. कित्येकांचा समज असतो कीं, मुलांना शिक्षा दिल्याशिवाय तीं सच्चरित्र होणार नाहींत. परंतु, ही गोष्ट खोटी आहे. आरंभीं मुलांशीं चांगलें वर्तन ठेविलें नसल्यास मात्र शारिरिक शिक्षा करण्याचा प्रसंग येतो.

स्नेहवशवर्ती होऊन बालकांस वीनित केलें पाहिजे. बालकांना शिक्षण देतांना स्नेह जर आपला 'नेता' झाला, तर सर्व कुटुंबच स्नेहालय होईल. आपलें स्वतःचें व दुसऱ्याचें सुख आणि मतस्वातंत्र्य यांची वृद्धि करणें हा जीवनाचा मुख्य उद्देश आहे. आपला अपराध आपली अथवा दुसऱ्याची हानि करितो; यासाठीं जो आपली स्वतःची उन्नति करितो, तो आपल्या समाजाचीही करितो. आणि जी माता आपल्या मुलांना सुशिक्षित करून सन्मार्गगामी करिते, ती जनमंडलाची उन्नतीच करिते असें ह्मटलें पाहिजे.

लहान मुलांस नुस्तें पोषणकरून वाढविलें ह्मणजे आईबापांची इतिकर्तव्यता झाली असें नाहीं. मुलांच्या कल्याणाकरितां ज्या सामग्रीची जरूर आहे, त्याबद्दल थोडेंसें

वर सांगितलें आहे. आणखीही कित्येक सदुपाय आहेत. पुष्कळ अनुभवावरून असें सिद्ध झालें आहे कीं, शरीर आणि मन यांचा अत्यंत निकट संबंध आहे. त्यांतील एकाला सुखदु:खाच्या संवेदना झाल्या कीं दुसऱ्याला झाल्याच. शरीराला आरोग्य असलें ह्मणजे मन सुप्रसन्न असतें आणि मनाची अविचलित शांति आणि स्फूर्ति यांवर शरीरबल अवलंबून असतें. यासाठीं बालक-बालिकांचें शरीर निरोगी असलें ह्मणजे तीं दिवसें दिवस हृष्टपुष्ट होत जातात. व आकाशांतील स्वेच्छचारी पक्षी अथवा बगीच्यांतील निसर्गमनोहर पुष्पें जशीं शोभतात, तशीं गृहरूप बगीच्यांत तीं त्या मनोहर विमल पुष्पांप्रमाणें शोभादायक होतात. यासाठीं, मिष्टभाषी आणि क्रीडाप्रिय पक्षी उद्यानांत जसे स्वेच्छेनें नाचतात बागडतात, त्याप्रमाणें मुलांनाही नियमितपणानें स्वेच्छेनें वागण्यास दिलें पाहिजे.

या गृहरूप रंगभूमीवर जर बालक-बालिका नियमितपणें स्वातंत्र्याच्या अनुपम सुखाचा अस्वाद घेत नानाविध क्रीडा करितील, व त्यांच्या त्या निर्दोष वर्तनाबद्दल शिक्षेचें भय नसेल, तर त्यांच्या शरीराचा विकास व चित्ताची प्रसन्नता होणार आहे.

जर वेळोवेळीं आईबाप मुलांच्या खेळण्यांत सामील होऊन त्यांच्या अंगीं असलेला स्वाधीनभाव व उत्साह यांची वृद्धि करतील आणि त्याबरोबर त्यांस सन्मार्गवर्ती करण्याची खटपट करतील, तर फार हीत होणार आहे. आईबाप मुलांशीं मिळून-मिसळून वागत असले ह्मणजे मुलें स्वभावत:च आईबापांच्या गुणांचें अनुकरण करीत

असतात. कारण, मुलांचा स्वभाव निसर्गतः अनुकरणशील असतो. तेव्हां त्यांच्यापुढें जसें वर्तनाचें चांगलें वाईट चित्र ठेवावें त्याप्रमाणें त्यांचें वर्तन चांगलें किंवा वाईट होणार आहे. व तेंच अनुकरणानें झालेलें आचरण बहुतांशीं मरेपर्यंत कायम राहतें.

एखाद्या नव्वद वर्षांच्या वृद्धाला त्यानें बाल्यावस्थेंत मिळविलेल्या मुग्ध बोधांतील एखाद्या भागाची स्मृति करितांना अथवा विद्यार्थिदशेंत शिकलेल्या संस्कृत श्लोकाचा पदशः अर्थ करितांना पाहिलें, तर कोणाला बरें आश्चर्य वाटणार नाहीं? आणि अशीं उदाहरणें ह्मणजे थोडीं आहेत असेंही नाहीं. एखादें मूल आपला नेमलेला धडा पाठ करण्यास आळस करीत असलें, तर त्याला शिक्षा न करितां त्याच्या बापानेंच आपल्या लहानपणांत पाठ केलेला तोच धडा जर ह्मणून दाखविला, तर मुलाला आपल्या आळसाची लाज वाटून तो आपलें वर्तन सुधारणार नाहीं काय? मुलांचा तिरस्कार करणें, त्यांना मारणें, वारंवार हिडीसफिडीस करणें इत्यादि निष्ठुर शासनानें त्यांच्या मनांत भय आणि कठोरता यांचा संचार होतो तो मोठा हानिकारक आहे. तर, अशा प्रसंगीं आईबापांनीं किंवा इतर वडील मनुष्यांनीं आपल्या बाल्यकालांतील अवस्थेची स्मृति करून शांत भावानें मुलांस उत्तेजन दिलें पाहिजे.

जर मुलांच्या मनांत एकदां ठसलें कीं, "संसारांतील बहुतेक सर्व प्रियपदार्थांपेक्षां आपल्यास सुखी करण्याकडे मातापितरांचें फार लक्ष्य असतें; आपल्यास सुखी पाहून मातापितरें सुखी होतात; आपल्या वाईट कृत्यांमुळें त्यांना

क्लेश होतो; आपल्या दुराचरणानें त्यांना त्रास येतो; आपल्या दुष्ट, निंद्य, अधम पापकर्मांनीं आपल्या मंगलाकांक्षी जनकजननीचे गाल दुःखाश्रूंनीं भिजतात." तर तीं समजून उमजून तशीं कामें करितील काय? नाहीं. खरोखरच तीं तशीं निंद्य कृत्यें करण्याविषयीं पराङ्गमुख होतील. सुंदरी, तुला खरेंच सांगतों कीं, जीं मातापितरें आपलीं मुलेंलेंकरें हेंच आपलें सर्वस्व आहे असें समजतील, तीं माझ्या ह्मणण्याविषयीं मी सांगतों तशी साक्ष देतील. आपला निर्मळचंद्रच पाहिनास. कित्येक कामें तो आपल्या अकलेनें करितो. परंतु, जें काम त्याला नवीन आहे असें वाटतें, तें तो तुला किंवा मला विचारल्यावांचून कधींही करीत नाहीं. यावरून इतकें सिद्ध होतें कीं, तो तुला व मला स्वतःच्या जीविनाचा परमबंधु असें मानितो. आणि आपल्या सौख्याकरितां, नयनमनपरितृप्तीकरितां केवळ स्वार्थानें परिचालित होऊन आह्मी त्याला सुमनुष्य करण्याचा प्रयत्न करीत आहों असें जर त्याच्या मनांत दिवसें दिवस भरत जाईल, तर फारच चांगलें आहे.

बालशिक्षण देण्याविषयीं एखादें गृह जर प्रधान क्षेत्र असलें, आणि पितामाताच शिक्षणाच्या कामीं सर्वश्रेष्ठ शिक्षक व शिक्षयित्री असलीं, तर त्या घरांतील कुचरित्र दासदासी हींच बालकांच्या शिक्षणमार्गावर महान् शत्रु होऊन राहतात. यासाठीं चाकरनोकरांच्या आचरणाकडेसही मातापित्यांनीं चांगलें लक्ष्य पुरविलें पाहिजे. कारण, सच्चरित्र आणि धार्मिक नोकर गृहशिक्षणाचे सर्वांत मोठे मदतगार आहेत. पुष्कळ वेळ

असें अनुभवास येतें कीं, सच्चारित्र आणि धार्मिक आई-बापांच्या घरीं जन्म घेऊन देखील कोमलमति बालक बालिका जसजशीं वयांत येत जातात, तसतशी त्यांच्या उन्नतीची आशा एकीकडेसच राहून तीं अवनतींत पूर्ण-पणें मिळत जातात. आणि त्याचें कारण इतकेंच दिसतें कीं, तीं बालकें पापाचारी चाकरांच्या संगतीनें अथवा संसारांतील पापप्रवाहांत बुडालेल्या दासींच्या अपवित्र लालनपालनांत लालित पालित होऊन आईबापांच्या चिरदुःखास कारणीभूत झालीं आहेत. सारांश, आईबापें धनवान् असोत अथवा धनहीन असोत, त्यांना जर आपलीं मुलें उन्नतचरित्र, जीवनादर्श, विद्याकुशल, ज्ञान परिमार्जित, स्वातंत्र्यप्रिय आणि धर्मरत व्हावींत अशी इच्छा असेल. तर त्यांनीं जरूर असल्यास सदाचारी दासदासी मिळविण्याची खटपट करावी. परंतु, कुटुंबांत शांति, सुख, उन्नति, सुशिक्षण इत्यादि गुणांची इच्छा करणारांनीं होतां होई तों आपल्या बालकांस क्षुद्रमनस्क दासदासींचा संसर्ग लागूं देऊं नये.

**सुंदरी**—आपलें सांगणें खरोखर विचार करण्यासारखें आहे. घरांतील चाकर अथवा दाई सद्गुणी नसतील तर कुटुंबांत शांतता रहात नाहीं व मुलांनाही चांगलें शिक्षण मिळत नाहीं; ही गोष्ट खरी आहे. मुलांना सद्गुणी करण्याच्या कामीं किती दक्ष असलें पाहिजे याचा अजमास करितां येत नाहीं. आपल्या कुटुंबांत जरासा दोप असला, तरी तो बालकांच्या मनांत प्रवेश करितो; आणि त्याच्या उन्नतीला व्यत्यय आणितो.

**सुबोध०**—तीनचार वर्षांच्या मुलाला सुमार्गाला कसें लावावें हें माझ्या अल्पमतीप्रमाणें तुला सांगितलें. आणखी कांहीं सांगावेंसें वाटेल तें असेंच सांगत जाईन. माझी खात्री आहे कीं, तूं विचारपूर्वक श्रम करून आपल्या **निर्मळचंद्राला** ज्या मार्गानें नेत आहेस, त्याच मार्गानें गेल्यास तो उन्नति मिळवील आणि मनुष्यजन्माची सार्थकता करील. ईश्वर करो, आणि आमच्या मनांतील इच्छा पूर्ण होवोत ह्मणजे झालें.

**सुंदरी**—मीही आपल्याबरोबर समस्वरानें सांगतें कीं, आपण रात्रंदिवस श्रम करीत आहों; ह्मणून सर्व समर्थ ईश्वर आपली इच्छा खचित पूर्ण करील.

**सुबोध०**—**सुंदरी**, आईबाप होण्यापूर्वी कशा तऱ्हेचें जीवन बनविलें असतां आपण सुसंतानाचे आईबाप होऊं—बालक जन्मास येण्यापूर्वी संभावित पुत्रवधूंचें कशा रीतीनें रक्षण केलें पाहिजे—बालकजन्मानंतर त्याच्या जीवनोन्नतीसाठीं व सुशिक्षणाकरितां कोणकोणत्या प्रकारची तयारी व उपायावलंबन केलें पाहिजे तें मीं माझ्या बुद्धीप्रमाणें आतां तुला सांगितलें. हें माझें सांगणें सूज्ञ लोकांस अपरिचित असेल असें माझें ह्मणणें नाहीं. परंतु, मी खात्रीनें ह्मणतों कीं, या महत्वाच्या गोष्टींचा पावलोपावलीं धिःकार होत चालला आहे! **सुंदरी**, तें तुच्छ मानिलें जात आहे. ह्या सहजसत्य गोष्टींचा असा तिरस्कार होत आहे ह्मणूनच आमच्या

देशाची अशी दैना झाली आहे! सुंदरी, या सर्व सामान्य सत्य गोष्टीविषयीं अलक्ष्य करून तूं आपल्या निर्मळकुमाराची खराबी करूं नको. हेंच माझें पुनः पुनः सांगणें आहे. या संसारांतील हरएक प्रसंगांत जगदीशाची इच्छा व अभिप्राय अवलोकनांत येतात. आहा! त्यानें पहा कसे आईबापांच्या द्वारें असाह्य बालकांचे सर्व अभाव दूर केले आहेत! बालकजीवनांत जशी त्याची करुणा आणि मंगलभाव यांची ओळख मिळते, तशी दुसऱ्या कोणत्याही स्थळीं मिळत नाहीं *असें ह्मटलें तरी चालेल. परावलंबी बालक मातेच्या* परम सौख्यदायक मांडीवर स्वस्थ पडून दुग्धपान करीत प्रफुल्ल भावानें चोंहींकडे पहात आहे. त्यांत ईश्वराची करुणा पाहून परमेश्वराविषयीं आस्था बाळगणारा फारच आनंदित होत असतो. तें कसें हंसायला खेळायला शिकतें, त्याला मातापितरें कशीं लडिवाळपणानें बालक्रीडा करीत बोबड्या शब्दांनीं बोलाचालायला शिकवितात, तें दिवसेंदिवस कसें ज्ञानमार्गाचें अवलंबन करीत जातें, त्याच्या अंतःकरणाचा सद्भाव कसकसा खिलत जातो; इत्यादि प्रकारांकडे ज्यांचें फार चांगल्या रीतीनें लक्ष्य असतें, ते लोक कृतज्ञतेनें त्या मंगलस्वरूप ईश्वराच्या चरणीं अनंत प्रणाम करून आपल्यास कृतार्थ समजतात. बालकांस सुशिक्षण देऊन उन्नत करणें हें आपलें महाव्रत आहे हें स्मरणांत ठेवून मनुष्यमात्रानें संसारधर्मांत रत

व्हावें. हीच परमेश्वराची इच्छा आहे. सुंदरी, फार काय सांगूं! जे या परमेश्वराच्या इच्छेनें पालन करितात, तचे धन्य होत! आणि त्यांच्याच जन्माचें सार्थक्य झालें असें समजावयाचें.

---

(समाप्त.)



## ज्या सद्गृहस्थांनीं या पुस्तकास आगाऊ आश्रय दिला त्यांचीं नांवें.

रा. ॲडनमल जी. हेड मास्तर, बाडा १
,, अण्णाजी रावजी स्टेशन-मास्तर, बोरगांव १
,, अनंत अमृत अहमदनगर १
,, अनंत केशव, इंदूर १
,, अनंत खंडेराव, बडोदा १
,, अनंत बाबाजी, अकोला १
,, अब्राहीम डेव्हीड, पुणें १
,, अमोलीक उर्फ तुकाराम, बानगें १
,, आत्माराम आपाजी, नागपूर १
,, आत्माराम धाकु, मुंबई २
,, आत्माराम बळवंत, सांगली १
,, आत्माराम लक्ष्मणराव, देवगड १
,, आद्पा भवानी, अकोला १
,, आनंद बालकृष्ण, नागपूर १
,, आनंराव गणेश, भाईंदर १

रा. आनंदराव व्ही० रा०, मुंबई १
,, आबाची मैराळ अकोला १
,, आर० बी० किर्तीकर, मुंबई १
,, आर० बी० भागवत, अहमदनगर १
,, आर० एम० देसाई, निपाणी १
,, आर० एन० जोगळेकर, इसलामपूर १
,, आर० एस० होनाजी, भंडारा १
,, आर भिमाजीराव, हैदराबाद १
,, आर० व्यंकटराव, मिलापूर १
,, एकनाथ केशव, मांडवगण १
,, एकनाथ बल्लाळ, उरण १
,, ए. आर. गौडगीळ, पचमऱ्ही.... .... ....१
,, ए. एन वर्धराज, डिसा १

रा.ए. के.नूलकर,....धुळें १
,, ए. व्ही. पिसोळकर,
चादरघाट ............१
,, एच. एच इंदूरकर,
नागपूर ............१
,, एच. व्ही. करंदीकर,
खांदाड ............१
,, एम. डी. कुंठे, उमेरीया १
,, एम. जी. मुळे, वर्धा १
,, एम. पांडुरंग, भंडारा १
,, एन. बी. रास्ते,.... ....
उज्जयनी ............ १
,, एस. आर. लच्छुमनराव,
सिरगुजा........ ....१
,, एस. आर. पारखी,
नागपूर............ १
,, एस. के. जोगळेकर, ....
पोखारयन............१
,, एस. बी. कदम,
उज्जैनी १
सौ० कावेरीबाई,
तंजावर ............ २
रा. काशिनाथ राघव,........
कानिवाडा .... .... २
,, काशिनाथराव रामचंद्र,
इंदूर................ १

रा. काशिनाथ वासुदेव,....
मुंबई................ २
,, काशिनाथ वीरेश्वर, ....
सिद्धनाथ ............१
,, काशीराम बाने, बिना १
,, कुंडलिक हरी, मुंबई.... १
,, केशव अनंत, दमोह.... १
,, केशव नरहर, सेंद्री.... १
,, केशव बळवंत, बडोदा १
,, केशव बापुजी, संगमनेर १
,, केशव महादेव, मुंबई १
,, केशव मेहेत्तर, खडकी १
,, केशव लक्ष्मण,............
कांदळगांव............ १
,, केशव विष्णु, दहीवेड १
,, केशव शामराव, इंदूर १
,, कृष्णराव नारायण, मुंबई १
,, कृ. ब. नाडगौडा, बेडग १
,, कृष्णराव हरी, उंझा १
,, कृष्णराव नारायण, हरदा १
,, कृष्णराव सिद्धेश्वर, ....
ध्रागंद्रा................ १
,, कृष्णाचार्य हरिद्वार.... १
,, कृष्णाजी गोपाळ,.... ....
कुरोली................ १
,, कृष्णाजी तुकाराम, कारंजा १

रा. कृष्णाजी नारायण,
मुरगोड .... ....... १
,, कृष्णाजी बळवंत, नेपाळ १
,, कृष्णाजी बळवंत,.......
चापोरा.... ......... १
,, कृष्णाजी बहीरबा,.......
औरंगाबाद .......... १
,, कृष्णाजी मंगेश, हल्याळ १
,, कृष्णाजी विठ्ठल, वर्धा १
,, कृष्णाजी विश्वनाथ, ....
केशोनगर.......... १
,, कृष्णाजी विश्राम, मुंबई १
,, कृष्णाजी शेषो, बेटगेरी १
,, कृष्णाजी संभाजी, हो-
सकोट १
,, कृष्णापा संजीवी, महू १
,, कृष्णा बिन ह्यातारबा,
जमखंडी १
,, कोंडाजी दुल्लाजी, कराची १
,, कोंडाजी विठुजी, इंदुर १
,, कोंडो बालकृष्ण, मांजरी-
बुदरूख १
,, कोंडो राणोजी अहमदन १
,, खंडेराव गणेश, बेलापूर २
,, गजानन सखाराम, जैतापूर १
,, गणपत नानाभाई, पायधु. १
रा. गणपतराव आनंद,
साकोली १
,, गणपतरावजी राणेराव,
इगतपुरी २
,, गणपतराव विठ्ठलराव,
बडोदा १
,, गणपतराव साहेब, कोठा १
,, गणपती विठु, खर्डा १
,, गणपती हरी, ओझर तांबे. १
,, गणेश बळवंत भाडणें १
,, गणेश बाबाजी आचेगांव १
,, गणेश बाबाजी औंध १
,, गणेश लक्ष्मण, मादनभावी १
,, गणेश शेणवी, फोंडा १
,, गणेश विठ्ठल, शेवगांव १
,, गणेश हरी, पन्हाळा १
,, गोपाळ कृष्णराव, खाना. १
,, गोपाळ कृष्ण, मलकापुर २
,, गोपाळ दाजी दळवी,
मुंबई १
,, गोपाळ दामोधर रतलाम १
,, गोपाळदास गोविंददास,
डांभूळ १
,, गोपाळ दिनकर अहमद. १
,, गोपाळ धोंडदेव शिरसगां. १
,, गोपाळ नारायण उमरा. १

रा. गोपाळ नारायण, वाकद १
,, गोपाळ मोरेश्वर, बिना १
,, गोपाळराव जयराम, कठोर १
,, गोपाळराव थिके वर्धा १
,, गोपाळ लक्ष्मण, रत्नागि. १
,, गोपाळ विठ्ठल, डहाणू २
,, गोपाळ सदाशिव, बनारस १
,, गोपाळसिंग अचलसिंग,
,, पंढरपूर १
,, गोविंद अमृत, बडोदा १
,, गोविंद आपा, जानेफळ १
,, गोविंद केशव, मोमिनाबाद १
,, गोविंद गणेश, देवास १
,, गोविंद नरसिंह, धारवाड १
,, गोविंद बाजीराव, अकोला १
,, गोविंद भगवंत, सोलापूर १
,, गोविंद रामचंद्र, बडोदा १
,, गोविंद रामचंद्र, ग्वालेर २
,, गोविंदराव कृष्णाजी,
मंडाले १
,, गोविंदराव मारुतीराव,
लोणी ५
,, गोविंदराव लक्ष्मणराव,
महुवा १
,, गोविंद व्यंकटेश, धारवाड १
,, गोविंद वासुदेव, पुणें २

रा. गोविंद विठ्ठल, खडकी १
,, गोविंद विनायक, कर्जत १
,, गोविंद विष्णु, उमरावती ४
,, गोविंद विसाजी, धामापर १
,, गोविंद स्वामीभट, तंजावर १
,, गंगाधर अनंत, कारवार १
,, गंगाधर केशवराव, कार. १
,, गंगाधर भिकाजी, मंगेशी १
,, घनश्याम बापुजी, नांदगां. १
,, घनश्याम शिवद्दिन,
अहमदनगर १
,, चनमल्लापा भावेपा बैल्हों. १
,, चरंती शिवलींगया,
हल्याळ १
,, चिंतामण मोरेश्वर, नागपू. १
,, चिन्नयास्वामी क्लार्क, मांड. १
,, चंदीप्रसाद दुर्गाप्रसाद,
परंडा १
,, जगन्नाथ गणेश, रायपर १
,, जगन्नाथ पांडुरंग, मुंबई १
,, जगन्नाथरावजी शाळा मा.
नाचणगांव.......... १
,, जगन्नाथ वासुदेव,........
मायावरम.......... १
,, जनार्दन अमृत, टूंबे १
,, जनार्दन गोपाळ, निंबगां. १

रा. जनार्दन गेभोबा,........ हैद्राबाद........... १
,, जनार्दन लक्ष्मण, सातारा १
,, जमशेटजी नसरवानजी, अंकलेश्वर.......... १
जयाबाई साकुबाई, परमें १
रा. जी. आर. रंगुनकर, .. नागपूर.......... १
,, जिवाजी विनायक, .. खानापूर.... ....... १
,, जेठा केशवजी, येशवी १
,, जे. मुनस्वामी. हिंगाजिया १
,, जोगेश्वर पांडुरंग, छिंदवाडा .......... १
,, जोगेश्वर मोतीराम, वोरी १
,, टि डी. पटवर्धन आणि .. कंपनी बुलढाणा.... १
,, डचानीयल सालोमन, .... कराची....... .... .. १
,, डी. नारायण स्टे. मास्तर, क्यामलराक........ १
,, डोंगरचंद नथाराम, .... एकसंबं.............. १
,, तखडकर सेक्रेटरी, नाशिक १
,, तुकाराम आत्माराम, .... आनंद................ १
रा. तुकाराम गणेश,......... हुशंगाबाद...........१
,, तुकाराम बगलाजी, .... तळेगांव दशसहस्र....१
,, तोताराम वल्लद गोविंद, लोहारें. ..............१
,, त्र्यंबक तोताराम,........ धामणगांव...........१
,, त्र्यंबक नागनाथ, महेश्वर १
,, त्र्यंबक भिकाजी, नेर १
,, त्र्यंबक भिकाजी, नागडे १
,, त्र्यंबकराव नागेश,.... मोहोळ...............१
,, त्र्यंबकराव परशराम, .... कोल्हापूर ...........१
,, त्र्यंबक हरी, बडोदा....१
,, दगडु खंडुजी, मुंबई....१
,, दत्ताजी बाळकृष्ण, ठाणें १
,, दत्तात्रय नारायण, धारासीव.......... १
,, दत्तात्रय लिंगो, सावनूर १
,, दत्तात्रय विठ्ठल, जालना १
,, दत्तो विनायक, नागपूर १
,, दाजी अनंत, कासगांव १
,, दामोधर दादाजी, केळवें माहीम १

,, बळवंत मल्हार, धारी १
,, बळवंत रामचंद्र, मिरज २०
,, बळवंतराव आबाजी,
- कोल्हापूर १
,, बळवंतराव आर. कराची-
कर, मुंबई १
,, बळवंत गोविंद, इंदूर १
,, बळवंत शेषराव,
चांदखाजार १

,, बालकृष्ण काशीनाथ,
खेरवाडी १
,, बालकृष्ण गोविंद तळेगां-
व ढमढेरे १
,, बालकृष्ण दामाजी,
कल्याण १
,, बालकृष्ण बापु, मुंबई १
,, बालकृष्ण महादेव, निफा. १
,, बालकृष्ण रामचंद्र.

,, [illegible], [illegible]. २
,, [illegible], [illegible] १
,, नथमल दलीचंद, अहमद. २
,, नथु गणेश, इंदूर १
,, नथु भिकाजी, सजामुठवली
बुद्रुक १
,, नथु लक्ष्मण, भेलसा १
,, नरसनगौडा लिंगनगौडा,
होसूर १
,, नरसिंगराव पांडुरंग,
सिवणी १
,, नरसो रामचंद्र, बागलको. १
,, नरहर गणेश, साकु १
,, नरहर गंगाधर, इचलकरं. १
,, नरहर बाळाजी, हरदा १
,, नरहर मल्हार, सिवणी १
,, नागोराव मारुती,
१

,, नारायण [illegible],
नरसिंगपूर १
,, नारायण जगन्नाथ, मुंबई १
,, नारायण जी गोखले,
मुंबई १
,, नारायण त्रिविक्रम,
नासिक १
,, नारायण पांडुरंग,
उमरखेड १
,, नारायण भवानी, मुंबई १
,, नारायण मंगेश, कुमठा २
,, नारायण रघुनाथ, जैतापूर १
,, नारायण रामचंद्र, इंदूर १
,, नारायणराव जहागीरदार १
,, नारायण लक्ष्मण,
हैदराबाद १
,, नारायण वासुदेव इंडी १
,, नारायण विनायक, नाशि. १

रा. जनार्दन गेभोत्रा, .......
हैद्राबाद ........ १
,, जनार्दन लक्ष्मण, मातारा १
,, जमशेटजी नसरवानजी,
अंकलेश्वर ......... १
जयाबाई साकुबाई, परमें १
रा. जी. आर. रंगुनकर, ...
नागपूर ........... १
,, जिवाजी विनायक, ....
खानापूर ........... १
,, जठा केशवजी, येशवी १
,, जे. मुनस्वामी. हिंगाजिया १
,, जोगेश्वर पांडुरंग,
छिंदवाडा ......... १
,, जोगेश्वर मोतीराम, बोरी १
,, टि. डी. पटवर्धन आणि
कंपनी बुल्डाणा.... १
,, डचानीयल सालोमन, ....
कराची.............. १
,, डी. नारायण स्टे. मास्तर,
क्यामलराकु ... ... १
,, डोंगरचंद नथाराम, ....
एकसंब ........... १
,, तरडकर सेक्रेटरी, नाशिक १
,, तुकाराम आत्माराम, ....
आनंद................ १

रा. तुकाराम गणेश,.........
हुशंगाबाद........... १
,, तुकाराम बगलाजी, ....
तळगांव दशसहस्र.... १
,, तोताराम वल्द गोविंद,
लोहारें.............. १
,, त्र्यंबक तोताराम,........
धामणगांव........... १
,, त्र्यंबक नागनाथ, महेश्वर १
,, त्र्यंबक भिकाजी, नेर १
,, त्र्यंबक भिकाजी, नागठें १
,, त्र्यंबकराव नागेश,....
मोहोळ.............. १
,, त्र्यंबकराव परशराम, ....
कोल्हापूर ........... १
,, त्र्यंबक हरी, बडोदा.... १
,, दगडु खंडुजी, मुंबई.... १
,, दत्ताजी बालकृष्ण, ठाणें १
,, दत्तात्रय नारायण,
धारासीव......... १
,, दत्तात्रय लिंगो, सावनूर १
,, दत्तात्रय विठ्ठल, जालना १
,, दत्तो विनायक, नागपूर १
,, दाजी अनंत, कासगांव १
,, दामोधर दादाजी, केळवें
माहीम १

| | |
|---|---|
| रा. दामोधर वामन, बडोदें १ | रा. नानाजी महिपतजी सातारा १ |
| ,, दामोधर विठ्ठल, पियाळी १ | ,, नामदेव तुकाराम, चित्तेगांव १ |
| ,, दामोधर विनायक, मुंबई १ | ,, नारायण आबाजी, मुंबई १ |
| ,, दामोधर हरी, मोहापाड १ | ,, नारायण केशव, वोसाळें १ |
| सौ. दुर्गाबाई भांडारकर कोल्हापूर १ | ,, नारायण गणेश, जमखंडी १ |
| रा. धोंडापा नाईक, तिळव. १ | ,, नारायण गणेश, सुपा १ |
| ,, धोंडी गुणवंत, नागपूर १ | ,, नारायण गोपाळ, नरसिंगपूर १ |
| ,, धोंडो आत्माराम, कडगां. १ | ,, नारायण जगन्नाथ, मुंबई १ |
| ,, धोंडो व. विठु, रावदळ १ | ,, नारायण जी गोखले, मुंबई १ |
| ,, नथमल दलीचंद, अहमद. २ | ,, नारायण त्रिविक्रम, नासिक १ |
| ,, नथु गणेश, इंदूर १ | ,, नारायण पांडुरंग, उमरखेड १ |
| ,, नथु भिकाजी, सजामुठवली बुद्रुक १ | ,, नारायण भवानी, मुंबई १ |
| ,, नथु लक्ष्मण, भेलसा १ | ,, नारायण मंगेश, कुमठा २ |
| ,, नरसनगौडा लिंगनगौडा, होसूर १ | ,, नारायण रघुनाथ, जैतापूर १ |
| ,, नरसिंगराव पांडुरंग, सिवणी १ | ,, नारायण रामचंद्र, इंदूर १ |
| ,, नरसो रामचंद्र, बागलको. १ | ,, नारायणराव जहागीदार १ |
| ,, नरहर गणेश, साकु १ | ,, नारायण लक्ष्मण, हैदराबाद १ |
| ,, नरहर गंगाधर, इचलकरं. १ | ,, नारायण वासुदेव इंडी १ |
| ,, नरहर बाळाजी, हरदा १ | ,, नारायण विनायक, नाशि. १ |
| ,, नरहर मल्हार, सिवणी १ | |
| ,, नागोराव मारुती, सिरसगांव १ | |

,, नारायण विष्णु, कोल्हापू. १
,, नारायण शामराव, पाथुर्डी १
,, नारायण सखाराम, मुंबई १
,, नारायण हरगोविंद, दुसवी १
,, नारो कृष्ण, वाई १
,, निळकंठ गणेश, अंजन. १
,, निंगसेटी भरमसेटी, नळदुर्ग १
,, पद्माणा पोमाणा, कोल्हापूर १
,, परालिंगापा बसापा मेस्त्री, हलगरी १
,, परशराम गणेश, कल्याण १
,, परशराम गोविंद, उंबर. १
,, परशराम भैराळ, नागपूर १
,, परशराम हरी, चिपळूर्दे १
,, पांडुरंग आत्माराम, धुळें १
,, पांडुरंग नारायण, सातारा १
,, पांडुरंग मंगेश, खानापूर १
,, पांडुरंग मोरेश्वर, मुंबई १
,, पांडुरंग रामचंद्र, तारापूर १
,, पांडुरंग रामचंद्र, हनगंडी १
,, पांडुरंग रावजी, पुणें १
,, पांडुरंग व्यंकाजी, क्यासलरॉक १
,, पांडुरंग विठोबा, मुंबई १
,, पांडुरंग हरी, भायंदर १
,, पानाचंद रामचंद, सोला. १
,, पुंडलीक पांडुरंग, आसो. १
,, पुंडलीक रामचंद्र शहापूर १
,, पुरुषोत्तम एकनाथ, माटंजी १
,, पुरुषोत्तम माणकु, किन्नर १
,, पुरुषोत्तम रघुनाथ, गुहागर १
,, पृथ्वीगीर हरीगीर, यवतमाळ १
,, प्रल्हाद बळवंत, धामणगां १
,, प्रल्हाद रावजी, विजापूर १
,, प्रल्हाद सखाराम, साजाळपूर १
,, पेस्तनजी रतनजी, दापो. १
,, पंढरीनाथ विनायक, नांदेड १
,, पी. टी. पेंढारकर, बोरवली १
,, बकतावरसिंग राजारामसिंग, अहमदाबाद १
,, बळवंत काशीनाथ, हरदा १
,, बळवंत गणेश, तासगांव १
,, बळवंत गोपाळ, चिकोडी १
,, बळवंत जगदीश, भुसाव. १

,, बळवंत मल्हार, धारी १
,, बळवंत रामचंद्र, मिरज २०
,, बळवंतराव आबाजी, कोल्हापूर १
,, बळवंतराव आर. कराचीकर, मुंबई १
,, बळवंत गोविंद, इंदूर १
,, बळवंत शेषराव, चांदुरबाजार १
,, बळवंत सावळाराम, भंडारा १
,, बापुजी गोविंद, डिहीका १
,, बापुजीराव मल्हार बुहारी १
,, बापु देवीदास, शेगांव १
,, बापुरावजी प्रा० मास्तर, हरदा १
,, बापु सदाशीव, चव्हाण. १
,, बाबाजी अण्णाजी, कापशी १
,, बाबाजी गणेश, मुंबई १
,, बाबाजी फर्जंद, परमें १
,, बाबाजी रामजी, पुणें १
,, बाबु नारायण, बेळगांव १
,, बाबुराव अनंत, वर्धा १
,, बाबूराव भिकाजी, अर्नाळ १
,, बालकृष्ण कानोबा सर्जेकोट १
,, बालकृष्ण काशीनाथ, खेरवाडी १
,, बालकृष्ण गोविंद तळेगांव ढमढेरे १
,, बालकृष्ण दामाजी, कल्याण १
,, बालकृष्ण बापु, मुंबई १
,, बालकृष्ण महादेव, निफा. १
,, बालकृष्ण रामचंद्र, राजपिंपळा १
,, बालकृष्ण लक्ष्मण, धारवा. १
,, बालकृष्ण वामन, दुधणी १
,, बालकृष्ण विनायक, आणंद १
,, बालकृष्ण हरशेट, संगमेश्वर १
,, बाळाचार्य बसापा, ब्रह्मावर्त ५
,, बाळाजी धोंडीबा, कनीथमवाडी १
,, बाळाजी यशवंत, मुंबई १
,, बाळाजी श्रीनिवास, मनगोळी १
श्री. बाळासाहेबपंत, औंध १
रा. बिनयामिन सालोम, देवकाली १

,, बुल्धुभाव किसनसाव, नागपूर १
,, बेंजामिन शामसन, मुंबई १
,, बी. एम. काकडे, मंडाळें १
,, बी. पी. देशपांडे, सोलापूर १
,, बी.एस. मोदी नेरपर्सोपंत १
,, भगवंत बळवंत, पुणें १
,, भगवंतराव अमृतराव, बडोदें १
,, भगवंत शिवराम, मवार १
,, भगवानदास मुनीम, साजापुर १
,, भगवानदीन दिक्षीत जलालखेडा १
,, भाई दामोधर, जळगांव १
,, भाऊ जिवाजी, जमखंडी १
,, भाउ बरडे, भंडारा १
,, भाऊ भागुशेट, पिंपळगांव बसंत. १
,, भाऊलाल दलाल, जायखेडा. १
,, भार्गव कृष्ण, आजेंठा १
,, भास्कर गोपाळ, मुंबई १
,, भास्कर सखाराम, अमरावती. १
,, भिकाजी लक्ष्मण, पथरोट १
,, भिकू अनंत, असोळणें १
,, भिवारामजी, मुंबई. १
,, भुमय्या शिवय्या, मुंबई १
,, भैरव बापु, बनारस. १
,, मनसाराम धनजी, किल्लेधार. १
,, मनोहर विष्णु अमळनेर. १
,, मनोहर श्रीनिवास, पुणें. १
,, मलकाजी रावजी सुर्यवंशी, गरग. १
,, मल्ल्या व्यंकटेश, नवसरी १
,, मल्लापा बसापा, सोलापूर. १
,, मल्हार गजानन, अलीबाग. १
,, मल्हाराव माधव, ग्वालेर १
,, महमद एम, शाळामास्तर कित्तूर १
,, महादेव रामचंद्र, मुंबई. ८
,, महादेव विष्णु, वराड. १
,, महादेव सदाशीव, शिमोगा १
,, मार्तंड पांडुरंग, वडगांव १
,, मार्तंड भगवंत, धार. १
,, मार्तंड लक्ष्मण, अकोला १
,, माधवराव भास्कर, मुंबई १

,, माधवराव सखाराम, अंबाह. १
,, माधवराव सखाराम, उज्जयनी. १
,, मारुती नारायण, पुणें १
,, मुलु बुटलर, एडन. १
,, मेजर रामसिंगजी कमांडींग साहेब, इंदूर १
,, मंगेश शिवराम, शिरोडें १
,, यशवंत अनंत, मुंबई १
,, यशवंत गणेश पटण १
,, यशवंत गोविंद, बाळापूर १
,, यशवंत बी. जठार, विजापूर १
,, यशवंतरार रघुनाथ, कसवण १
,, यशवंत रामचंद्र, सागर १
,, यशवंतराव विनायक, अहमदनगर १
,, रघुजीलाल हरकिसनदास, पुणें १
रघुनाथ गोविंद, मुंबई १
रघुनाथ बालकृष्ण, शिकंदराबाद १
रघुनाथ भिमाजी, इंदूर १
रघुनाथराव गोपाळ अत्री १
,, रतनचंद गंभीरमल, पाचोरा १
,, रहिमान शमशोद्दीन, रोण. १
,, राघवेंद्र सिद्दो, कित्तूर १
,, राघोबा देशमुख, वेढापूर १
,, राजीव पंपेश्वर, गदगबेटगेरी. १
श्री. सौ. राणीसाहेब. सांवतवाडी १
रा. रामकृष्ण पुरुषोत्तम, सांगली १
,, रामकृष्ण लक्ष्मण, मुंबई १
,, रामकृष्ण सिंगर ठाकूर, मांडगांव १
,, रामचंद्र अपाजी, कोल्हापूर १
,, रामचंद्र कणीराम, झरेंगांव १
,, रामचंद्र कृष्ण. कोल्हापुर १
,, रामचंद्र कृष्ण, माढा १
,, रामचंद्र गोपाळ, रामदुर्ग १
,, रामचंद्र गोविंदराव, कुलाबा १
,, रामचंद्र गोविंद, सासवड १

,, रामचंद्र चिंतामण, कोल्हापूर २
,, रामचंद्र नारायण, मुंबई १
,, रामचंद्र बल्लाळ, पेण १
,, रामचंद्र बालकृष्ण, मुरगोड १
,, रामचंद्र भगवंत, बेळगांव १
,, रामचंद्र भास्कर, अंकलखोप १
,, रामचंद्र भिकाजी, अलीबाग २
,, रामचंद्र महादेव, सोनगड १
,, रामचंद्र मोरेश्वर, कणकवली १
,, रामचंद्र मोरेश्वर, छिंदवाडा १
,, रामचंद्र यशवंत, वसई १
,, रामचंद्रराव मानाजी, मनमाड १
,, रामचंद्रराव सिन्नलर, आगर १
,, रामचंद्र लक्ष्मण, परतवाडा १
,, रामचंद्र लक्ष्मण, हैदराबाद ४
,, रामचंद्र विष्णु, वरखेड १
,, रामचंद्र वासुदेव, हिंगणघाट
,, रामचंद्र विष्णु, कराची १
,, रामचंद्र शाबाजी, बोबरवाडा १
,, रामचंद्र सदाशीव, राई १
,, रामचंद्र सदाशीव, वेणेगांव १
,, रामचंद्र हरी, उमेळा
,, रामचंद्र हरी, बडोदा १
,, रामचंद्र हरी, सिरोळ १
,, रामय्या धर्माजी, मुंबई १
,, रामराव दिवेकर, धारवाड १
,, रावजी आबाजी, कटकोळ
,, रावजी गणेश, मुंबई
,, ललु खुशालचंद, कोड
,, लक्ष्मण खेकर, काय
,, लक्ष्मण गणेश, गद
,, लक्ष्मण गोविंद, निगमपल्ली १
,, लक्ष्मण जनार्दन, १
,, लक्ष्मण बळवंत १
,, लक्ष्मण बाळाजी १
,, लक्ष्मण मोरेश्वर १